म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
स. नं. २५२
१६२८

REFBK-0003733

१९२८

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

नोंद नं. ५७३

दा. क्र.
३७३३

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५७३
ता. १९/१२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३७३३

# आम्बराई

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 9053

# गिरीशकृत पुस्तकें

## अभागी कमल

......हें काव्य हृदयंगम आहे विधवेच्या करुण कहाणीचें चित्र अंतरंगांत उठविण्याचें सामर्थ्य त्याच्यांत आहे. त्यांतले कांहीं भाग तर मनाला चटका लावून सोडणारे आहेत. भाषा सुबोध असून वाचतां वाचतां अर्थ मनांत उतरला जातो. वर्णनांत अतिशयोक्ति आहे तथापि वस्तुस्थितीची जाणीव करून देऊन मनांत तळमळ उत्पन्न करण्यास तिची मदत होईल"... .

—प्रो. धोंडो केशव कर्वे, बी. ए.

## कला

......"अभागी कमल या लोकप्रिय काव्याप्रमाणेंच या काव्याची रचनाहि सफाईदार व सौष्ठवपूर्ण आहे...नायकनायिकेच्या सौंदर्यप्रेमापेक्षा त्यांच्या परस्पर प्रेमाचेंच चित्र या काव्यांत अधिक तन्मयतेनें रेखाटलेलें आहे .. एक कथनकाव्य या दृष्टीनें हें काव्य निःसंशय सुंदर असून, प्रेमी जीवांच्या निराशेचें यात केलेलें वर्णनहि हृदयंगम आहे. गिरीशांचे शब्द नेहमींच रेशमाच्या धाग्यासारखे पीळदार पण नाजुक असतात."

—महाराष्ट्र, नागपूर.

## कान्चनगङ्गा

या पुस्तकांत आजपर्यंतच्या स्फुट कवितांपैकीं काही निवडक कविता व 'निर्झरसङ्गीत' हें खण्डकाव्य हीं सङ्ग्रहीत केली आहेत. हें पुस्तक, लवकरच तयार होईल

---

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें – (१) रविकिरणमण्डळ, ४६१ शनवार, पुणें शहर (२) विश्वनाथ गणेश आणि मण्डळी, १२ बुधवार, पुणें शहर (३) आर्यसंस्कृतिमुद्रणालय, टिळकरस्ता, पुणें शहर (४) परचुरे, पुराणीक आणि मण्डळी, माधवबाग, मुम्बई.

रविकिरणमण्डळाचें १२ वें पुस्तक

मूळ प्रत

# आम्बराई

श्री ग्रंथ संग्रहालय
क्र. नं. २८०
ता. ९/८/२८

गिरीश

[ सदस्य, रविकिरणमण्डळ ]

★

★

★

★

REFBK-0003733

★

पुणें
आर्यसंस्कृतिमुद्रणालय
१९२८

किंमत एक रुपया

प्रकाशक :
शङ्कर केशव कानेटकर
रविकिरणमण्डळ, ४६१ शनवार, पुणें शहर

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक :
वासुदेव गोपाळ परांजपे
आर्यसंस्कृति मुद्रणालय
टिळकरस्ता, पुणें शहर

प्रियमित्र

**शङ्कर बळवन्त कुलकर्णी, बी. ए.**

यास

**सप्रेम समर्पण**

# रविकिरणमण्डळ

गजानन त्र्यम्बक माडखोलकर

यशवन्त दिनकर पेण्ढरकर

श्रीधर बाळकृष्ण रानडे, बी ए, एम्. एस्सी.

[सौ मनोरमाबाई रानडे, बी ए.]

दत्तात्रय लक्ष्मण गोखले, एम् ए.

विठ्ठल दत्तात्रय घाटे, एम् ए., बी. टी.

माधव त्र्यम्बक पटवर्धन, एम्. ए

शङ्कर केशव कानेटकर, बी ए

# अनुक्रमणिका


| | | | | पान |
|---|---|---|---|---|
| | | | प्रस्तावना | ९-१६ |
| बहार | १ | ला | हितगुज | १ |
| ” | २ | रा | बापाचें हृदय | १० |
| ” | ३ | रा | शुभमङ्गल | १६ |
| ” | ४ | था | काव्यात्म जीवन | २२ |
| ” | ५ | वा | कडाका | ३१ |
| ” | ६ | वा | शपथ | ३८ |
| ” | ७ | वा | शापवाणी | ५० |
| ” | ८ | वा | प्रीतीसाठीं | ५७ |
| ” | ९ | वा | कसोटी | ६३ |
| ” | १० | वा | सुखस्मृति | ६८ |
| ” | ११ | वा | सहभावनेचें तारायन्त्र | ७८ |
| ” | १२ | वा | रुग्णालयांत | ८४ |
| ” | १३ | वा | स्वार्थत्याग | ९३ |
| ” | १४ | वा | नवें जिणें | ९८ |

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२ | १४ | नीट | धीट |
| १७ | शीर्षक | वापाचें हृदय | शुभमङ्गल |
| १९ | ” | ” | ” |
| २१ | ” | ” | ” |
| २७ | ” | गोड प्रतिकार | काव्यात्म जीवन |
| २९ | ” | ” | ” |
| ४८ | ४ | नाही | नादी |
| ४९ | १३ | जाहला | जाहलीं |
| ५१ | १२ | वाची | पाही |
| ६७ | ४ | उठून | उठुन |
| ९५ | ८ | राबायला | राबायाला |
| ४ (परिशिष्ट) | ३ | निसर्गप्रेमत | निसर्गप्रेम |

कर्नाटक युनि...
कोंडवी ८८८
नं. ११५१२

# प्रस्तावना

प्रस्तुत काव्य म्हणजे शेतकरीवर्गाच्या स्थितीवर लिहिलेली एक ससार-कथा आहे. १९१५ सालापासून काही घरगुती आपत्तीमुळें मला आपलें विद्यार्जन सोडून घरची शेतीभाती पहाण्याचा प्रसङ्ग आला. त्यामुळें साहजीकच मला हरघडीला शेतकरी लोकाबरोबर वागावें लागल्यामुळें, त्या लोकाचें वस्तुस्थितिनिदर्शक असें एकादें चित्र रेखाटावें ही कल्पना त्यावेळीं प्रथम सुचली. नन्तर १९१८ सालीं या काव्याच्या कथानकाची रूपरेषा मी आखली, याच सुमारास मुम्बईच्या गिरणीमजूराची स्थिति अवलोकन करण्याचा योग जुळून आला. पुढें १९२५ पर्यन्त कथानकाच्या सम्पूर्ण माण्डणीचा आराखडा मनात तयार होऊन ता. १३ जुलै १९२५ रोजी मी 'पहिला बहार' लिहिण्यास हातीं घेतला व ता. ६ फेब्रुवारी १९२८ला हें काव्य लिहून सम्पविलें. या काव्याचा जन्मेतिहास थोडक्यात असा आहे.

हिन्दुस्थान हा कृषिकर्मप्रधान देश असून शेतकी हेंच भारतवासीयांच्या उपजीविकेचें मुख्य साधन आहे. यावरूनच हिन्दुस्थान देश खेडगावाचाच का झालेला आहे हें समजेल. फार प्राचीन काळापासून हिन्दुस्थानात शेतकीलाच विशेष प्राधान्य देण्यात आलेलें असून, तिचींच स्तुतिस्तोत्रें ठिकठिकाणीं गाइलेलीं आढळतात. वेदकालीन आशीर्वाद देखील 'धनधान्य, पाऊस, गुरेंढोरें याची समृद्धि होवो' अशा अर्थाचे आहेत. त्याला अनुसरूनच 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी' ही म्हण प्रचारात आली असली पाहिजे. शेतांतील धान्याच्या समृद्धीवर कुटुम्बस्वास्थ्याची उभारणी व्हावी व कुटुम्बस्वास्थ्यावर राष्ट्रीयत्वाची उभारणी व्हावी, अशी आर्यांची

पूर्वपरम्परा आहे. याच परम्परेच्या आधारावर विद्या, कला व संस्कृति यांची पैदास होऊन भरतखण्डास उच्चतम पद प्राप्त झालें. सारांश, पूर्वकालीन जीवन नैसर्गिक असल्यामुळें ओजशौर्यबलादि अनेक गुणांची सञ्चणी झाली व आर्यांची संस्कृति पिढ्यान्‌पिढ्या चालत राहिली; पण पुढें पारतन्त्र्य व यान्त्रिक युग यांच्या दुहेरी कैचीत देश सापडून याच आर्यसंस्कृतीला ग्रहण लागलें.

गिरणींत पैसा मिळतो म्हणून गांव सोडावा व गांव सुटला की शेतीची अनास्था व्हावी हा कुयोग सहजासहजी घडून येऊं लागला. खेडेगावें ओस पडून शहरें भरूं लागलीं; अर्थातच शहरें खचून भरल्यामुळें, तिथल्या जीवनक्रमाचें यथायोग्य मोल देण्यासाठी जास्त खपावें, जास्त खर्च करावें व अकालीं मरावें हा प्रकार सुरू होऊन, थोडें मिळवावें, थोड्यात रहावें पण दीर्घकाळ जगावें या अर्थशास्त्राच्या दृष्टीने फायदेशीर असणाऱ्या नियमाला फाटा मिळाला. या खेरीज खेडेगावातील इतर फायदे जाऊन शहरातील नसती पापें मात्र पदरास चिकटलीं तें वेगळेंच. सारांश, एकामुळें दुसरें व दुसऱ्यामुळें तिसरें अशी अधोगति सुरू झाली व आपण सर्वच थोड्याफार प्रमाणात पोटाचे मजूर बनलो आणि अङ्गण परदेशी करून आजच्या हीन स्थितीला येऊन पोचलों. परन्तु शेती हेंच भारताच्या समृद्धीचें साधन आहे हें ध्यानात ठेवून या अधोगतींतूनच आपण उन्नतीचा मार्ग काढला पाहिजे, व त्यासाठीं शेतीचा प्रश्न पुन्हा अत्यन्त कळकळीनें हातीं घेतला पाहिजे.

प्रस्तुत काव्यांत याच अधोगतीचें एक चित्र रेखाटलें आहे. ज्या अनेक कारणांनीं शेतकी अधोगतीला गेली, तीं सर्व कारणें एकाच कथानकात गोवणें काव्य व कला या दृष्टीनें अप्रस्तुत झालें असतें; आणि म्हणूनच काव्याची योग्य सजावट करण्यासाठी काही वेचक प्रसङ्ग घेऊन, त्यावरच 'आम्बराई'ची उभारणी केली आहे. अवेळीं सम्पत्ति व स्वातन्त्र्य हातीं

सं-ग्रंथालय ८८७८

आल्यामुळें त्यांचें खरें महत्त्व न समजणें, पुष्कळ गरीबांच्या जिवावर एकानें अन्यायानें श्रीमन्त होणें, स्वकष्टार्जित शेतवाडीचें महत्त्व विशेष वाटून त्यातच स्वर्गसुख अनुभविणें, शेतीच्या मालकी उत्पन्नापुढे नोकरीचा गुलामगिरीचा पैसा तुच्छ लेखणें, शहरांतील दिखाऊ श्रीमन्तीपेक्षा खेडेगावातील खऱ्याखुऱ्या गरीबीत सात्विक समाधान मानणें, सुशील पति परिस्थितीमुळें कुशील बनला तरीहि हीनस्थितींत गरीबीचा ससार धीरानें व खऱ्या समाधानानें निपटून, उलट त्याच पतीला आपल्या नैतिक सामर्थ्यानें सुशील बनविणें, दुसऱ्यानें वाटोळें व्हावें व त्याच्या सम्पत्तीचा व शेतवाडीचा अपहार करण्याची सन्धि आपणास मिळावी अशी कुबुद्धि मनात नेहमी बाळगविणें किंवा मैत्रीसाठी सर्वस्वाचा त्याग करणें, हे जे मनुष्यस्वभावाचे बरेवाईट विशेष आहेत, त्याची चित्रें वाचकाना या काव्यात आढळतील. शेवटीं नायिकेच्या पदरात तिच्या निर्मळ एकनिष्ठतेच्या पुण्याईचें फळ टाकण्याबरोबरच शेतीच्या पुनरुज्जीवनाचाहि हेतु साधण्याचा प्रयत्न केला आहे.

हें काव्य साकी या जातींत लिहिलें आहे. कथेच्या दृष्टीनें सर्व कथानकाला एकच वृत्त असणें अधिक श्रेयस्कर असतें तथापि या जातीचा तोचतोपणा नाहीसा होऊन रुचीलाहि थोडा पालट व्हावा म्हणून, योग्य प्रसङ्गीं मधून मधून अनुरूप भावगीताची कलेच्या दृष्टीनें योजना केली आहे. या भावगीतापैकीं काही जानपद व काहीं नागर भाषेंत लिहिलेलीं आहेत. जानपद गीतें जानपद चालींत, जानपद थाटानेंच लिहिल्याखेरीज प्रसङ्गाचा उठाव होत नाही. शिवाय उत्तान शृङ्गार व अश्लीलता यामुळें लावण्याना जें एक हीन स्वरूप आलें आहे व त्यांकडे पहाण्याची दृष्टि साहजीकच हीनपणाची झाली आहे, तीहि, चाङ्गलीं गीतें लिहून साफ करावी, हा या चाली उपयोगण्यात एक हेतु आहे. 'दारूच्या लावणींत' जानपद चाल व नागर भाषा याचें मिश्रण केलेलें आहे. प्रस्तुत सहा भाव-

गीतापैकीं ‘गोड प्रतिकार’ हें श्रीएकनाथ महाराजाचें आहे व ‘न्यहारी’ हें माझे स्नेही कवि यशवन्त यांचें आहे, बाकीचीं चार माझीं आहेत.

यानन्तरचा प्रश्न काव्याच्या भाषेसम्बन्धींचा आहे. काव्याची भाषा सोपी, सहज व सर्वजनसमूहाला समजण्यासारखी असावी लागते. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम व श्रीधर यांच्या भाषेकडे पाहिलें असता याच मताला बळकटी येते श्रीएकनाथ महाराजांच्या पदात याच तत्त्वाची प्रतीति येते. व रेव्ह. टिळकांच्या कवितेतहि याच तत्त्वाचा प्रत्यय येतो. याला अनुसरून मी पूर्वीं याच दिशेने काही प्रयत्न केले व ते यशस्वी झाल्याचें दिसल्यावरून, प्रस्तुत काव्यातहि याच तत्त्वाचा पण अधिक कसोशीनें पुरस्कार केला आहे. इतकेंच नव्हे तर या काव्यात प्रत्येक सम्भाषणप्रसङ्गीं जानपद भाषेचाहि उपयोग केला आहे व तो सहेतुक केला आहे. कित्येकांची समजूत अशी असते की, काव्य म्हटलें की त्याची भाषा अवघड, बोजड, रोजच्या भाषेहून अगदी निराळी अशी असलीच पाहिजे, तींत शब्दालङ्कार व अर्थालङ्कार खचून भरलेले असलेच पाहिजेत; कवीची सृष्टि ही सत्यसृष्टीहून अगदी निराळीच असते, तिचा सर्व थाट सत्यसृष्टीहून अगदी वेगळाच असतो. माझ्या मतें ही विचारसरणी सदोष आहे. कवीची सृष्टि सत्यसृष्टीहून निराळी असली, तरी ती अगदीच निराळी नसते, इतकेच नव्हे तर कविसृष्टि ही सत्यसृष्टीवरच आधारलेली असते. कारण असें नसतें तर सत्याचा अपलाप झाला असता. सत्यसृष्टींत हरघडीला डोळ्यासमोर दिसणाऱ्या साधारण चित्रालाहि कवि आपल्या कुन्चलीनें खऱ्या सौन्दर्याचा रङ्ग चढवून काव्यात्म बनवितो. छायाचित्रकाराच्या कौशल्यामुळें साधारण देखाव्याचें देखील स्वरूप छायाचित्रात जसें मनोहर दिसतें व त्यात वास करणाऱ्या आन्तर सौन्दर्याची जशी आपणास तात्काळ प्रतीति येते, त्याचप्रमाणें कवीच्या हस्तजादूची

स्थिति असते. सत्य आणि सौन्दर्य याना सोडून कवीला अगदीं स्वतन्त्रपणें आपली निराळी अशी सृष्टि कधींहि निर्माण करता येणार नाहीं. हें सर्व जर खरें आहे, तर ज्या सत्यसृष्टीवर कवीच्या सृष्टीची उभारणी झालेली असते, त्या सत्यसृष्टींतील भाषेचें कविसृष्टींत अनुकरण करणें हेंच वाजवी आहे, आणि असें जर केलें नाही तर जानपद पात्रें देखील सस्कृतशब्दप्रचुर अवघड भाषा बोलतात, असा त्याचा अर्थ होईल व काव्यात कृत्रिमता येईल. नाटकामधें देखील पात्रानुरूप भाषा घालण्याचा साम्प्रदाय या दृष्टीनें अत्यन्त नैसर्गिक आहे व त्यातच नाटककाराचें खरें कौशल्य असते. काव्यामध्यें सम्भाषणप्रसङ्गाच्या वेळेस पात्रानुरूप भाषा घालून कवीला जेव्हा स्वतन्त्रपणें काही साङ्गायचें असतें त्यावेळीं त्यानें तें स्वताच्या भाषेत साङ्गावें हेंच उचित होय. या तत्त्वाचा उपक्रम कवि 'चन्द्रशेखर' यानीं आपल्या 'काय हो चमत्कार' या काव्यात फार सुन्दर रीतीनें केला आहे. प्रस्तुत काव्यातील पात्रें शेतकरी वर्गातील असल्यामुळें वरील तत्त्वाला अनुसरून त्याच्या सम्भाषणाची भाषा जानपद ठेवणेंच अधिक योग्य आहे. केवळ नवीन टूम म्हणून तें केलेलें नाही. शिवाय प्रदीर्घ काव्यास चढविलेला प्रान्तिक भाषालङ्कार प्रसङ्गाच्या औचित्यानें विशेष खुलून दिसतो; म्हणजे स्थानिक प्रसङ्गाचें चित्र प्रान्तिक भाषेच्या चौकटींत अधिक उठून दिसतें. वाचकानीं या गोष्टी लक्षात ठेवून प्रस्तुत काव्याकडे पहावें.

आता आम्बराईंत अङ्गिकारलेल्या शुद्धलेखनपद्धतीचा विचार करून ही लाम्बलेली प्रस्तावना सम्पवितों. शुद्धलेखनाचा प्रश्न म्हणजे प्रामुख्यानें अनुस्वाराचाच प्रश्न आहे. मराठींतील अनुस्वाराचे उच्चारित, अनुच्चारित व अर्धोच्चारित असे तीन प्रकार होतात. उदाहरणार्थ [१] गगा, [२] त्यानें व [३] सूबाल्या. याची व्यवस्था भाषेंत कशी लावावयाची हीच

मुख्य अडचण आहे. या बाबतींत एक सर्वसाधारण नियम असा साङ्गतां येईल कीं 'उच्चारित अनुस्वाराबद्दल संस्कृताप्रमाणें अनुनासिकें घालावीं, व ज्या अनुच्चारित अनुस्वाराना व्याकरणाचा शास्त्रीय आधार नाही, किंवा ज्याना तो असूनहि ज्याच्यापासून भाषेंत कोणतेंच विशिष्ट कार्य होत नाही, त्याना फाटा द्यावा, अर्धोच्चारित अनुस्वार मात्र जसेच्या तसे ठेवावेत.' आता वरील नियमाचा क्रमशः विचार करू.

काही लोकाचें असें म्हणणें आहे की उच्चारित अनुस्वाराबद्दल पोकळ शून्य व अनुच्चारिताबद्दल भरीव शून्य लिहावें. पण एकतर या योजनेला पूर्वपरम्परा नाही, दुसरें असें की मूळ संस्कृतमधें जी या सम्बन्धीची परम्परा आहे ती अजून निरुपयोगी ठरलेली नाही, व तिसरें म्हणजे ही योजना मराठींत एक नवीनच उपाधि निर्माण करील. लेखकाच्या हलगर्जीपणामुळें जिथे अक्षराचाच स्वाहाकार किंवा घोटाळा होतो, तिथे भरीव व पोकळ शून्याचा घोटाळा माजेल यात शङ्काच नाही, आणि म्हणूनच संस्कृतमधें उच्चारित अनुस्वार अनुनासिकानें दर्शित करण्याची जी चाल आहे तिचाच आपण सर्वस्वीं स्वीकार केला पाहिजे. असें करण्यामधे एकतर खऱ्या शास्त्रीय पद्धतीचा व पूर्वपरम्परेचा स्वीकार केल्यासारखें होईल व दुसरें म्हणजे अनुस्वाराची जवळ जवळ निम्मी अडगळ दूर केलीसें होईल. यावर काहींचें म्हणणें असे आहे की, असे करण्यानें प्रत्येक अनुनासिकागणिक एक एक अक्षर वाढतें व लिहिताना थोडे अवघड जातें. त्यावर असा प्रश्न आहे की, संस्कृत लिहिताना काय होतें? शिवाय इतर बाबतीच्या वेळीं जर आपण संस्कृत–मराठीच्या जिव्हाळ्याच्या सम्बन्धाकडे बोट दाखवितों, तर याबेळींच त्यापासून दूर का रहावे? आता राहिला प्रश्न अवघडपणाचा. पण ही समजूत फोल आहे. लिहिताना अवघड जाणे किंवा सोपे जाणें हा सारा निव्वळ सवयीचा प्रश्न आहे. हल्ली काही

शाळांतून मुलांमुलींना इङ्ग्रजी धावत्या लिपींत लिहावयास न शिकविता छापण्याच्या लिपींत लिहावयास शिकवितात, आणि अनुभव असा आहे की, दोन्ही तऱ्हेनें शिकलेल्या मुलांमुलींना विश्वविद्यालयातील प्रश्नपत्रिकांचीं उत्तरें देताना ठराविक मजकूर लिहिण्यास सारखाच वेळ लागतो. तेव्हा लिहिताना अवघड जातें किंवा वेळ लागतो या कल्पना केवळ कल्पनाच आहेत, आणि ह्मणून उच्चारित अनुस्वाराबद्दल अनुनासिकाचीच योजना करणें श्रेयस्कर आहे.

दुसरा प्रश्न अनुच्चारित अनुस्वाराचा. ज्याना व्याकरणाचा आधार आहे व ज्याच्याकरवीं मराठींत काहीतरी विशिष्ट कार्य होत आहे, अशीं मराठींत फार थोडीं स्थळें आहेत. अशा ठिकाणीं शब्दयोजना करताना त्याच्यावरील अनुस्वार ठेवण्यास मुळींच हरकत नाहीं. उदाहरणार्थः--तृतीया, चतुर्थी व सप्तमी याच्या प्रत्ययावरील अनुस्वार, अनेकवचनाच्या सामान्यरूपावरील अनुस्वार, नपुंसकलिङ्गत्वामुळें येणारे अनुस्वार, प्रथमपुरुषी क्रियापदावरील अनुस्वार, 'करीं, पाहीं' यासारखीं द्वितीयपुरुषी एकवचनी आज्ञार्थी रूपें [ हीं बहुधा कवितेंत येतात ] यांवरील अनुस्वार, व अर्धोच्चारित अनुस्वार हे सर्व ठेवावयास हवेत ' जों तों ' यावरील अनुस्वार विशिष्ट अर्थांचे सूचक असल्यामुळें ते ठेवावयास हवे ' का ' व ' कां ' याची कामें निरनिराळी असल्यामुळें पहिल्यावर अनुस्वार नको पण दुसऱ्यावर दिला पाहिजे. 'किंवा' या अर्थी येणारें 'कीं' व फार्शी शब्दाचें अपभ्रष्ट रूप 'की' यामध्यें घोटाळा झाला आहे. दुसऱ्याचा उच्चार जरी सानुनासिक करितात तरी तो चुकीचा आहे व त्यावर अनुस्वार नको. त्याचप्रमाणें 'आता, काही, नाही, पुढे, जेथे, कोठे, जेव्हा, भोवती' वगैरे शब्दावर अनुस्वार देण्याची जरूरी नाही. खरी अडगळ माजविलेली आहे ती याच शब्दानीं व तीच आपण निर्विकारपणें दूर केली पाहिजे

आम्धराईतील शुद्धलेखन वरील नियमाला धरून आहे. प्रस्तुत पुस्तक रविकिरणमण्डळाचें बारावें पुस्तक म्हणून प्रसिद्ध होत आहे. मण्डळानें शुद्धलेखनाचा प्रश्न अगदीं प्रथमपासून हातीं घेऊन, त्याला एकमतानें निश्चित असें स्वरूप दद्दाव्या म्हणजे ‘ प्रभा ’ या पुस्तकापासून दिलेलें आहे. या नियमाला अनुसरून या पुस्तकात काही अनुस्वार गळले असल्यास किंवा जास्त दिले गेले असल्यास ते मुद्रणदोष समजावे. अक्षर ऱ्हस्व असून त्याचा उच्चार मात्र जिथे दीर्घ आहे, तिथे त्याच्या डोक्यावर आडवी रेघ [ उदा० नग̄, डोळ̄ ] दिलेली आहे, तिची उपयुक्तता वाचकाच्या लक्षात येईलच.

आज हें काव्य हातावेगळें होत आहे. अशा वेळीं होणारें दुःख आनन्दमिश्रित असलें तरी, असलें कार्य पार पाडण्यास ज्यांचें ज्यांचें साहाय्य झालेलें असतें त्याच्या ऋणाची स्मृति होऊन, अन्तःकरण कृतज्ञतेनें भरून आल्याखेरीज रहात नाही. तथापि हा उपचार न पाळता ‘ ही सर्व श्रीशारदेचीच कृपा ’ असें म्हणून तिच्याच चरणीं सविनय वन्दन करणें श्रेयस्कर.

रविवार<br>१५ जुलै १९२८<br>पुणें शहर

गिरीश

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक ५०३
१९५२
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ५०३५
ठाणे
संग्र. वा.

सं. काव्य ८
१९५२

# आम्बराई

बहार १ ला

## हितगूज

वर्षतूंच्या सरी थाम्बुनी गढूळलेलें पाणी
खळखळ वाहत होतें आता शुभ्र स्फटिकावाणी
त्या पाण्याच्या तुषारमाळा घालुनि वेली काही
आनन्दानें पुलकित झाल्या रानीं ठायीं ठायीं
शिवारातलीं हिरवीं धाटें डोलुनि वाऱ्यासङ्गें
शरदागमनीं सळसळ करितीं अपुल्या अङ्गविभङ्गें
हिरवाळीचे बान्ध थाटले शेताच्या बाजूंनीं
रानफुलांचे तुरे तयांतुन बघती डोकावूनी
ओढ्याकाठीं कुठे उतरणीवरती अम्बेओळ
पाय पसरुनी अडवित होती जलवन्तीचा घोळ
नवीन थण्डी तुकती कोठे फिरू लागली रानीं
शरहतूचे ओठ हालले मन्द जळीं लहरींनीं

पूर्व दिशेला दूरावरती डोङ्गर होते तीन
दोन बाजुंला दोन, आणखी मधला होता सान
निळसर त्यांच्या पोशाखानें मोहुन जाती डोळे
शिखरावरुनी चमकत येती किरण रवीचे कवळे
पुढें पसरले लाम्ब उतरतें माळरान हें थोर
काळे पिवळे तापस गोटे तपार्थ बसले घोर
कोठे कोठे सुन्दर होत्या काळ्या फत्तरखाणी
नजर ठरेना असलें होतें निळसर त्यांचें पाणी

उन्चसखलता आली कोठे कोठे उन्चवटयांनीं
खुरटया गवतामधून भरलें रान कुठे काटयांनीं
माळापासुन खाली खाली काळवटीचीं रानें
दोबाजूना दूर पसरलीं फुलूनिया बहरानें
मधल्या डोङ्गरखोऱ्यामधुनी ओहळ निघुनी एक
वाहत वाहत आला खाली गाणीं गात अनेक
ओघळीतुनी ओहळ खाली माळावरती आला
जळविस्तारें मार्ग खोदुनी आता रुन्द जहाला
डोङ्गरओढा वरून खाली जलद खळाळत वाहे
खडकांमधुनी गोटयांमधुनी एकसुरानें वाहे
मधेच कोठे पाण्यामध्यें शोभे खडकी बेट
शुभ्र तुऱ्यांचे त्याच्याभवती वरती आले देठ
शेवाळींनी जळांत गेले बाजुस फत्तर काहीं
गळां घातलीं होतीं लेणीं रानपाखुचीं वा हीं
मधेंच मार्गीं आ वासोनी काळ्या कडूगोऱ्याची
ठाण माण्डुनी दरड बैसली होती दों डगरींची
दरडीवरच्या कङ्गोऱ्यावर पाणी नाचत आलें
तिथुन आपटे दोंपुरुषावर खाली फेसळलेलें
प्रवाह काही मन्द बाजुचे खोबणींतुनी खाली
खडकावरुनी पाझरतांना भवती भिजवण झाली
प्रपात बनला सुन्दर तेथे, डोह साचला खाली
फाटुन वाहे शरदतूंत पाणी कितिक पखाली
दोन बाजुना डगरी होत्या मुरमाडाच्या उन्च
खोल तळातुन झुळझुळलें जळ, खेळत मुरडूनीच
नागमोडिचे वळण घेउनी पाउलवाटा खाली
डगरींवरुनी गेल्या होत्या तळांत पाण्याजवळी

उन्चसखलता आली कोठे कोठे उन्चवट्यानीं
खुरट्या गवतामधून भरलें रान कुठे काटयानीं
माळापासुन खाली खाली काळवटीचीं रानें
दोबाजूना दूर पसरलीं फुलुनिया बहरानें
मधल्या डोङ्गरखोन्यामधुनी ओहळ निघुनी एक
वाहत वाहत आला खाली गाणीं गात अनेक
ओघळींतुनी ओहळ खाली माळावरती आला
जळविस्तारें मार्ग खोदुनी आता रुन्द जहाला
डोङ्गरओढा वरून खाली जलद खळाळत वाहे,
खडकामधुनी गोटयांमधुनी एकसुरानें वाहे
मधेच कोठं पाण्यामध्यें शोभे खडकी बेट
शुभ्र तुऱ्यांचे त्याच्याभवती वरती आले देठ
शेवाळींनी जळांत गेले बाजुस फत्तर काहीं
गळां घातलीं होतीं लेणीं रानपाचुचीं वाहीं
मधेंच मार्गीं आ वासोनी काळ्या कड्कोन्याची
ठाण माण्डुनी दरड बैसली होती दों डगरोंची
दरडीवरच्या कड्कोन्यावर पाणी नाचत आलें
तिथुन आपटे दोंपुरुषावर खाली फेसळलेलें
प्रवाह काहीं मन्द बाजुचे खोबणींतुनी खाली
खडकावरुनी पाझरताना भवती भिजवण झाली
प्रपात बनला सुन्दर तेथे, डोह साचला खाली
फाटुन वाहे शरदतूंचें पाणी कितिक पखाली
दोन बाजुना डगरी होत्या मुरमाडाच्या उन्च
खोल तळांतुन झुळझुळलें जळ, खेळत मुरडूनीच
नागमोडिचे वळण घेउनी पाउलवाटा खाली
डगरींवरुनी गेल्या होत्या तळांत पाण्याजवळी

वेळू आणिक अम्बेरीच्या हाच शिवेचा ओढा
खाली जाउन वळला होता कृष्णाबाजुस थोडा

दक्षिण डुगरीवरती होती मिनली अम्बेराई
शीतळ छाया अन्तर्भागीं तिची दाटुनी राही
अम्बेराईजवळी होतें शिवार हिरवेगार
नाचत होतीं पिकें तयावर जणु अभिमानें फार
मधेंच होता माळा तिष्ठत पायावरती चार
मोटेजवळी पाचटलेलें शोभे छप्पर फार
उत्तर-डुगरीवरती होतें पडीक हिरवें रान
पलीकडे त्या, मळा केळिचा लावी कोणी छान
शेतवाडिची हिरवळ पसरे दूर दूर त्याभोती
त्याच्या हसऱ्या वदनीं होते नाचत पाचूमोती
वरती आलीं कुठें उसाचीं तरवारीचीं पातीं
हिरव्या रुन्दट पानीं शोभे हळदीवरची कान्ती
कुठे बाजरी कोठे अरगड फुलोऱ्यांत तों आली
भुइमुग-बान्धावरती लवल्या फळभाज्याच्या वेली
मध्यावरती विहिरी होत्या तुडुम्बलेल्या दोन
भिजलीं शेतें मोटेखाली दिवसा पाटांतून
तिथेंच जवळी दाट थाटली विविध तरूंची राई
शान बगीचा योजकतेची दावी नव चतुराई
धावेजवळी नीटनेटका, शीतळ छायेखाली
कुणि कौलारू सुन्दर सोपा धनी तेथला घाली
गोठ्यामधुनी गुरेंवासरें खातीं हिरवा चारा
नवी हुशारी देई त्यांना थण्ड रानचा वारा

गडीमाणसें मोट चालतां आनन्दानें गातीं
पक्षी त्यांना साथ आपुली मञ्जुळ गानीं देती
धण्डीमधल्या साञ्जरातच्या गोष्टी झाल्या खाक
आणि बाजूला उरली होती शेकोटीची राख
सुटली होती समोर गाडी, टेकुनि जू भूमीला
किंवा होतें उद्योगानें वाकविलें लक्ष्मीला ?
धन्य धन्य तो धनी, जयाच्या, असल्या, पायापाशीं
अतुल लोळती स्वर्गसुखाच्या नवलाईच्या राशी

रङ्ग लागला उधळायाला आकाशांतुन कोणी
पूर्व दिशेनें त्यास गाइलीं प्रेमभरानें गाणीं
कणाकणांतुन गायनलहरी घुमल्या त्याच्या गोड
थरथरले जळ शरदतूचें; फुलले सुंदर मोड
पहाटवारा, त्यांत गारठा वाहे रानांतून
हळूच जाई वनराणींना प्रेमें स्पर्श करून
पडली होती आज गुलाबी थण्डी रानोरानीं
दहिंवर होतें टपकत खाली तरुवर पानोपानीं
रविरायानें त्यांत उधळलें वरून आता चूर्ण
तरुराजीची किनार नाजुक पिवळी शोभे पूर्ण
पिवळ्या किरणांमध्यें किंवा विणुनी हिरवा पोत
प्रियेस शाल्‌ गर्भरेशमी आणी धरणीकान्त
आणि नेसली वसुन्धरा तो आनन्दानें दिव्य
तरी आगळी शोभा तिजला आली होती भव्य
वारा होता फुलवित कोणा आलिङ्गनदानानें
भुङ्गे मञ्जुळ गुञ्जन करुनी रमले मधुपानानें
मराठमोळा लतिकावेली लाजुनि लवल्या खालीं
माना मुरडुन वळल्या काही, लपवायातें लाली

डोळे मोडुन कौतुकलेल्या बान्धाजवळी कोणी
पहात होत्या अजून इकडे ऐकुन गुञ्जन-वाणी
शरदानें तर जलदेवीचें चुम्बन घेउन गोड
लज्जालहरी मधुर उठविल्या युक्तीनें बिनतोड
सात्विक शृङ्गाराच्या लीला वठल्या पानीं पानीं
वाटे मोहक विश्व उदेलें आनन्दाचें, रानीं
अशाच आनन्दानें भरुनी हृदयीं आज मुरार
बान्धावरुनी पहा चालला प्रफुल्लतेनें फार

शौकनोक तर पाहुन घ्यावा चालीची ती ऐट !
नजरेमधली मोहक जादू आणि हासरे ओठ !
रुबाब वदनी लालबुंद या ! विशाळ भाळीं फेटा
वाऱ्यावरती सुटला शमला ! रङ्ग मजेचा मोठा !
सरळ नासिका, ओठ कोवळे, डोळे पाणीदार
मिसुड कोठे नुकती फुटली ! भुवया वक्राकार
मांसल गर्दन, पेलदार ही छाती, बाहू लाम्ब
चिवटपणाला केवळ होते पोलादाचे खाम्ब
कठिण पोटऱ्या, बान्धा नाजुक, मूर्त जरा शेलाटी
काटकतेला वशतरूची परन्तु केवळ काठी
नवी गुलाबी आंत दण्डकी, वरती पैरण छान
मलमलींतुनी खुलुन दिसला सुन्दर आंतिल वाण
सुबक साखळी, बुदाम आणिक चुबका घागरियाचा
शुभ्र रुपेरी शोभत होता सुन्दर, छातीवरचा
ऐटबाज हें धोतर कसलें किनारिचें कमरेला
मराठशाही जोडा पायीं शोभा देई त्याला

ऐन बाविशा पुरी उलटली अजुनी त्याला नसली
थोराडाला तालिमबाजी तरि ही खुलुनी दिसली

गावामधल्या घरीं न आली मुळींच त्याला नीज
भल्या पहाटे म्हणून उठला मुरार होता आज
जोरजोडिचे हात कराया देवळांत तो गेला
परि लागेना चित्त म्हणूनी परत घराला आला
स्नानानन्तर करुनि न्यहारी लगबग पैरण घाली
गूढ मनींचें मनीं ठेवुनी स्वारी आज निघाली
सूर्य कासराभर वर आला ! मुरार आला रानीं
उचम्बळे मन आतून, लागे, उडूं पाखरावाणी
शरदतूचे शृङ्गाराचे त्यांत पाहुनी खेळ
आज सोडिला पुरा मनानें खराच त्याच्या ताळ
किल्ल्यावरती किल्ले बान्धुनि मनोराज्य जें केलें
चित्र तयानें रङ्गुनि वर वर पुढे तरङ्गत गेलें
निश्चित होतें परन्तु त्यानें आज ठरविलें काही
आणि कराया तेंच चालला मळ्याकडे लवलाही
गरगर होतीं फिरत लोचनें पिकावरूनी रानीं
त्यात बहरलें आंतुन मानस आशामय कुसुमांनीं

चालुनि आतां झपाझपा तो आला मोटेजवळी
आणि सुमान्या गड्यास देई हाकेची आरोळी
उत्तर आलें मुळीं न, घुमला राइंत केवळ नाद
तोंच खिलारीजोडीचा ये डरकाळीचा शब्द
गाय हम्बरे, शेपुट हलवी उत्सुकतेनें पाडा
मुरार गेला जवळ, होउनी हाकेसरशीं वेडा

पाठीवरती थाप टाकली त्यानें गोंजारूनी
प्रत्युत्तर ही दिलें तयानीं पुनरपि हुम्बारूनी
अधीर झालीं गुरेंवासरें, अधीर झाला तोही
नवीन जादू त्यांत मनाला आतुन काही मोही
विचार करुनी जरा मनाशीं, गुरें सोडिलीं त्यानें
घेऊन चाले तीं पाण्यावर, सरळ पुढे मार्गानें
हसुनि मनाशीं पुढे चालला, भान राहिलें नाहीं
ओढ लागुनी गुरें चाललीं मागुनि मार्गांनीं ही
मनांत होतें रङ्गत त्याच्या सुन्दर काही चित्र
आनन्दानें भरली त्याची दुनिया आज पवित्र
कल्पनेंत तों दिसू लागलें समोर त्याला कोणी
मोहनमन्त्रें भारुनि चाले दृष्टि पुढे लागोनी
वाटे घेउनि विळा, कसूनी सुन्दर साधी साडी
पिकांत राहुनि उभी कुमारी कोणी कणसें मोडी
पुन्हा वाटले रूपसुन्दरा मराठमोळा बाला
गोफण घेउन राखित होती आज पिंत्याचा माळा
तोंच लोपुनी दृश्य, निराळें दिसलें तन्मयनाला
डोकीवरती घडा घेउनी चाले ती पाण्याला
डोळे फाडुनि पुनःपुन्हा तो समोर पाहू लागे
आणि पाहुनी सुना सृष्टिचा फलक, मनीं तो भागे
हिरवाळीवर, रविकिरणावर आणि ढगांवर काढी
मन'शक्तिनें सुन्दर चित्रें तिची, आंत जी ओढी ?
**वेळू–अम्बेरिच्या** शिवेचा ओढा जवळी आला
मनांत चाले तरि तो अपुल्या रङ्गवीत चित्राला
भान न त्याला गुरें-वासरें जरी राहिलीं मागे
झरझर आला डगरीवरती ओढ लागुनी वेगें

उभे ठाकुनी, क्षणैक त्यानें जरा पाहिलें खालीं
**मानाजींची सगुणा** त्याला दिसली पाण्याजवळी

उभा ठाकुनी मुरार, हृदयीं चित्र साठवू लागे
नकळे त्याला 'रमलों, निजलों किंवा आहों जागे'
दों डोळ्यांची दुर्बिण होती नीट लागली खालीं
तिथें जिवाची मैत्रिण बघुनी हसे जरासा गालीं
धबधब खाली फेसळलेली ओतत होती धार
किंवा ओती कुणी फुलांचे वा मोत्यांचे हार
तिथेंच खडकांमधुनी बारिक एक जिव्हाळा आला
पान लावुनी घडा तिनें त्याखाली होता धरिला
वाकुनि खाली पाठमोरि ती रमली होती त्यांत
भरतां भरतां घडा तिला ही गाई मङ्गल गीत
किंवा भगिनिच्या हितगूजाला निर्झर उत्तर देई
म्हणुनी रमली एकमनानें गायनरङ्गीं ती ही
कीं आठवलें गान कुणाचें ऐकुनि त्यांतील गाणें,
कीं शेलाटी मूर्त सावळी दिसली आत, न जाणे.
जरा ओणवी असून, इकडे वळली होती पाठ
डोईपदराआडून शोभे घन केशांची गाठ
हिरव्यापानीं रानफुलें ती गुफुन, खोवीं त्यांत
पदराखाली दिसली, येतां उलटा वारेझोत
नीटस बान्धा प्रमाणसुन्दर ठेवण रेखिव भारी
कणखर गात्रें साङ्गत होतीं 'रानरहाणी न्यारी'
रमली ज्यावर, तोच जिवाचा जिवलग वरुनी पाही
जाणिव नव्हती कुमारिकेच्या तरुण मनास मुळीं ही
चित्र साठता असें अन्तरीं मुरार किञ्चित हासे
गंमत थोडी जरा करावी मनांत योजी ऐसें

ढेकुळ मोठें उचलुन हातीं, जळांत फेकी खाली
आणि बाजुला लपून राही, मजेंत हासुनि गाली
पाणी उसळे, आवाजानें दचके सगुणा फार
नजर भोवती फिरवी, होउन भीतीनें बेजार
शब्द फुटेना तोण्डामधुनी डवडवली घामानें
'कोन हाय ते ! कोन हाय तें '  वदली परिश्रमानें
उत्तर नाही मुळीच आलें, आता भ्याली फार
गाङ्गरून ती व्याकुळतेनें तशींच ओरडणार—
तोंच बाजुनें खिलारजोडी खाली धावत आली
ओळखितां ती, भीती जाउन आनन्दित ती झाली !
' मुरा ! मुरा ! ' परि कापत ऐसें दोनवेळ हाकारी
खो खो, हासत खाली आली मुरारची तो स्वारी
'किति पन् भ्याल्यें मुरार ' अरली थट्टा लइ वङ्गाळ'
शङ्कासहजों नजर हासरी फेकी ती लडिवाळ
मुरार हसला किञ्चित्, झाला आणि पुन्हा गम्भीर
नजरा भिडल्या ! स्थिर तो झाले दोन्ही जीव अधीर !

वदनग्रन्थीं वाचित होते परस्परांचें काव्य
किंवा डोळे बोलत होते रसिका जें न श्राव्य
पाणबुड्यापरि बुडी देउनी किंवा नयनाब्धींत
अन्योन्यांच्या शोधित होतीं प्रेममौक्तिकें आंत
कसें असो ! ती छटा रोजची स्वैरपणाची गेली
बघता बघतां ओढ्याकाठीं गभीर दोघें झालीं
आणि मनांतील हितगुज ह्याच्या बोलुनि झुळझुळवाणें
कमण्डलूचा ओढा वाहे गाउनि मङ्गल गाणें

---

प्रहार २ रा

## बापाचें हृदय

दक्षिण डगरीवर या वेळीं उभे कोणसे राहे
नजर किलकिली थेट खालती फेकुनि कोणी पाहे
हाक मुलींची ऐकुनि आला शेतांतूनी बाप
मानाजीचें घाबरलें मन कितीतरी निष्पाप
परंतु पाहुनि दोघांना तो क्षणभर झाला मूक
आलें ध्यानीं, काय जहाली होती त्यांची चूक
आणि तयाला मुरारचें ही कौतुक होतें फार
परिचित होती थट्टा असली मुरारची अनिवार
आज पाहुनी समोर खाली विनम्र दोघांनाही
डोळ्याचें तो पुरें पारणें बाट फेडुनि घेई
तीच मनींची इच्छा आतां बळावली शिरजोर
अश्रू आले नयनीं, अपुली बघुन पोरकी पोर
क्षणांत दिसलें 'आपण घेउन परस्पराचे हात
मङ्गल वाद्यस्वरीं देतसू परस्परां हातांत !'
तों आशेचें चित्र लोपलें ! माघारा तो गेला !
भाविसुखाच्या सुधारसाचा सेवी कल्पित पेला

क्षणांत हसली इकडे बाला, पाहू लागे खालीं
कधी नव्हे ती आली होती गालीं आता लाली
मनींचे सारे निश्चय आता मुरारचे ढासळले
हसऱ्या गालाकडे तियेच्या डोळे त्याचे वळले
भाव मनींचा अंतरङ्गिचा कळला परस्परांना
परन्तु आता तिसरें बोलुनि उगीच मोडिती माना

एक बोलतां एक निघावा अर्थ तयांतुन काही
आणि नेमका मनांतला तो, रीती प्रेमाची ही
शब्द बोलले, शब्द सोडले बोलबोलतां त्यांनीं
परस्परांचे पूरक झाले मनामधें उमगोनीं
भावनेंतली भाषा जों जों ओठावरती थाम्बे
मुकी होउनी तोण्डें, भाषण डोळ्याचें तों लाम्बे
धीर तयानें किततिरि केला बोलायातें काही
परि हेतूचा शब्द एकही वदनीं फुटला नाहीं
विचार नाना मनीं येउनी खळबळ काही चाले
झणीं हेरलें सगुणेनें हें, परी न काही बोले
तोंच घड्याचा ये भरल्याचा कानावर आवाज
आणि मावळे गालावरची सुन्दर हसरी लाज
वाकुन आंतिल कुडच्यानें ती फाजिल पाणी काढी
डोक्यावर तो घ्याया, चुम्बळ गुण्डाळी ती जाडी
मुरडुन वरती तों सगुणेची नजर चोरटी वळली
चुकुन मिळाले डोळे आणिक मनिंची भाषा कळली
मुरार होउनि पुढें, वाकुनी घड्यास घाली हात
उचलुन डोक्यावर देतांना बोटें मिळली आंत
स्पर्श जाहला ' अङ्ग थरारे ' रोम उभारे अङ्गीं !
पुन्हा एकदा मनांत झाली खळबळ काही जङ्गी
घडा ठेवुनी तोण्डावर तो झाडी भिजलीं बोटें
शिन्तोड्यानें रोष मुखावर उसना तीच्या उमटे
डोळेभर मग पाहुनि त्याला, गेली ती वर नीट
परी न्यहाळीं अजून पुढली मुरार पाउलवाट
भानावर तो क्षणांत येउनि दीर्घ उसासा टाकी
आज न राहे चित्त तयाचें त्याच्याजवळी बाकी

[library stamps]

गुरेंवासरां पाजुनि पाणी नीट मळ्याला गेला
खळखळ मागे ओढा गाई अपुल्याशीं रङ्गेला

घरा पोचली सगुणा होउनि नव्या विचारीं दङ्ग
न कळे तिजला वृत्ति मनाची होय कशानें भङ्ग
गोन्धळलें मन, ओढ लागुनी मोहक आतुन काही
एकसारखें गोड सुरानें हृदयीं कुणिसें बाही
विस्मित नयनीं जरा थरारे भीति आणिक लाज
नव्या सृष्टिचें दार उघडलें तिच्यापुढे कीं आज ?
तशीच जाउनि घरांत ठेवी डोईवरचा माठ
मोहनमन्त्रें आणि भारुनी उभी राहिली ताठ
आवरुनी मन तोंच, भोंवती पाहू लागे काही
परी पित्याची प्रेमळ मूर्ती घरांत दिसली नाही
तशीच गेली मागिलदारीं धावत वेगें नीट
बापाजवळी जाण्यालाही व्हावें लागे धीट
तुळशीपुढती आसन घालुनि मुख पूर्वेला करुनी
पिता तियेचा बसला होता ध्यान रवीचें धरुनी
नवीन नव्हतें काही, होता नित्यक्रम हा त्याचा
डोळे मिटुनी हात जोडुनी पुटपुटला तो वाचा
परंतु नाही धीर निघाला सगुणेला ह्या काळीं
लडिवाळपणें मागुनि गेली मानाजीच्या जवळी
हात टेकले खान्द्यावरती, बोटें होतीं गार
तोंच जिवाची सगू पाहिली, ध्यान निमालें पार !
'किति वर आला दिस् ह्यो बाबा' लई लाम्बलं ध्येन !
टळून गेला वक्त' न्हाइ का न्याहारीचं ध्येन ?

म्हत चाललं कसलं इतं ध्येन आजला बाई ?'
बोलुनि इतुकें पित्याकडे ती डोळे लाउन पाही
'लई लाम्बलं खरंच, पोरी, पन् या येवासङ्ग
करित व्हतों मी ग्वाष्ट जराशी गाउनश्येन अभङ्ग
इच्यारली म्यां ग्वाष्ट जिवाची, येव बोलला काही
म्हनून लागला येळ जरासा ! न्यहारिला चल् बाई !
अजूनश्येनी गुरांवासरां न्हाइ दाविलं पानी !
चल् ग बाळे !' बोलत उठला तिज तो कुर्वाळूनी
सगुणा हसुनी पुढे चालली, बाप मागुनी जाई
आश्चर्यें ती उत्सुक झाली प्रश्न कराया काही
मना विचारी 'ग्वाष्ट कशाची ? येव बोलला, काय ?'
ओठावरचे प्रश्न राहिले परि ओठावर, हाय !
मनास लागुनि चटका त्याचा उत्सुकली ती फार
घरकामानें परी विसरली मनिंचे सर्व विचार

अम्बेराई मानाजींची सर्व सम्पदा होती
राई म्हणजे होते त्याचे केवळ पाचूमोती
अम्बेराईभोवतालचीं काळवटीचीं रानें
केली होती निजकष्टार्जित पुञ्जी मानाजीनें
ऐन सुखाच्या परी घडीला सोडुन बाळ सगूला
मालकिण ती गेली, आणिक विटला तो वेळूला !
काळाचा हा घाव बसतां सोडुन वेळूगांव
अम्बेराईमधें राहिला विसराया तो घाव
मित्र जिवाचा एक शिलोजी राहे वेळूगांवीं
प्रेमळ त्याची कान्ता सगुवर निर्मळ माया लावी

मित्राजवळी ठेवुनि अपुली मानाजी मग बाळ
अम्बेराईमधिं कण्ठाया गेला कांही काळ
एकान्तानें चित्त विरसतां परन्तु फिरुनी बेत
हळूच त्यानें शिलोजिला निज कथिला मनिंचा हेत
अवघड वाटे किती तयांना, तळमळ परि पाहून
उदारधी तीं बाळ सगूला करितीं दूर, रहून !
वेळूगावीं जीव अडकला आता मित्रासाठीं
भेटायाची चुकली नाही त्याची मग परिपाठी
मानाजीला उरले सारे तीनच आता पास
सगू, शिलोजी, अम्बेराई यांचा लागे ध्यास
परि कान्तेच्या स्मृतिनीं प्रेमळ, व्याकुळ होतां प्राण
दुःख गिळी तो बघुनी अपुली सगू, सुखाची खाण
माया लागे सगुवर त्याला वर्षे झालीं सोळा
आज जिवाची सर्व सम्पदा एक पोटचा गोळा
सुशीलतेनें, गुणिलपणानें आकर्षून पित्याला
माया लावी सगू, पिता ही साङ्गे ज्याला त्याला
शेजाराचे केळमळ्याचे मालक तालेवार
अम्भेरीचे पाटिल होते कदम गाजले फार
लेक तयांचा मुरार झाला खेळगडी सगुणेचा
ओढयाकाठीं काळ लोटला त्याचा बाळपणींचा
कधि खेळातील पदार्थ तीचे मुरार खाई सारे
सगुणेवरती रुसून जाई केव्हा भरतां वारें
तिनें उपाशी लट्टूपटींच्या राहात्रे ससार्गी
समजावुन मग तिनें गड्याला आणावें माघारी
केव्हा मिळतां खाया कोठें, अर्धे त्याच्यासाठीं
राखुन, देई हळूच त्याला, भेटुन ओढयाकाठीं

मानाजीच्या कौतुकलेल्या हृदया भरतें येई
लागट असली पोर पोरकी जीव ओढुनी घेई
खपून रानीं कधी करी ती हलकें त्याचें ओझें
हुशार केलें तिला पित्यानें, जरी पुरविलीं चोजें
केव्हां सगुणा करी पेरणी, केव्हा राखी माळा
केव्हा हाकी मोट पित्याची मुरारसङ्गें बाळा
शेतकापणी म्हणजे होती तिची जिवाची हौस
घरकामें ही आवरुनी ती देइ पित्या सन्तोष
थ्यानानन्तर आज पित्याच्या नव्हती जीवा शान्ती
गोड सगूशीं शब्द बोलणें, बोले ते वरकान्ती
झालें तिजला आज कसेसें बघुनी त्यास उदास
न कळे, कसल्या आंत वेदना व्याकुळ करिती त्यास
काम सुचेना ओढयाकाठीं उदास झाली सृष्टी
मधेंच केव्हा गहिवरुनी मन, भरुनी येई दृष्टी !
कुणा पुसावें ? तिच्या मनाची हुरहुर न कुणी जाणे
आणि कमण्डलु पुढें चालला गुञ्जत अपुलें गाणें ! ३५६

बहार २ रा

## शुभमङ्गल

सूर्य लोपला सायङ्काळीं अम्बेराईआड
काळवण्डलें शिवारातले हिरवें पिवळें झाड
किंवा झाली मनीं वियोगें उदास वसुधाराणी
काढुनि टाकी अङ्गावरली पिवळीं सुन्दर लेणीं
चुकून कोठें मेघ सान्जचा रङ्गुनि थोडा गालीं
क्षणविभवानें मिरवत चाले ऐटिंत बघुनी खाली
तोंच पातला तिमिर मागुनी हळू चोरट्या पायीं
टाळायाला हाय ! तयाला परन्तु आलें नाहीं
रङ्ग लागले विटावयाला एकामागुन एक
अस्ताक्षितिजीं मात्र राहिली लाली दिव्य सुरेख
टाकुनि खाली जुनें काम्बळें थकुन अङ्गणामाजीं
पडला होता नजर लावुनी नभीं जरा मानाजी
सुस्कान्यावर सुस्कान्याचे सुटले उष्ण श्वास
दगांकडे तो पाहत होता लागुनि काही ध्यास
किती वेळची येऊन बसली सगू तया शेजारीं
तरी अजूनी खिळली होती वरती दृष्टी मारी
तोंच जाहलें काय कळेना, भरून आले डोळे
दोन तयांतुन गळले बिन्दू, गाल जाहले ओले
अता सगूला धीर निघेना, गळां घालुनी हात
घाबरून ती प्रश्न विचारी, थरकापुनि हृदयात
'बाबा ' बाबा ! काय असं हें ! सकाळपुन् हें काय ?
झपाटलं तर कुनी भूतानं कुटं तुमाला नाय '

उब्यांतुन कां पानी आलं? जिवा लागल काय?
ग्वाड कशान वाटत न्हाई? साङ्गा धरिलें पाय!
चुकल माजं काय? जिवाला कस्ला तुम्‌चा घोर?
पायां पडते उमळुन पोटीं बाबा! तुम्‌ची पोर!'
शब्द ऐकुनी मानाजीनें धरिलें तिज पोटाशीं
अश्रुबिन्दुनीं न्हाणी तिजला, घेउन बाहूपाशीं
हळूच बोले-'चुकल न्हाई तुज काय बी पोरी
स्मिर्ती झाली मला मागलीं मालकिणीची भारी
झपाटल ग तिनं येउनें रातचि सपनात
'लगान आता करा सगूचं' साङ्गुन गेली मात
घेवाला बी कौल लावुनी इच्यारलं म्यां त्येंच
कौल देउनी, येव बोलला साङ्गुनश्येनी ह्येंच
नह्यान होतिस् सगू, तवापुन वर्सं गेलीं सोळा
अता आमची थकली काटी, झाला चोळामोळा
पडलों व्होतों टेकुनश्यानी, तोंच वाटलं आली
तुझी पिर्तिची आई आनिक त्येंच साङ्गुनी गेली
तवा वाटलं आजवरी म्यां तुला परानावानी
जपून आतां करन आलं भागच येगळेंवानी
दुखलेल्या या म्हातार्‍याची व्हतिस सगू तू काटी
दैवाच्या या भेटी, कां मङ्ग् करनं आटाआटी!
औन्दा पिवळी तुला करावी ह्यो पग् मन्‌चा हेत
साङ्ग सगू तुज आवडला का केलेला ह्यो बेत?'
बोलुनि इतुकें टकमक पाहे मुखाकडे मानाजी
सगुच्या डोळा पाणी आले, दिसली नाही राजी
परन्तु पुसतां मानाजीनें पुन्हा एकदा तेंच
अवघडलेल्या तिच्या मनाला पडला पुरता पेंच

शालिनतेनें परी बोलली--' बाबा साङ्गू काय !
तुमची विच्छा तस वागनं मला चाङ्गल हाय !
काय कटाळा माजा आला ?' इतकें बोलुन थाम्बे
मुसूमुसू ती रडूं लागली, पदर क्षणीं ओथम्बे
'तसं न्हव ग पोरी !' ऐसें बोलत मुख कुरवाळी
गोष्टींनीं तिज समजावोनी बाप आसवें गाळी
पुन्हा बोलला हासुन किञ्चित् ' देवाची तू पोर'
भाग्यासाटीं तुज्या सोयरा पगीतला म्यां थोर !'
टवकारोनी कान जरासे वरती सगुणा पाहे
बाटे, मनिंची आशा नयनीं एकवटोनी राहे
उत्सुकली ती ऐकायाला नांव कुळाचें थोर
हवेमधे तों मूर्त तरङ्गे मुरारचीच समोर !

हासुन बोले पिता, ' सोयरा ऐकलास का कोन ?
पाटिल अम्भेरिचा रावबा, मुरार त्येचा होन !'
अर्धेमुर्धे शब्द ऐकुनी सगुणा हसुनी लाजे
शतभूषानीं येइ न ऐसा वदनीं रङ्ग विराजे
त्यांतच दिसली मानाजीला होकाराची वाणी
सगुणा दिसली तेव्हा नयना लावण्याची खाणी
बोल बोलतां पिता जाहला मनामधें गम्भीर
आशा मनिंची निराशतांना सुटू लागला धीर
पुटपुटला तो ' लई पोरगा ब्येस, करावं काय ?
कसं जुळाव ? कसे गरीबा लाभतील त्ये पाय !
पाटिल पदरीं कसल घ्येती ? कसा जिव्हाळा व्हावा ?
सोयरीक ही दइ नशिबाची ! कसा घालवू रावा ?

दैव आमुचं मोटं खट् ये ! ' पुनःपुन्हा हें बोलें
बोल बोलतां पुन्हा एकदा झाले डोळे ओले
चतुर सगूनें मधेंच काही तिसरे बोल वदावे
त्याच विचारीं मामाजीनें गुङ्गत मनीं पडावें
असें चाललें, तोंच सगूनें भाकरतुकडा खाया
म्हणी उठविलें मानाजीला, तोहि निघाला जाया

शरदृतूचा बहर निमाला जराजरासा रानीं
थण्डीमधली मोळेराखण पडूं लागली कानीं
'हा! हा! हा! हा! बहिऱ्या! बहिऱ्या!' शब्द कापरे आले
मिङ्ग् मिङ्ग् गोफणगोटा जाता भुर्कन पक्षि उडाले
'मी मी' असली थण्डी म्हणतां फुटले सारे ओठ
गाण्यासङ्गे तरी चालली धावेवरती मोट
गहू, हरभरा, शाळू, खपला आता बहरा आले
शेतकऱ्यांचे डोळे त्यावर फिरतां पूर्ण निवाले
भावीं स्वप्नें दिसूं लागलीं त्यांस मनोरम गोड
आणि लागली दीन जिवांना दिवसारातीं ओढ
निराश होउनि कितीकदा तरि मनामधें मानाजी
त्या दिवसाचे विचार होता सर्व विसरला आजी
कधितरि त्याला, रोज सगूला मुरार भेटे रानीं
सगुणा बोले केव्हा लाजुन, केव्हा होउन मानी
मानाजी ही दोघामध्यें काय बोलणें चाले
ऐकाया तें, काम सोडुनी कधि न जागचा हाले
निराश होउन, मानाजीनें पुढे सोडला नाद
वाटे त्याला थोर घराणीं कसली घेती दाद !
दिपवाळीच्या पाडव्यास जो मुरार भेटे त्याला
त्यानंतर आला भेटायाला तुळशीच्या लग्नाला

वधूवरांची लग्नबोलणीं सुरू जहाली आता
मानाजीच्या मनात उपजे कधी कधी ही चिन्ता
परी आज तो हाकित होता आनन्दानें मोट
गोफण मारायाला तिकडे सगुचें फिरलें बोट
पाट फोडुनी, गडी पिकांना पाजित होते पाणी
स्वैर लकेऱ्या मारित उठली मानाजीची गाणीं
घुमले त्याचे राईमधुनी वाऱ्यामधुनी नाद
झगमग किरणांवरती फिरले पक्षी घालित साद !

न कळे, झालें कसें ! रावबा आणि शिलोजी आले—
आज सोबत्यांसङ्गें आणिक शेती पाहुन धाले
मोट सोडुनी मानाजीनें पुढें घेतली धाव
सन्मानाया आनन्दानें वदला, ' याव राव !
पायधूळ ही आज कुणिकडे ? चुकला जनु की वाट ?
पुनीत जाली माजी शेती, पडतां तुमची गाट !'
'तिनं व्हायला पुनीत आम्हीं' पाटिल बोलूं लागे
असें पाव्हनें घेउन सङ्गा, आलों तुमच्या जागे !'
मानाजीनें नेलें त्यांना घरांत हातीं धरुनी
गुळपाण्यानें स्वागत केलें, बसावया अन्थरुनी
चमकुन चिर्ची, घरांत आली सगुणा सोडुन माळा
दारफटींतुन पाहत राहे मराठमोळा बाला
थोर जनांचे आज लागले कसे घराला पाय
मित्र शिलोजी प्रस्तावीं हें साङ्गे, झालें काय
आणि शेवटीं पाटिल घाली स्वयें मुरारापायीं
आज सगूला प्रथम मागणी, मानाजीच्या पायीं

धडधडणारें काळिज इकडे झालें आता शान्त
मानाजीला क्षणभर वाटे आहे का ही भ्रान्त ?
असो ! बोलणें पुष्कळ झालें, मानाजीनें अपुली—
गरिबी आणिक विनयशीलता आता पुढती केली
कसें जाहलें काय साङ्गणें ? सौदा ठरला छान
बसल्या घडिला सगुचें झालें तिथेंच साखरपान
मात्र आणखी पुन्हा एकदा मानाजीच्या डोळां
पाणी येउन, जीव तयाचा व्याकुळ झाला भोळा !

पुढील मासीं विवाह मङ्गल झाला अम्बेरींत
वधूवरांचीं मनें बुडालीं दिव्य प्रेमाब्धींत
दहा गावचे अमुप वऱ्हाडी लग्ना धावत गेले
पाटिलबावांनीं ही त्याचे मानमरातब केले
सगुला अपुलें घर वाटावें खरेंखुरें माहेर
असाच केला खिलुकाकांनीं वधूवरां आहेर
मानाजीनें अम्बेराईवरी सोडिलें पाणी
'चोळिबाङ्गडी' अशी सगूला दिली बोलुनी वाणी
असा सोहळा झाला नाहीं म्हणती कृष्णाकाठीं
सार्थक झालें त्याचें, जें जें केलें सगुणेसाठीं
मुरार—सगुणा नान्दु लागलीं घरांत आनन्दानें
प्रेमळ मानाजीनें त्यांना गौरविलें कुतुकानें
शेतीभाती चालू झाली पहिल्यापरि जोमानें
कमण्डलूचा ओढा त्यांना रिझवी अपुल्या गानें

बहार ४ था

## काव्यात्म जीवन

साध्य साधलें नाही तोंवर हृदयीं तळमळ सारी
पुढची आशा भावनेंतली वाढवि गोड खुमारी
हीच माधुरी ध्येयप्रेरित करी मनाला फार
तारुण्यांतिल मन्चर फिरती तरिच बेदरकार
केवळ आशा आणि निराशा यांचा झगडा चाले
भाग्यवान ते, अमृत यांतुनी ज्यांच्या नशिबा आलें
भाग्यवान ते, प्रेमरसाची ज्यांच्या कायम गोडी
भाग्यवान ते, कधी न ज्यांचें प्रेम निराशा तोडी
मुरार होता खरा भाग्यवान आणिक तालेवार
त्यांत एकला आणि लाडका होता सकलां प्यार
गतवर्षांच्या स्मृती तरळती अजुनी नयनीं गोड
वेडें मानस त्याच चिन्तनीं पुरवी अपुले कोड
केव्हा केव्हा गतकालावर डोळे त्याचे खिळती
जागेपणिंच्या स्वप्नामध्यें आणि सगुर्शी मिळती
कमण्डलूचा ओढा त्याचें पवित्र तीर्थ जहालें
दरडीवरती जाउन बसतां, चित्त तयाचें धालें
संसाराच्या झळा लागल्या नव्हत्या अजुनी त्याला
अलग राहिला कोमल गाभा नाजुक केळीमधला

ऐहिक विभवें आज लोळतीं त्याच्या पायीं सारीं
उणीव त्याला नव्हती कसली भरलेल्या संसारीं

किति आईनें प्रेम करावें ! किती रावबा पोटीं
आतुर होती मुरारसाठीं, आस धरोनि मोठी
'मुरार अपुला शेतीभाती करून अम्बेरीत
चालवील ही थोर कुळाची कीर्ती आणिक रीत
मानमरातब करतिल सारे, लीन होउनी पायीं;
लवतिल मोठे मोठे !' ऐशीं तात स्वप्नें पाही
सायङ्काळीं जरा लागता उशीर त्याला याया
हुरहुर लागुन हृदय कोवळें होय आइचे जाया
प्रेमळ आई गडीमाणसें शोधायातें धाडी
तों आणावी दौडत त्यानें दाराजवळी गाडी
कधी सगूच्या मना चोरटी लागावी हुरहूर
आणि तयानें पूर्ण असावें मित्रसङ्गतीं चूर
कधीं रावबा उसन्या रागें शब्द बोलतां चार
बाइल त्यांना निज मायेनें मोडुनि काढी पार
थोर जिवावर त्यांच्या चाले स्वच्छन्दानें चैन
प्रेमळतेच्या सुखसिन्धूला उधाण आलें ऐन
एक कुटुम्बीं प्रेमें झिजणें एकमेकांसाठीं
भाग्य थोर हें त्यास लाभे, पुण्य जयांच्या गाठीं
सून आपुली सुशील कन्या, कुळवन्ताची पोर
रूपगुणांनीं त्यांना भासे जणू बिजेची कोर
कीर्ति ऐकुनी ही कन्येची मनांत धाला बाप
विसरुन गेला एकलकोण्ड्या ससाराचा ताप

'वेळअमोशा' येतां जत्रा ब्रह्मपुरीची भरली
आणि मुरानें खिलारजोडी सोडुन, गाडी जुपली

आई, सगुणा, आयाबाया बसल्या शेजारील
रंगुनी गेला उल्हासानें आज मुराचा दील
किंवा अपुली सर्व करामत दावायाची वेळ
आली म्हणूनी कौशल्याचा करूं लागला खेळ
सर्वांपुढतीं दौडत त्यानें नेली अपुली गाडी
आयाबाया भ्याल्या त्याची पाहुनि धीट धडाडी
तोंच खदखदा हासत त्यानें नजर फेकिली मागें
सगुच्या नेत्रीं कौतुक दिसलें नटलेलें अनुरागें
जोर दुहेरी येउन त्याला सार्थक झालें वाटे
अन्य जनांच्या चेष्टांनीं मन खुशालुनी मुद दाटे

हेमन्ताच्या ऐन थण्डिचा कडका पडला रानीं
आम्बराइची काळवण्डलीं झाडें पानीं पानीं
शिवारांतल्या जोन्धळ्यांवरी किरण रवीचे पडले
आणि तयांनीं नव मोत्यांचें लेणें रानीं घडलें
निळापाण्ढरा मधेंच कोठें निघे पिकांतुन धूर
साङ्गे ' तरणीं पेरें झालीं हुरड्यामाजीं चूर '
असल्या एका रम्य सकाळीं, सङ्गें घेउनि सगळीं
हुरडा खाया मळ्यांत जाई, कोणाला हि न वगळी
ऊस, हरभरा, शेङ्गा, केळी आणि कोवळे दाणे
रानदेविनीं दिले तयांना हेमन्ताचें खाणें
आर पडे तों, गडी लागले कणसें भाजायाला
मुरार लागे हौसेखातर आपण चोळायाला
केव्हा चोळुन हिरवे दाणे आईला तो देई
आणि अकारण अन्य सयांना घास कोवळ देई

तोंच जाणुनी कुणी तयाच्या खरा मनींचा हेत
चास सगूला पोंचविला तो, हसला तो हि मनांत !
दिनभर राहुन तिथें, साञ्चे सर्व घरा मग आले
खिल्लारांना खव्या सुरानें मुरारनें रञ्जवलें

अम्भेरीच्या दऱ्यांत होतें जङ्गल हिरवें दाट
कोठे कोठे रविकिरणांसहि न मिळे जाया वाट
मित्रासङ्गें परन्तु असल्या घोर जाउनी रानीं
शूरपणानें शिकार साधुनि सहज घरा तो आणी
असाच गेला आणि एकदा झाली सायङ्काळ
हुरहुर लागे सर्व जिवांना, येतां नच वेल्हाळ
सङ्गें घेउन गडी म्हणोनी राव पहाया गेले
तोंच शिवेवर, डुकर मारुनि आलेले, ते दिसले
शिकार त्याची पहावयाला धावुनी गेला गाव
धाडस पाहुनि मुरारचें हें विस्मित झाले राव !

वसन्त ऋतुला बहार आला पल्लवपुष्पें फुलुनी
कोकिलगानीं आनन्दूनी दिसे वनश्री खुलुनी
सगुणा आली माहेराला रहावयाला रानीं
मुरार आला सगुणेसाठीं मागुन दोन दिसांनीं
शुभ्र चान्दणें एके रात्रीं फुललें सुन्दर शान्त
आम्बराइच्या रानीं होते चहूकडेच निवान्त
चन्द्र अम्बरीं चढला वरती हासुनिया पुनवेचा
जीव लाजला कामरूपिणी कितीतरी तारेचा
आम्बराइच्या झरोक्यातुनी झरुनी किरणें खालीं
पडलीं होतीं, ठायीं ठायीं पसरुनि अपुली जाळीं

तिथेच एका बान्धावरती दोघें बसलीं शान्त
घुमवित होता कमण्डलूचे गानस्वर एकान्त
म्हणुन, सगूला मुरार साङ्गे एक म्हणाया गाणें
लाजलाजुनी नकार देई सगुणा केविलवाणें
अखेर धरुनी पदर सतीचा जरा ओढिला त्यानें
तोंच नादली अम्बेराई मधुर सगूच्या गानें—

पद १

## गोड प्रतिकार

कृष्णा माझा पदर धरूं नको, सोड ॥ ध्रु०॥
जाउनि साङ्गेन मी यशोदेला १००
मोडिन त्याङ्गली खोड १
तू गुरराखी, मी गोरी राधा
माझी तुझी नच जोड २
एकाजनार्दनि म्हणे मनमोहन
नाम तुझें बहु गोड ३

एकमनानें ऐकत होता मुरार मञ्जुळ गान
हवेंत भोती आम्बराइच्या रानीं घुमली तान
कुणबाऊ उच्चारीं ऐकुन सुन्दर नागर गाणें
भोवतालचीं शेतें डुलली वाटे आनन्दानें
माथ्यावरचा चन्द्र जरासा कलला मावळतीला
आणि परतला सगुणेसङ्गें मुरार ही छपराला

अशापरीने पूर्ण सुखाचीं गेली दोन्हीं वर्षे
सग्यासोयऱ्यासङ्गें झाला दङ्ग मुरारी हर्षे

लग्नानन्तर आज उन्हाळा होता तिसरा आलेला
वसन्त अपुल्या शृङ्गारानें फुलवी सर्व जगाला
तावत होतीं नांगरलेलीं माळावरलीं रानें
डौलानें तरु डवरुन डुलती नूतन पानफुलानें
अम्बेराई मोहरभारें बहरुन आता गेली
छटा फळावर कोठे हिरवी, कुठे ताम्बडी ठेली
मळण्या सम्पुन गावठाणचीं रानें पडलीं ओस
कणगींमध्यें शेतकऱ्यानीं भरले पिवळे घोस
देउनि टाकी कुणी धन्याला, वाटुन दाणागोटा
कुणी धन्याला बुडवुन पुरता झाला होता मोठा
कुणि व्याजाची, कुणि कर्जाची चुकती केली बाकी
पोटासाठी कुणि भाड्यानें गाडी जुंपुन हाकी
जवान हौशी शेतकऱ्यांचीं तरणीताठीं पोरें
फिरू लागलीं कुस्त्यासाठीं टिपीत खेडेंखोरें
शिपण्यापासुन भरूं लागल्या जत्रा गावोगावीं
लहानमोठीं तिथे माणसें मौज कराया यावीं
कुणी कराया देवदर्श वा नवस कराया कोणी
प्रवास करिती पायीं, लादुन पाठीवरती गोणी
कुणि धान्याचा करून पैका, कापड मिरची मीठ
रहिमतपुरच्या बाजाराला घ्याया जातीं नीट
वधूवरांचें गरीबीतलें बासन बान्धायाला
कुणी चालले व्यापाऱ्याच्या धावत थेट घराला
लग्नासाठी शेतावरती करुनी कोणी देणें
सोनाराच्या घरीं घडविती वधूवरांचे लेणें

[library stamp]

जत्रा, कुस्त्या आणि तमाशा यांची दङ्गल झाली
लहानमोठीं पोरेंथोरें त्यांतच दङ्ग जहालीं

मुरार होता मित्रासङ्गें हिण्डत गावोगावीं
ओढ सगूची परत घराला येण्याला परि लावी
कोठे जावें, दोन दिसानीं अम्भेरिस परतावें
घराबाचुनी चित्त तयाचें परि कोठे न रमावें
आज **जरण्डा**, उद्या **माहुली**, परवा **तान्दुळवाडी**
अशापरीनें फिरू लागला मुरार खेडोपाडीं
हौस कराया कधी रावबा, कधि मायाळू आई
वत्सलतेनें पुरवित होतीं पैका प्रेमापायीं
आईसाठी, सगुणेसाठी कधी कधी जिव ओढे
स्वच्छन्दानें फिरावयाचें पडू लागलें कोडें
परन्तु ती ही चेपुन गेली हळुहळु पुरती ओढ
कणसावरती चढूं लागली भोवतालची कीड

खण्डोबाच्या आज **पालिची** जत्रा भरली खास
पालदुकानें, गर्दी पाहुन हो शहराचा भास
जत्रा गेली फुलुन, भरलें माणुस तेथ चिकार
पोरेंथोरें, कुस्तीवाले यांना नव्हता पार
कुठे खरेदी चाले, कोठे होती भेटीगाठी
कोठे गर्दी जमली हुन्नर नवीन बघण्यासाठी
कुणी पाळण्यामधें बसोनि मजेंत घेती झोके
धनार्थ फिरती बहुरूपानीं कुणि सन्यासी बोके
'निवेद' करुनी कुणी बान्धिती मुण्डासें देवाला
तारस्वानें कुठे आरडे मोहक जुगारवाला

अन्त्रा, कुस्त्या आणि तमाशा यांची दङ्गल झाली
लहानमोठीं पोरेंथोरें त्यातच दङ्ग जहालीं

मुरार होता मित्रासङ्गें हिण्डत गावोगावीं
ओढ सगूची परत घराला येण्याला परि लावी
कोठे जावें, दोन दिसानीं अम्भेरिस परतावें
घरावाचुनी चित्त तयाचें परि कोठे न रमावें
आज जरण्डा, उद्या माहुली, परवा तान्दुळवाडी
अशापरीनें फिरूं लागला मुरार खेडोपाडीं
हौस कराया कधी रावबा, कधि मायाळू आई
वत्सलतेनें पुरवित होतीं पैका प्रेमापायीं
आइसाठी, सगुणेसाठी कधी कधी जिव ओढे
स्वच्छन्दानें फिरावयाचें पडूं लागलं कोडें
परन्तु ती ही चेपुन गेली हळुहळु पुरती भीड
कणसावरती चढूं लागली भोवतालची कीड

खण्डोबाच्या आज पालिची जत्रा भरली खास
पालदुकानें, गर्दी पाहुन हो शहराचा भास
जत्रा गेली फुलुन, भरलें माणुस तेथ चिकार
पोरेंथोरें, कुस्तीवाले यांना नव्हता पार
कुठे खरेदी चाले, कोठे होती भेटीगाठी
कोठे गर्दी जमली हुन्नर नवीन बघण्यासाठी
कुणी पाळण्यामधें बसोनि मजेंत घेती झोके
धनार्थ फिरती बहुरूपानीं कुणि सन्यासी बोके
'निवेद' करुनी कुणी बान्धिती मुण्डासें देवाला
तारस्वानें कुठे आरडे मोहक जुगारवाला

कुणि मुरळ्यांच्या गाननर्तनीं इकडे झाले दङ्ग
बापुरावचा तिथें तमाशा उडवित होता रङ्ग
दोनबाजुंनीं ओघ नदीचा फाटुन वाळूभोंती
मधेच बनलें बेट मनोहर, गर्दी तेथे होती
गावगावचे जवान हौशी जमता वाळवटींत
क्षणांत पडला फड कुस्त्यांचा मधल्या मसणवटींत
हिरवा शमला वाऱ्यावरतो हा कोणाचा हाले?
तरुणगड्यांचा पहा घोळका कुणामागुनी चाले?
उभारुनी तो छडी हातची चारजणांशीं बोले
तालिमबाजी दृष्टीनें तो गडी गड्याशीं तोले
पहा कुणावर खिळले तिथल्या जमलेल्याचे डोळे
जे ते पुसती नांव तयाचें लोक दूरचे भोळे
ऐट दाण्डगी मुरारची ही आकर्षी जनतेला
आनन्दानें, दिसला जोडचा ठरवित तो असलेला
कुस्त्या सरतां, पागोट्यांची मुरार करि खैरात
होय जनाच्या तोण्डी त्याच्या औदार्याची मात !

कुस्त्या सम्पुन सायङ्काळीं लोक घराला गेले
शाहीरांनीं कुठे तमाशे सुरू आपुले केले
हौशी मित्रासङ्गें रमुनी मुरार झाला दङ्ग
पाटिल तिथले त्यांत लागले भरावयाला रङ्ग
नामाङ्कित शाहीर पवाडे दावी गाउनि कोणी
रमले सारे तिथेच ऐकुनि वीरश्रीचीं गाणीं
बहार आली ! खुषांत त्याला दिली आङ्गठी त्यानें
कळी फुलोनी शाहीरानें मजा उडविली गानें

कुणी साङ्गती बापुरावच्या नव्या तमाशासाठीं
खुल्या दिलानें द्रव्य ओतलें, होतें तितकें गाठीं
रमला होता असाच दुसरे रात्रीं ऐकत गाणीं
तोंच कापरीं पडे कुणाची मागुन कानीं वाणी—
'लई ब्येस यो, दादा' न्हाई कळवुनश्येनी आला !
किति दिन् तुम्च्या ऐसाबाच्या लागे घ्वार जिवाला !
आनपानि बी न्हाइ घेतलं त्यांनीं रातीपून
बिगी बिगी तर् चला, चालला जिव त्येचा कर्पून !'
नव्या जीवनीं जरि गोडीचा भरला रङ्ग अपार,
मुरार उठला घरास जाया, व्याकुळ होउनि फार !
हळवा होउन जीव, परतला मुरार रातोरात
रहिमतपुरच्या ओढ्याजवळी येतां होय पहाट
आत कशाची तरी टोचणी सुरू जहाली वेगें
उपदेशाचें वच खळखळलें जळांत धारेसङ्गें
परी मुराला अस्फुट वाणी त्यांतिल कळली नाहीं
आणि कमण्डलु पुढे चालला घुमवित रानें, राई

बहार ५ वा

## कडाका

उधळणुकीचें वृत्त समजलें मातापितरां सारें
सुटले काही वेळ तयावर रागाचेच फवारे
परन्तु रागाआड दाटते अनुरागाची लाट
अथाङ्ग शान्ती आंत सागरीं, वरती खळबळ दाट
कोड कौतुकें पुन्हा लागलीं पुरवू आईबाप
सगुणेसङ्गें चित्त तयाचें रमलें पूर्ण अपाप
औदार्याला पुन्हा कधी जर आली त्याच्या भरती
सगुणा अपुल्या पावित्र्यानें करी तियेला परती
परि जातीच्या स्वभावधर्मा औषध नाही काही
मित्रसङ्गातीं न कळे त्याचा पैसा कैसा जाई
सगुणेपासुन दुरावल्यावर दुबळें होई चित्त
सढळ करीं तो खर्चुन टाकी मित्रापायीं वित्त

कुणी बोलले, 'मेळविलें धन तसेंच आतां जाई'
कुणी बोलले, 'पदरीं आणिक पडली अम्बेराई'
कुणी बोलतीं, 'कधी रावबा कुणा न देती काही'
तरिच, सम्पदा 'भुरारहातीं वाटुनि आता जाई'
असे लागले चार चव्हाट्यावर कुणि बोलायाला
परि न जरा ही वार्ता यांचा शिवली राव-मनाला
लेकाचें मन उद्योगानें कोठे तरि गुन्तावें
रात्रन्दिन ही एक कल्पना अता पित्याला भावे

व्यापाराची गोष्ट हिताची पटली दोघां फार
दिवाळीला तरि जाय पहाया मुम्बइच्या व्यापार
अम्बेरीचे मित्र सङ्गतीं चार घेतले त्यानें
खर्चायाला दिलें चाङ्गलें, हासत त्यास पित्यानें
वळणें बान्धुन व्यापाऱ्यांशीं त्यानें चतुराईनें
काम आपुलें केलें, त्याची कुणी हुशारी वानें
आणि तयानें व्यापाराचें ठेउनिया प्रस्थान
मनीं योजिलें, सुरू करावा मोसम येतां छान
मजेंत गेले दिवस तयाचे उरले सुरले चार
मित्रासङ्गे तेथ उडविली त्यानें रोज बहार
अम्बेरीचीं कुणी माणसें, पोरें तरणीताठीं
गिरण्यामध्यें राबत होती केवळ पोटासाठीं
भेटायाला मुरार गेला त्यांना सहज दुपारीं
हाल तयांचे बघुन चरकला मनामधें तो भारी
वाटे त्याला 'पोट–अरेरे ' काय चीज ही देवा !
पोटासाठी–हाय ! करावी कुणी कुठे ही सेवा !'
वैभव त्याचें आणि आपुलें क्षण तो तुळुनी पाहे
आणि भाग्यवान् स्वतास मानुनि, देवा प्रार्थित राहे
दोन दिसानीं घोडेशर्यत होती तेथे थोर
पहावया ती गिरणीमधले जाय लहान हि पोर
मित्रगणांनीं आग्रह करुनी त्यास पहाया नेलें
पणास लावुन पैसा, त्याला पुरें अकिंचन केलें
खचला नाहीं धीर मुराचा, होता तो दिलदार
त्यांत पात्रचे मित्र जिवाला होते केवळ प्यार !

मोहमयीला सोडुन आला मुरार अम्भेरीला
वृत्त आपुलें कथिलें त्यानें सारें सरळ सखीला
सगुणा रुसली, फुगली, त्याला शब्द बोलली दोन
शान्तपणानें ऐकत वचनें, परि तो सेवी मौन !

थण्डी सरली, कडक उन्हाची तिरिप राहिली मागे
प्रखर आपुलीं भास्कर किरणें हळुहळु सोडूं लागे
खेडोपाडीं कोठे कोठे आटुनि गेले ओढे
हवाल झाले लोक, न मिळतां प्याया पाणी गोडें
ओढ्याकाठीं कुणी काढिती वाळूमध्यें हेळ
दूरावरुनी आणुनि पाणी कुठे भागली वेळ
लोक झऱ्यावर भरती पाणी, तेंच गुरें ही पीतीं
वास मारतां, वाटू लागे रोगराइची भीती
गुरें पटापट मरूं लागलीं वाऱ्याच्या रोगानें
तापसरीची साथ पातली, फैलावत वेगानें
अम्भेरीला घरटीं पडले दोन अजारी लोक
सुरू जहाला कुठे मुलाचा, कुठे आइचा शोक !
औषधपाणी कोणा द्याया, कुठे कुणी ही नाहीं
दीन जनांचें मरण ओढवे हरहर साथीपायीं !
हा हां म्हणतां, कहर उसळला अघोर अम्भेरींत
न कळे कसली परमेशाच्या ही कोपाची रीत !
परगावाच्या कुणि वैद्याच्या लोळण घेती पायां
परिश्रमानें हात टेकले ! केलें गेलें वाया !
कुणि वैद्यानीं तुमडी भरली हीच साधुनी सन्धी
सम्पत्तीची चढू लागली डोळ्यावरती धुन्दी

कुठे पोटच्या पोरा धाया डाळिम्बाचा दाणा
शेतकऱ्यानें डाळिम्बाला विकला एक दिवाणा
एका औषधथेम्बा आलें मोत्याचें जणु मोल
पैका आणिक धान्य जहालीं आता मातीमोल
कुणी रडावें कोणासाठीं न कळे कोणा काही
'पडला !' कोणी म्हणतां म्हणतां 'गेला !' तो लवलाही
अभिषेकाचीं सत्रें बसलीं; दिधलें कोणी देणें !
पाझर देवा तरी फुटेना ! झाले दीन शहाणे !

मुरारसदनीं कोथ भयङ्कर धान्दल झाली आता
तापसरीनें बिमार पडलीं बाप आणखी माता
आज आठ दिन किती रावबा फणफणती तापानें
आणि चार दिन आई निजली केवळ थरकापानें
पाणी किंवा अन्न घोटलें मुखीं जराही नाही,
तोण्ड सुकलीं ! वाणी थकली ! बघतीं भग नयनांहीं
मुरार-सगुणा एकसारखीं होतीं जवळ बसून
मानाजीनें सेवा केली रात्रन्दिवस कसून
सगुणेच्या तर डोळ्यावरची झोप उडाली पुरती
औषधपाणी देतां आली कितिदा डोळां भरती !
तों सासूनें हात उचलुनी परिश्रमानें फार
मुखावरोनी हळू फिरविला, गाळुनि अश्रू चार
डोळ्यांमध्यें प्रेमळ भाषा साठुनि आता राहे
ओठ हालुनी, पुन्हा अश्रुचा ओघळ घळघळ वाहे !
मुरार होता डोकें चेपित तिकडे डोळे वळले
दाटुनि आले थेम्ब अश्रुचे, आणि हळू ओघळले !

बोलायाला शब्द मनातील गेली त्यांशीं काही
तोंच मनाच्या आघातानें मूर्छित झाली आई
धडकी भरली सगुच्या हृदयीं, माम्बावून मुरार
इकडे तिकडे धावे, काही करण्यातें उपचार
समोर होते बघत रावबा सारें टक लावून
तोंच गड्यांनीं नेले त्याना आंत हळू उचलून
तळमळ झाली तीव्र मनाची; रडूं लागले राव
मानाजींनीं समजावियलें, बसतां हृदयीं घाव

आता आई बरळूं लागे वायूच्या झटक्यानें
किति दाबावें ? एकसारखी बोले ताररवानें
'सगुना माजी लई गुनाची ! घरदाराची जोत !
लक्षिमि माज्या हीच घराची, हिन उजवलं गोत !
इळा घेउनी कुट निगालिस येडयावानी पोरी ?
डोळां पानी येउन जालिस कां ग गोरीमोरी ?
कुनी जिवाला तुज्या दुकवल ? उपास कोनासाटी ?
अजुन् पारन न्हाई सुटलं ? कां ही आटाआटी ?
काय दळाया जातिस ? . कनूसं कोनाचीं मोडाया ?
रडूं लागला तुजा पोरगा, घे आदी पाजाया !
मुरारि माजा, तू बी माजी, सगुने घे त्यें पोर
मला धरूं दे पोटाशीं तरि...किति गं जाल थोर !'
बरळ बोलली, हसली, रडली आई तों निमिषांत
बोले इतुकें आणि करांनीं धरी मुराचे हात
टकमक लावी नजर मुखावर, ठरवून भेसुर दृष्टी
जवळी घेउन त्यास वदे मग करुनी डोळां वृष्टी

'मुरा, पोरगी लई न्येस ही ! लक्षिमि सौसाराची !
नगं असा तूं पैका उदळूं, सगुना लइ थोराची !
पानी ! पानी दे ग बाळे !' अडखळला तों बोल
डोकें धरिलें मुरारनें मग मान्डीवर समतोल
'मालक.. गेलं .का. शे. .ता . ला . '' ऐसें बोलुनि काहीं
दोन आचके देउन, गेली कायम सोडुन आई !!
काय साङ्गणें घरांत झाला कसला मग आकान्त ?
सगुणेला तर शोकावेगें क्षणभर आली भ्रान्ति
दीनांची ही माय हरपतां रडूं लागला गाव
अन्थरुणावर शोकाग्नीनें करपुन गेले राव
प्रेमळतेचें छत्र लोपलें ' मुरार झाला दीन '
गुरें लागलीं हुम्बाराया ! दिवस लोटले तीन

आज लागुनी मनास काही आग, तळमळे बाप
शोकव्याकुळतेनें त्याचा चढूं लागला ताप
रात पसरली काळी काळी गोलार्धावर दाट
मात्र पाण्ढरी चमके वरली स्वर्गङ्गेची वाट '
मानाजीला खूण रावबा करिती भरल्या डोळां
हात मुराचा धरिला ! झाले कण्ठी प्राण हि गोळा
'शेतीभाती पग ही...उदळूं नगं.. प...रा ना...वा नी !"
शब्द लोपले पुढले, गेले खोल, न आले कानीं '
मानाजीवर आणि मुरावर दृष्टी एकच वेळ
टाकुनि, त्यांनीं क्षणि आटपला इहलोकींचा खेळ !!
'हर हर देवा ! असा कडाका कधी पगितला नाही !'
बोलत ऐसें, गाळित अश्रू वृद्ध परतले काहीं

आकाशाची कुऱ्हाड पडली सगू–मुरारावरती
भानाजीच्या आधारें तीं दुःखें परि सावरतीं
सगुणेच्या तर डोळ्यामधलें खळलें नाही पाणी
कितीतरी दिन फुटली नाही भानाजीला वाणी
मुरार झाला व्याकुळ हृदयीं, परि मन शमवायाला
मित्रसङ्गती काळ घालवी, खुपला म्हणुनि न भाला
तप्त जगावर वर्षतूंची पडली पहिली धार
आणि निमाला तापसरीचा धूमधडाका पार
हळू हळू मग शेतीभाती, धन्दा चालू झाला
विसरुन दुःखें मुरार लागे दक्षपणें कामाला
आणि सुभान्या रानीं चाले स्वैरपणानें गात
कमण्डलूचा ओढा त्याला देई अपुली साथ

## बहार १ वा

## शपथ

मुरार आता बघूं लागला संसाराचें काम
सगुणा म्हणजे केवळ होतें त्याचें प्रेयोधाम
शेतीभाती आणि मागला मुम्बइचा व्यापार
चालू केली त्यानें पडतां संसाराचा भार
कधि आईची, कधी पित्याची स्मृति हृदयाला जाळी
मित्रसङ्गतीं मन रमवी तो अपुलें ऐशा काळीं
मात्र सगूचें चुकून दुखतां मृदु मन त्याच्या हातीं
तीव्र वेदना-ज्वाला त्याच्या हृदया जाळुनि जाती
तरी हि, उधळण सुरू जहाली भलत्या दिलदारीनें
मित्रासङ्गें मानस होई दुर्बल अपुल्या परिनें

परी मनानें मन्चर आणिक हातानें दिलदार
निजहृदयाच्या श्रीमन्तीनें होता तो सरदार
गैरफायदा घेती याचा गावामधली पोरें
अवगुण त्याचा वाढविती हा गुण्ड आणखी थोरें
श्रीमन्तीच्या, दिलदारीच्या विभवें असतां धुन्द
मना न शिवला कधि मैत्रीचा कावा असला कुन्द
श्रीमन्तीवर त्याच्या भुलुनी मित्र घोळती गोण्डा
दुर्दैवानें जल-वेगानें वाहत गेला ओण्डा '

मानाजीनें उधळणुकीची जाणिव दिधली त्याला
शब्द तयाचे वाहवलेल्या पटले कधि न मनाला

कानाडोळा होऊं लागे कधि शेतीच्या कामीं
मित्रासङ्गें दङ्ग असावें केव्हा सौख्यारामीं
ढिलेपणाला थोडी थोडी होय अता सुरवात
सेवक त्याचे जरा लागले शोकायाला बात
पडत्या विभवीं छिद्रावरतीं थाव घालुनी घोर
पुरें बुडविणें यांत मानिती नीती कोणी थोर
वैभव त्याचें थोर जयाना मुळिं पाहवलें नाही
स्वार्थी कोणी टपले होते उडवायाला लाही
गोड अमृतामधें विषारी पडूं लागले बिन्दू
न कळे कसला लङ्घायाचा आहे त्यांना सिन्धू
भलत्या मार्गीं ओढुनि नेई जरी मुराला गाव
केवळ सगुच्या चतुर हुशारीवरती चाले नाव
सूख हेंच कीं सगुला होते दिवस लोटले काही
मानाजी या नव आशेनें दु:खें विसरुन जाई

दिवस सुगीचे सरले, आता फार उन्हाळा तावे
उघड्या नाङ्गरलेल्या रानीं मृगजळ गोड दिसावें
माय मुराची गेली त्याला पुरें लोटलें वर्ष
घरीं जनाच्या तोण्डावरला आज मावळे हर्ष
कालपासुनी सगुच्या जीवा नव्हतें चैन जरा ही
उदासवाणीं चित्रें मागिल गेलीं पुढुनी काही
आठदिसां जो मुरार गेला होता व्यापाराला
घोडेशर्यत खेळुन नुकता पुण्याहुनी तो आला
मनास त्याच्या आज वेदना जाळित होत्या काही
चित्र मनाचें भेसुर त्यानें परी दाविलें नाही

दिवस साजरा होउन, झाली जखम मनाची ओली
तों तान्ह्याच्या नव रुदनानें भरली सगुची खोली
औदास्याचे ढग मावळले, प्रफुल्ल हृदयें झालीं
‘नातू झाला मानाजींना !’ हळूच वाणी आली
मुरार धाला आनन्दानें मुग्ध आतले आंत
प्रेम बहरलें नवाङ्कुराचा गोड वाहतां वात

अज्ञ जिवाला माहित नसतें परी अरेरे ! काही
एक उडविते रङ्ग लाट, तों दुसरी उडवी लाही
एक खेळते नौकेभवती, अन्य चालते वाट
एक हासवी, दुसरी बुडवी येउन पाठोपाठ
फूल निरामय रम्य हासतें केवळ आनन्दानें
कीड खालुनी मार्ग चालते खाण्याच्या रोखानें
पुलकित होते सुवर्ण तेजें जेव्हां वसुधाराणी
तिमिर येतसें मन्द मागुतीं, करण्यातें धुळधाणी
एक एक दिन पाउल पुढती टाकुनि चाले जीव
परि न कळे की, काळपुरीची जवळ करी तो शीव
क्षण विभवाला सौख्य गणावें आणि रडावें अन्तीं
हसतां हसतां मोरासम कां मग न वाटणें खन्ती ?

मुरार रमला आनन्दानें पुत्रोत्सवविभवांत
‘वीस हजारीं गोता बसला !’ कळलें व्यापारांत
गोड बोलुनी ज्यांनीं केलें मुक्तकण्ठ गुणगान
मोहमयीचे स्वार्थी ऐसा गळा कापिती कान !
धक्का बसला ! हादरलें मन ! हृदयीं झाला खिन्न !
गुणगुण ऐकुनि मानाजींचें हृदय जाहलें भिन्न !

तळमळलें मन, खळबळ झाली हृदयीं वारवार
उदासवाणा बसूं लागला रात्रदिवस मुरार !
यापरि महिने चार लोटतां आला श्रावणमास
आकाशांतुन पडूं लागली जलमोत्यांची रास
केव्हां पिवळें ऊन पडावें जळबिन्दूवर पानीं
झाडावरती अङ्ग चोचिनें झाडावें विहगांनीं
पहिल्यापहिल्या रम्य पिकांनीं हिरवळलेलीं रानें
झुलूं लागलीं वाऱ्यासङ्गें मङ्गल आनन्दानें
खळखळ वाहुन ओढे नेती तासामधली वाळू
तटिंच्या फुलल्या रम्य कण्हेरी, फुटले सुन्दर वेळू
कोठे कोठे अम्मेरीच्या रानी नाचत मोर
केका गाउन, वर आकाशीं बघती नीट समोर
खडकामधुनी एकसुरानें गाती ओढे गाणीं
शेतकऱ्यांच्या मुली गुम्फिती रानफुलांची वेणी
निसर्ग अपुले तेच पूर्वींचे खेळूं लागे खेळ
मुरार मित्रासङ्गें पहिल्यापरी घालवी वेळ

आज पातली नागपञ्चमी ! घेउनि बाळ हिल्ला
सगुणा जाउन आली होती नुकती बहिरोबाला
बाळ गोजिरें घेउन बसला माण्डीवर मानाजी
टक लावोनी त्यावर रमला खोल विचारामाजीं
डोळां पाणी तोंच साठलें ! हळुच सगूला बोले
'पोर येवडं पग्नन् रावबा असते जर का गेले–!'
तोंच दाटुनी गहिंवर कण्ठीं, भरून आला ऊर
शब्द थाम्बले, वाहुं लागले अश्रुबिन्दुचे पूर

मुरार खाली पाहत राहे; सगू रडाया लागे
तुटक्या शब्दीं पिता मनोगत अपुलें तिजला सांगे
'लई ग्वाड ग्ये हिरू ! येवडा जाते पगुनीश्यानी–!
नशिब कुनाच कुनी पगितलं ! ...जालं सपनावानी !'
करना न्हाई देवाजीला आली अम्ची काही !'
पुन्हा थाम्बला, शब्द एकही वदनीं फुटला नाही
एकवार तों हिरू-सगूच्यावरती फेकी दृष्टी
मुराकडे मग बघतां दिसली भेसुर त्याला सृष्टी
तीव्र वेदना आंतुन काही अन्तर करिती खाक
तोंच वाटलें अज्ञातांतुन कुणी मारिली हाक
एकाएकी सगुणेजवळीं देउनि करिंचें मूल
आम्बराइच्या घरास गेला, होउनि आंत मलूल !

नागपन्चमी सण मौजेचा, दङ्ग जहाले सर्व
मुरारसदनीं जणू उदेलें आनन्दाचें पर्व
एक हिरूच्या जीवाकरितां हौशी केल्या नाना
नव्या सणाची दिलीं बक्षिसें त्यानें कितिक जणांना
अजून 'बाबा' आले नव्हते अम्बेराईहून
म्हणून सगुणा अधीर झाली, व्याकुळ मन होऊन
तोंच गडी कुणि सांगत आला 'मालक न्हाई येत !
डोकंदुकिनं त्ये पडल्याती वाडुळचे ऊपरांत !'
धडकी भरली सगुणाहृदयीं ! काम सुचेना काही
आवरुनी ती परी पसारा, करी निघाया घाई
तशी उपाशी सगुणा गेली, जेवण घेउन त्याला
गाडी जुम्पुन मुरार गेला तिजला पोचविण्याला

वाटेवरती कुणी बसविले नाग मातिचे कोठे
कुणी चढविले कडुलिम्बावर झोके मोठे मोठे
तालिमबाजी खेळ चालले कोठे कोठे काही
मध्य शिळला कुठे काकडी पेलुनि धरुनी राही
'चला ग बाई वारूळाला' कुठे घोळका गाई
आर्त मनाला सगुच्या यांतिल दिसलें न परी काही
छपरामध्यें सगू पिसाला जाउनि आधी पाहे
अन्थरुणावर डोळे झाकुनि बाप पडूनी राहे

डोकें दुखतां दुखतां आता चढला भलता ताप
जेर होउनी पडला होता मुग्धपणानें बाप
गिळून टाकी सर्व वेदना सोशिक त्याचा जीव
सगुला पाहुन नयनीं साठे जळरूपानें कीव
परि अश्रूंना ओघळण्याला त्यानें न दिला वाव
लागूं न दिला त्यानें अपुल्या मुग्ध मनाचा ठाव
हात लावुनी अङ्गाला तों सगुणा बोले त्याला
'येरवाळि का कुनी धाडल न्हाई कळवायाला ?
का म्हुन आला हकडं बाबा ?...काय ताप हा देवा !
चेपु डोकसं ?...घास दोन तर माज्या हातुन जेवा !'
ओठ हालले मानाजीचे बोलायाते काही
परि डोळ्यांनीं नुसत्या देई होकाराची ग्वाही
हिरूस घेउन बसला होता मुरार पाठीमागे
शिलोजिच्या हळुवार मनाला अघोर चिंता लागे !
घास सगूनें तोण्डाजवळी नेता बोले बाप
'अजुन उपाशी पोरी ?'' लागे तों कसलीशी धाप

डोळ्यामधले अश्रू अपुले तो दाबाया पाही
पाणी जिरुनी तेथ, सगूच्या नयनीं येउन राही
मानाजीनें तळमळ केली व्यक्त न काहीएक
डोळां पाणी आणुन मरवी त्यास लाडकी लेक

सूर्य टेकला अस्तगिरीवर, वाढू लागे ताप !
भिऊन हृदयीं, सर्व राहिले तिथेच आपोआप
दिवस यापरी चार लोटले चिन्तेचे, भीतीचे
पुढचें पाउल दुखणें पाहून थरके हृदय सतीचें
मित्र शिलोजी क्षण हि न त्याला सोडुन गेले दूर
परस्परांचे कितीकदा तरी भरून आले ऊर
मुरार जाउन येउन राहे, तरि सगुणेशीं काही
खळखळणारी तळमळ मनिंची बाप बोलला नाही !
दिवेलागणी झाली ! कोणी नव्हतें आसोपास
सगू–शिलोजी–मानाजींचे ऐकूं येती श्वास
मन आवरुनी धीर धरूनी मानाजी तों बोले
'सगू ! मुरारी कुठं हाय ग ?' डोळे झाले ओले !
'येतिल आता बरं ! वाटत बरं अता ना बाबा ?'
सगुच्या प्रश्नें दुखू लागला तद्‌हृदयाचा गाभा
मेघ तरळती जळभारानें ओथम्बुन आकाशीं
तसे तरळले भाव अश्रुनीं भिजुनी नयनाकाशीं
जळ डोळ्यांतिल आंत जिरेना एकवटून हि शक्ति
तरळ आसवें–नव्हे, गळाली परस्परांची भक्ती
दुःख गिळूनी मानाजी परि बोले धीर धरून
"पोरी, समदं तुला साङ्गतों ' मन हें जाय भरून !

रडू नगं ! तू लई इचारी, हुशार, शाणीसुर्ती
सङ्गत अमची तुला लाभली एक इसा तर पुरती
अता वाटतं तुला हिरूला डोळे भरुन पगून
जावं, पोरी मुरारसङ्ग मन माज बोलून !"
जरा थाम्बला ! अडखळला—तो मुरार आला आंत
येउन बसला जवळ, जाहलें क्षणभर सारें शान्त
डोळा पाणी आणुन कुन्थत थकलेल्या वाणीनें
उघडें केलें हृदय आपुले अखेर मानाजीनें
हृद्वीणेची तार अश्रुनीं भिजतां थिजला सूर
थाम्बथाम्बुनी बोले, उठतां मनामधें काहूर
'मुरार! आमी पडलों! आता देवावरती भार'
जगनं इथल सरलं ' न्हाई येळ न्हाइला फार!
यात्रा सरली उगीच कशाला गुतवूं साङ्ग सराई !
जिमिन जकडची तकड आता खण्डाची ही जाई !
कुनी करावा शोक फुका अन् कसला, कोनापायी ?
रडूं नगं तू सगू.. !' थाम्बला, शद्ब खोल तों जाई
सर्वाङ्गांतिल खेचुन शक्ती पुन्हा एकदा बोले
'उगी उगी तू पोरी !' भरले आणि तयाचे डोळे
'मुरा जिवाची ग्वाष्ट साङ्गतों एकच आता, ऐक
रागा येवू नगं ! चुका तू केल्या मागं कैक
पैसा गेला लई तुजा पग् ' दिवस कठिन हे आले
गाव गान्जल पैक्यापायीं ! जग हे दुबळं जालं
शेतकऱ्याला आन मिळेना कष्टुन शेतामन्दी
कितेक मेले कष्टून, केवळ बुडल्या कर्जामन्दीं
किती पोरगा नशिबाचा तू, गुनी सगू लइ माजी
अजुन खेळते लक्षिमि होउन तुमच्यावरती राजी

लइ नशिबाचा ! लइ नशीबाचा मुरार तू या गावीं !
पन् ही उधळन् सोड अता पग, तोडिल एका घावीं
किति चालविला पैका, तुटतो मुरार माजा जीव
मालक आता तुजा तूच पग ! येसे लइलइ कीव
सगुला आनिक तुज्या हिरूला पगून फुटते छाती
मुरा, सगूच्या संसाराची तुज्याच दोरी हातीं
हिऱ्यासारकं पोर हिरू हे काडिल अपुलं नांव
पोर केवडा तालिवार तू ! न्हाई का हे ठावं ?
खराब असल्या वागनुकीनं जाइल सारी कीर्त
पैक्यावाचुन कुनी न देतो कुना फुकाचं तीर्त !
जीव तुजा लइ सगुनेवरती, पिर्त जिवाची भारी
सगुना माजी ! सगुना माजी—!' गहिवरली तों स्वारी
झरझर झरझर डोळ्यांतुन तों गळले अश्रूबिन्दू
सगुणेचा तर खालीवरती हेलावे हृत्सिन्धू
मान खालती घालुन बसला मुरार होता मुग्ध
अनुतापानें किंवा न कळे झाला होता दग्ध
गंभीर पसरे रात्र भोंवती आम्बराइचे रानीं
प्रशान्ततेनें ध्वनी दुणावे कमण्डलूचा कानीं
दीर्घ उसासा टाकुन बोले 'उदास का म्हुन् व्हावं?
शेतीभाती आपुन अपुलं घरचं काम पगावं
मुरा, परानावानी जपली पग ही अम्बेराई
समदी माजी तुजीच माया, तूंच जिवाचा भाई !
लई उदळला मुरार पैका, सूद जरा धर आता
देवा म्याच, झेच्यावाचुन न्हाइ पिर्तिचा दाता
मुरार ! देवा सुमरुन आता शिपत घेउनी साक्ष
'आम्बराइला जपन् जिवाच्या पल्याड तुमच्या मागं !

कसा बि आला वक्त तरी मी न्हाई ती इकनार !
तिंतंच राव्हुनश्येनी माज राकिन मी घरदार !'
मुरा शिपत घे ! म्हातान्यावर नग रागाला येवूं
सरलं असच तुला बोलन ! निरोप आता घेवूं !'
वदनीं शान्ती-समाधान तों दिव्य चमकलीं काही
एकमनानें डोळे लावुन मुरार पाहत राही
मनांत ठसले मानाजींचे बोल असे बिनमोल
छटा मुखींची साङ्गे कीं ते हृदयीं भिनले खोल
परन्तु ' आला वक्त तरी मी न्हाई ती इकनार !'
शपथेच्या या शब्दानें तो हसला तालेवार
परि भोतीच्या गंभीरतेनें पाळाया उपचार
उकळी दाबुन त्याच्यासाठी बोले शपथ मुरार
शपथ ऐकुनी मानाजींचें गहिवरलें मन भारी
अथाङ्ग शान्ती चमकत होती वदनीं परि खुलणारी
मुरार-सगुणा-हिरूबरी तो क्षणभर दृष्टी लावी
अन्य दिशेला मग ती वळवी, लिखित वाचुनी भावी !

दृष्टी ठरली तोंच शिलोजीवर, बोलाया काही
आर्त मनाची प्रेमळ इच्छा मुकेपणानें पाही
ओठ हालले ! इकडे तिकडे मानाजी मग पाहे
आणि जरासा डोळे मिटुनी स्वस्थ पडूनी राहे
औषध आणाया तों काही सगुणा गेली दूर
गोन्धळुनी मन हळूच गेला पाठोपाठ मुरार !
गहिवरलें मन मानाजीचें ! मग मित्राचा हात
धरुनि उराशीं प्रेमळतेनें कुन्थत बोले मात :

'शिलू ! असू...दे...लो...!' दाटुनी आला कण्ठ भरून
परी उमाळा दाबुन बोले निमिषानें विनवून
'अम्बेराई आन सगू ही तुजी ! अता सम्भाळ !
मुरार...येडा.. नाही ..' त्येचा हिरू गुनाचा बाळ !
समयावरती मुरार आनिल कोन्यायेळीं घाला !
शिलु तूं मंतर एक जिवाचा सगुला वाचविन्याला
पोर गुनाची . तूच.. जिवाचा !' बोलवलें मग नाही
गाळित अश्रू त्यास शिलोजी अभङ्ग वचनें देई
समाधानुनी मानाजीनें पुनरपि धरिला हात
मुरार.-सगुणा जवळ बैसली तोंच येउनी आत
औषध करितां पुढें, तयानें केला अडवा हात
उशाखालुनी काढुनि काही धरि हृदयाशीं तात
हळूच देई मग तें सगुला, नयनीं आणुनि पाणी
'तुज्या--आइचं .सगू, डोरलं हें घे'— थाम्बे वाणी
धरुनि उराशीं लेणें सगुणा, हृदयीं तों गहिवरली
गभीर शान्ती पुन्हा पित्याच्या विलसे नयनामधली
ओढ लागुनी आंतिल तेजा क्षणभर डोळे मिटले
करी ध्यान तो वाटे, कारण ओठ जरा पुटपुटले
डोळे झाकुन पडला त्याला एक लोटला तास
लक्षण नव्हतें ठीक आज हें ! खुटली त्यांचीं आस
तोंच लोचनें उघडुन बोले, भ्रान्त भाषणीं खोल
'किरन् पगा ह्ये अम्ब्यावरती ! किरन् पगा !' हे बोल-
तरळुन डोळे सगू--मुरारावरती बोले तेंच
'सार दूर त्यो पडदा !' बोले विनवुन हलक्यानेंच
छप्पर--दारावरचा पडदा मुरार सारी दूर
मानाजीची आम्बराइवर दृष्टी झाली चूर !

तेवत होता चन्द्र अम्बरीं, झोंकुनि किरणें खालीं
आम्बराइला दिव्य रुपेरी शोभा होती आली
धावत होते इकडुन तिकडे काही काळे मेघ
भिर भिर वारा घोंघावूनी, घुमवी अपुला वेग
मागेपुढती डुलुनी शेतें, सळसळ वाजति पानें
विश्वात्म्याची गभीर शान्ती सेवित होतीं रानें
डोकें ठेवुन माण्डीवरती सगुच्या, वळवुन मान
क्षणभर रमला आम्बराइवर बाप लावुनी ध्यान !
तोंच 'किरन् ह्ये पगा ! किरन् ह्ये .' पुन्हा बोलला खोल
आणि वेळुच्या मानाजीचा गेला कायम बोल !

काळा ढग तों येउनि राहे नभांत चन्द्राआड
आम्बराइचें तेज लोपुनी मलूल झालें झाड !
वारा पडला ! स्तब्ध जाहला शेतें थाम्बुनि डोल !
भयाण शान्ती चिरुन टाकी रातकिड्याचे बोल !
मात्र एकला समचित्तानें कमण्डलूचा ओढा
गीत आपुलें धीटपणानें छेडित होता थोडा !

---

बहार ७ वा

## शापवाणी

अमृतवाणिनें ज्यानें दिधला जनहृदयास विसावा
कोळपलेल्या जीवलतेला सौख्यचन्द्र जो न्हावा
दुःख आपुलें दूर सारुनी जनहृदयें जो सान्धी
आणि रेशमी प्रेमरज्जुनें कायमची जो बान्धी
नवल कशाचें, कुणी गाळले अश्रू त्याच्यासाठी
किंवा दर्शन शेवटलें जर घ्याया जमली दाटी ?
मानाजीच्या दहनविधीला गाव लोटले दोन्ही
कमण्डलूनें पुरांत नेली राख क्षणी वाहोनी
शोकसागरीं अघोर बुडली मानाजीची लेक
वेळीं-अवेळीं करूं लागली उष्णाश्रूंचा सेक
आयाबाया तिला साङ्गती समजुन परोपरीनें
व्याकुळ होउन मुरार घाली समज आपल्यापरिनें
परि न थाम्बला उष्णाश्रूंचा डोळ्यामधला पाट
धावत होता काळ निरामय ; गेले महिने आठ !

चैत्रपालवी डवरुन गेली तरुवर ठायीं ठायीं
आम्रफळांनीं वेळूमधली भरली राई राई
बान्धावरच्या रानगुलाबावरी कळे मोहरले
सुगन्ध भरिती हवेंत वारे मोगरवेलीवरले
फान्दीफान्दीमधुनी गाई गीत कोकिला गोड
मन्द सुरांनीं ओहळ त्याला देई अपुली जोड

पाण्यावरली हिरवळलेलीं पिकें डोलतीं रानीं
तिथेच घुमलीं शेतकऱ्यांचीं गाणीं मधुर सुरांनीं
सृष्टिसुन्दरी देऊं लागे नित्याचे निज पाठ
आनन्दानें दङ्ग जाहला सारा कृष्णाकाठ
परन्तु सगुणा--हृदयीं नव्हती समाधान वा शान्ती
वाटे तिजला, 'ओहळ सारे निरर्थ गाणीं गाती !'
कुठे विचारीं एकसारखें तिष्ठत तिनें रहावें
आणि गाळुनी अखेर अश्रू माघारी परतावें
कधीं हिरूला कुरवळतांना फुन्दावें हृदयांत
वेळूवरतीं नजर लावुनी कधीं रमावें शान्त
व्रण जीवाचा परि न कुणाला सतीं बोलुनी दावी
डोळे लावुन हवेंत वाची लिखित आपुलें भावी

व्याकुळ झालें मुराचें मन जरि पडत्या काळांत
कृतिनीं अपुल्या तरि तो लागे रुतायच्या गाळांत
प्रथम जिवाला अवघड वाटे मानवांच्या मार्गे
परन्तु सत्ता त्यास आन्धळी हळू करायी लागे
स्वातन्त्र्यानें उद्धरिले जन कितीक नेऊनि वरती
मुराच्या परि संसारा ये कधि न तयानें भरती
स्वैर मनाला गमेल तिकडे वाहत त्यानें जावें
क्षणिक हास्याच्या लहरीवरती तरलपणें नाचावें
स्वैरपणानें अशा, मुराचा जाऊं लागला आब
स्वेच्छाचारी स्वातन्त्र्याला कोण मागतो जाब !
राजरोस तो घोडेशर्यत खेळायास पुण्याला
मित्रासङ्गें जाई आता, बघुनि न अधिकऱ्याला

3633

विचित्र असल्या नादीं, कायम पडे खिशाला भोक
त्याच्या जीवावरती चाले मित्रगणाचा झोक
विवेकशक्ती जागी झाली जेव्हा उद्वेगानें
मित्रगणांनीं तिला निजविली मदिरेच्या पानानें
कधींमधींची मौज लागली व्हाया दरमासाला
दर मासाची कधी पन्धरा, केव्हां आठ दिसाला
गावामधले कुणी कडेचे पोहुन, बघती मौज
दिलदारीवर कुणी घालिती घाला, आणुन फौज
तळमळणारे कुणि वेळूचे, कोणी अम्भरीचे
वडीलकीचे शब्द साङ्गती स्नेही आजवरीचे
सगुणेची तर साङ्गुन थकली दुखावलेली वाणी
डोळे झाकुन, मुरार राहे ओढत अपुली घाणी
तीनच वर्षें गेलीं, सरलें द्रव्य आणखी पैसा
कुबेरधन ही पुरेल का, कुणि वाहत जातां ऐसा ?

वैभवकाळीं जिने सुखावें आनन्दूनी जीव
आपत्काळीं उद्धवमात्रें तिच्याच सरतें हीव
वैभवकाळीं फिटे पारणें बघुन जयाला डोळां
आपत्काळीं तदवलोकनें उठतो पोटीं गोळा
वैभवकाळीं चालुनि येतां, जी वाटावी गङ्गा
आपत्काळीं तिनें गाठलां आग लागते अङ्गा
वैभवकाळीं प्रेम जयाच्या भेटीसरशीं दाटे
आपत्काळीं दर्शनमात्रें सलती ज्याच्या काटे
पुत्र जाहला सुरूप दुसरा सगुणेला जों आतां
मुरार-जीवा क्षणभर वाटे असेंच, वैभव जातां

परि आईची निर्मळ माया कधि ही ढळणें नाही
हिमालयासम थोरपणें ती सन्तत निश्चळ राही
उलट, रवीच्या प्रखर आतपें वितळाया ती लागे
शुद्ध जलानें हृदयामधली गङ्गा भरुनी, भागे
सगुणेवरलें प्रेम तयाला एकसारखें ओढी
आणि वाटली केरूविषयीं नन्तर त्याला गोडी
ऋण काढोनी सणास केली मुरारनें सुरवात
काळ उलटला ! कोणाचा मग कुणी धरावा हात !

ग्रीष्मर्तूचें ऊन कडकलें कौलारावर फार
उठुन धुरोळा, कधीं दुपारीं ये वळवाची धार
भासू लागे घरीं हलाखी, होउन ओढाताण
तळमळ होउन सगुला घडलें रोज अश्रुचें स्नान
संसाराला विटुनी लक्ष्मी, घेइ काढता पाय
सगू बिचारी होत चालली रात्रन्दिन असहाय
डोळा ठेवी कुणी घरावर, कुणी खिलारावरती
स्वार्थबुद्धिनें कुणि शेतावर करि कर्जाची भरती
नजर स्वार्थी अम्बेराईवरी कुणाची खिळली
पापी दृष्टी दुष्ट कुणाची सगूकडे ही वळली
जो तो अपुल्या योग्य सन्धिची पाहत होता वाट
दुर्दैवानें सर्व बाजुंनीं त्यात पुरविली पाठ
नाङ्गर विकला त्यानें गेल्या रङ्गपन्चमीसाठीं
आणि कराया चैन, जमविली मित्रगणांची दाटी
अनेक केले रङ्ग तयानें उसना आणुनि पैसा
गावकऱ्यांनीं मौज उडविली, बुडवुन त्याला ऐसा

सुटे कासरा, कोण उतरणीवरी आवरी गाडी ?
महापुरांतुन वाचविण्याला दावी कोण धडाडी ?

अवर्षणानें दुष्काळाची पडली पुरती छाया
हात मारुनी कुळें लागलीं मुरारला बुडवाया
हळूहळू मग पैशासाठी विकलीं त्यानें शेतें
हपापलेले सजले त्याला पैसे द्याया जे ते
पैशासाठी, पोटासाठी गहाण पडला वाडा
हळूहळू मग गाडी, घोडा, मोट आणखी नाडा
उरल्या सुरल्या आम्बराइचा जेव्हां थकला सारा
अधिकाऱ्यांनीं गुरें नेउनी आवरलाच पसारा
सोडुन गेलीं गुरें, माणसें, वैभव, कीर्ती त्याला
आपत्कालीं जैसा इमला सोडितसे जोत्याला
अजुन न होई अम्बेराई विकावयाला धीर
चिन्ताजालीं गुन्तुन गेला कधी कधी मग वीर
गतविभवें ही क्षणांत मिळवूं सोडत जिङ्कुन मोठी'
हिंमत ऐशी मित्रगणानीं नित्य घातली पोटीं
हितशत्रूनीं स्वार्थ साधुनी चोरुन केले वार
वेड्या असल्या आकाङ्क्षेनें मुरार बुडला पार
यापरि वर्षें पांच लोटलीं, उरला नाहीं थारा
हिरु-केरूना मात्र लागला दारिद्र्याचा वारा !

उरली होती अम्बेराई केवळ आधाराला
विरङ्गुळा हा एकच होता सगुणेच्या जीवाला
शिलेजिची पण अडचण होती मार्गावरती मोठी
गावकऱ्याचे भाव परतले म्हणुन येउनी ओठीं

परन्तु जेव्हां घडावयाचें नसतें नीटच कांही
कुयोग जुळती अपाप, कांटे जमती ठायीं ठायीं
' देवदेव ' तों करावयाला रत्नागिरीच्या प्रान्तीं
जाय शिलोजी पत्नीसङ्गें, मिळवाया हृच्छान्ती
सर्व व्यवस्था साङ्गुन सगुला गेला जरि तो गावा
कसा कळावा स्त्रीबुद्धीला गावकऱ्यांचा कावा ?
अम्बेराईवरी सारखा होता त्यांचा डोळा
मोहविता मन मुरारजीचें, हळू लागला दोला
कुणी उठवुनी शहर पुण्यांतिल जङ्गी शर्यतहूल
चेतविलें मन त्याचें, देउन वर मदिरेची भूल
अम्बेराई-विक्रय आता व्हाया काय उशीर ?
एकामागुन एक लागले पुढें यावया वीर
मानाजीच्या थोरपणाची स्मृती कुणाला राहे !
मित्रगणांच्या लहरीवरती मुरारमानस वाहे
धूर्त त्यांतले कुणी मुराला घेउन गेले दूर
गुप्तपणानें सवाल करण्यामाजीं झाले चूर
कशास गेले दूर शिलोजी यावेळीं परगावीं !
शपथ मोडते मानाजींची ! कुणि तिज साम्भाळावी !
अखेर सरशी कुणी **गेनबा** नामें जरठें केली
आणि मुराची अम्बेराई घरांत त्याच्या गेली ! !
विक्रय होऊन, मुरारजीच्या पैसे पडले हातीं
दैव बोललें ' कळल्यावर हें सगुनें खावी माती !'

रवि अस्तवला ! काळ्या छाया अवतरल्या भेसूर !
किरकिर रडवा रातकिड्यांचा चालू झाला सूर !

सुटे कासरा; कोण उतरणीवरी आवरी गाडी ?
महापुरांतुन वाचविण्याला दावी कोण धडाडी ?

अवर्षणानें दुष्काळाची पडली पुरती छाया
हात मारुनी कुळें लागलीं मुरारला बुडवाया
हळूहळू मग पैशासाठी विकलीं त्यानें शेतें
हपापलेले सजले त्याला पैसे द्याया जे ते
पैशासाठी, पोटासाठी गहाण पडला वाडा
हळूहळू मग गाडी, घोडा, मोट आणखी नाडा
उरल्या सुरल्या आम्बराइचा जेव्हां थकला सारा
अधिकाऱ्यांनीं गुरें नेउनी आवरलाच पसारा
सोडुन गेलीं गुरें, माणसें, वैभव, कीर्ती त्याला
आपत्काळीं जैसा इमला सोडितसे जोत्याला
अजुन न होई अम्बेराई विकावयाला धीर
चिन्ताजालीं गुन्तुन गेला कधी कधी मग वीर
गतविभवे हीं क्षणांत मिळवूं सोडत जिङ्कुन मोठी'
हिंमत ऐशी मित्रगणांनीं निरय घातली पोटीं
हितशत्रूनीं स्वार्थ साधुनी चोरुन केले वार
वेड्या असल्या आकाङ्क्षेनें मुरार बुडला पार
यापरि वर्षें पाच लोटलीं, उरला नाहीं थारा
हिरु-केरूना मात्र लागला दारिद्र्याचा वारा !

उरली होती अम्बेराई केवळ आधाराला
विरङ्गुळा हा एकच होता सगुणेच्या जीवाला
शिलोजिची पण अडचण होती मार्गावरती मोठी
गावकऱ्यांचे भाव परतले म्हणुन येउनी ओठीं

परन्तु जेव्हां घडावयाचें नसतें नीटच काही
कुयोग जुळती अपाप; कटि जमती ठायीं ठायीं
' देवदेव ' तों करावयाला रत्नागिरीच्या प्रान्तीं
जाय शिलोजी पत्नीसङ्गें, मिळवाया हृच्छान्ती
सर्व व्यवस्था साङ्गुन सगुला गेला जरि तो गावा
कसा कळावा स्त्रीबुद्धीला गावकऱ्यांचा कावा ?
अम्बेराईवरी सारखा होता त्यांचा डोळा
मोहविता मन मुरारजीचें, हळू लागला दोला
कुणी उठवुनी शहर पुण्यांतिल जङ्गी शर्यतङ्गूल
चेतविलें मन त्याचें, देउन वर मदिरेची भूल
अम्बेराई-विक्रय आता व्हाया काय उशीर ?
एकामागुन एक लागले पुढें यावया वीर
मानाजीच्या थोरपणाची स्मृती कुणाला राहे !
मित्रगणांच्या लहरींवरती मुरारमानस वाहे
धूर्त त्यांतले कुणी मुराला घेउन गेले दूर
गुप्तपणानें सवाल करण्यामाजीं झाले चूर
कशास गेले दूर शिलोजी यावेळीं परगावीं !
शपथ मोडते मानाजीची ! कुणि तिज साम्भाळावी !
अखेर सरशी कुणी गेनबा नामें जरठें केली
आणि मुराची अम्बेराई घरांत ज्याच्या गेली ! !
विक्रय होऊन, मुरारजीच्या पैसे पडले हातीं
दैव बोललें ' कळल्यावर हें सगुनें खावी माती !'

रवि अस्तवला ! काळ्या छाया अवतरल्या भेसूर !
किरकिर रडवा रातकिड्यांचा चालू झाला सूर !

रात्र माजली घोर ! घरावर घुबड आरडे घू घू !
कोट्यांमध्ये आवाजाने म्याले चिमण्या-राघू !
वारा बोले 'अदृश्यातली ही शापाची वाणी !'
लक्ष न देतां, कमण्डलू पण गात चालला गाणीं

---

बहार ८ वा

## प्रीतीसाठी

अम्बराइचा हातामधला सुटता पुरता बाण
चरफडले जन अम्भेरीचे, गमावतां ही खाण
उगवायाला सूड तयाचा, करावया धुळधाणी
खेळायाला जुगार, गेले मुरास घेउनि कोणी
आज पन्धरा दिवस जाहले जाउन त्यास पुण्यास
हुरहुरनी मन, सगुच्या जीवा लागे त्याचा ध्यास
परोपरींनीं शेजाऱ्यानीं दिली टोचणी तिजला
पडल्या काळीं दुःखाश्रूंनीं पदर सतीचा भिजला
तिजभवति ही जाळें आता विणू लागले कोणी
तिच्या स्थितीनें समाधानलें कोणी उल्हासोनी
अजुनि शान्तले नव्हते चिर्चीं तरि ही भाईबन्द
धिःकाराचे वचन बोलुनी मानिति ते आनन्द
कशी कळावी तिची थोरवी, पार्थिव या क्षुद्रांना,
गुणगम्भीरा सती जाहली प्रिय जी देवाजींना ?
दारिद्र्याची आग लागली जाळायाला पोट
अन्नाखातर मिटले होते घट्ट सतीनें ओठ
वसनें साधीं, घरकामाच्या भाण्ड्यावाचुन काही
अता सतीच्या पोराबाळा घरांत उरलें नाही
सरलें सारें धान्य घरांतिल, खावें आता काय ?
त्यांत शिळोजी गावाहूनी आले नव्हते हाय !
मुलांकडे ती पाहुन, अश्रू एकसारखे ढाळी
जठराग्नीची आत वेदना हाय ! हाय ! तों जाळी ! १३००

उपकाराचे डोंगरच कुणाचें ओझें आता घ्यावें,
कुणि पाहींना ढुङ्कुन ही, मुख कोणा वेड्गावावें !
जळूं लागला जीव, उपाशीं दोन सोनुलीं बघुनी
सुजले डोळे रडतां रडतां, पोटाशीं तीं धरुनी
आजवरी जी कुठे न गेली, ही थोराची सून
तिलाच आता जाणें आलें, जातां दैव फिरून
धीर धरोनी हळूच उठली योजुनि काही बेत
गहाण थाळी ठेवायाचा होता मनिंचा हेत
पदराखाली घेउन थाळी हलकें आली दारीं
तोंच पुण्याहुन परतुन आली मुरारजींची स्वारी

आनन्दाचा सागर हृदयीं उचम्बळोनि आला
पतिला पाहुन आनंदाचा दारीं स्वर्ग उदेला
धावत येउन तोंच हिरूनें मिठी मारिली त्याला
लडिवाळपणें शब्दांनीं तो आळवि बाळ पित्याला
पाहत राहे उभाच जागीं विस्मित केरू स्तब्ध
पतिपुत्रांच्या मुखा न्यहाळी कुतुकें सगुणा मुग्ध
चुम्बुनि बाळा वात्सल्यें तो घरांत गेला नीट
कळलें मग की खायालाही घरांत नाही पीठ
आम्बराइचा सारुनि पैका सारा, केविलवाणें
आला होता परत घराला मुरार मुग्धपणानें
शब्द न बोले जरी त्यांतले सगुणा काहीएक
डोळ्यामधुनी चालू झाला तरि अश्रूंचा सेक
परि मैत्रीची गात थोरवी धीर तिला तो देई
आणि निघाला विश्वासानें आणायातें काही

# प्रीतीसाठीं

ग्रंथ संग्रहालय

रवि मावळला ! अन्धारानें भरली दुनिया सारी
चारा घेउन पक्षिगणाची परतुन जाय भरारी
दिवे लागले घरांत आता साऱ्या अम्मेरींत
खिन्नपणें परि मुरार होता उभाच अन्धारांत !
घालुनि कोणी धिःकाराचे जहरी घाव जिव्हारीं
तोडुनि टाकी मुरास, येतां याचक म्हणुनी दारीं
हाय ! लोटले दूर तयाला, केली नाहीं कींव
काळ उलटला पुरा ! मुराचा व्याकुळ झाला जीव !
मित्रांच्या या दुर्वचनांनीं मुरार होऊन विद्ध
आल्यापायीं परतुन गेला, होउनिया हतबुद्ध !
हिरवें पिवळें दिसूं लागलें त्याला अन्धेरीनें
हृदय दाबुनी धरी, गाठलें तोंच पुन्हा घेरीनें
रस्त्यामधल्या नळखुन्ध्याला जरा टेकला मागे
भिरभिर डोकें हवेमधें तों भ्रमण कराया लागे
जीवित झालें त्यास नकोसें, दिसतां चरित समोर
अन्धारीं तों बाळें दिसलीं पुढें उपाशी, घोर !
झर झर झरले अश्रु ! घराला ओढुनि नेती पाय
थबकत चाले ! मधे हुन्दका देउनि, वदला ' हाय ! '
पुन्हा एकदा खिसा आपुला चाचपुनी तो पाहे
एकच पैसा सर्व धनांतिल आता हातीं राहे
गुङ्गत, नकळत दारीं आला, होउनि हृदयीं खिन्न
वळचणिला तो उभा राहिला, हृदय होउनी भिन्न
मनांत बोले, ' काय सगूला जाउनश्येनी साङ्गूं ?
आन मागन अता कोनच पायापाशीं मागूं ?'
तोंच येउनी सगुणा दारीं डोकावी बाहेर
सहज दिसे तिज निज जीवाचें अन्धारीं माहेर

हळूच मारी हाक तयाला, मुरार गेला आत
भात उमजलीं परस्परांचें दोघें मुग्धपणात
सञ्जवात तों कधिच घराची होउन, बाळें दोन्हीं
भाकर खातां खातां, आली साखुगत आनन्दोनी
मनांत बोले, 'भाकरीस का यावें इतुकें मोल,
की बाळांनीं त्यांतच घ्यावा स्वर्गसुखाचा डोल !'
दृश्यानें या मन निवलें क्षण आणि पेटलें पूर्ण
धोरण पाहुनि सगुणेचें तर शतधा होय विदीर्ण
बळें बळे तो तिच्या हातची भाकर खाई थोडी
हीनपणाच्या या ससारीं त्यास न वाटे गोडी
कितीक केले प्रश्न सगूनें मूक परी तो राहे
करपुन जाई आंत कशाच्या तरि तळमळिच्या दाहें
दीर्घ उसासे टाकित बसला येउन तो सोप्यांत
स्नेहाभावीं दीप भिणभिणे वरती कोनाड्यांत
पडली होती तोण्डावरती कोनाड्याची छाया
अन्धारानें पूर्ण घेरिलें होतें बाह्य जगा या
अन्धाराचें राज्य माजलें अघोर त्याच्या हृदयीं
उभी राहिली समोर वृत्ती मित्रगणांची अदयी
तोंच वाटलें मानाजीची बोले येउन मूर्त—
'पैक्यावाचुन् कुनी फुकाच कुना न देतो तीर्त !'
हृदय करपुनी, दीनपणानें खाली लवली मान
दारामधल्या तों फकिराचें कानीं पडलें गान—

## २ पैसा

[गझल]

भाई, जगांत सारा पैसाच एक प्यारा
पैसा असे जिवाचा स्वर्गीपरी निवारा १

पैसाच दिव्य दृष्टी, पैशात सर्व सृष्टी
पैशात अश्रुवृष्टी स्नेहाळ, भाव सारा २
पैशामुळेंच ताई, पैशात बापमाई
पैसाच मित्र, भाई, पैसाच पुत्र दारा ३
पैशांत शील, शक्ती, सौन्दर्य, धर्म, भक्ती
पापामधून मुक्ती, पैशामुळें दरारा ४
पैशामुळें जिव्हाळा, पैशास पुष्पमाळा,
पैशामुळें स्तुतीची ये थोरवी अगारा ५
पैसा असेल हातीं, सौवर्ण होय माती
पैसाच येथ नीति, वा कीर्तिचा नगारा ६
'हातीं असेल पैसा या तोंवरीच वैसा' !
श्रीनेंच थोर ऐसा केला असे पुकारा ७
पैसा नसेल त्यानें का हें जिणें शिणावें !
हा धर्म, कायदा हा; पैशाविणें न थारा ! ८

नाग बिळांतुन सळसळ येई मोहुनिया पुङ्गीनें
मुरार तैसा बाहेरी ये गाण्याच्या गुङ्गीनें
हृद्भेदक तें सत्य ऐकुनी गज्जलगीतांतील
जीव होउनी व्याकुळ त्याचा खचूं लागला दील
उभा राहुनी ओट्यावर तो क्षण अपुल्याशीं बोले
तळमळुनी मन, कृतज्ञतेनें फकीरास मग बोले–
'गान किति हें ग्वाड फकीरा, लाखाच त्या मोल
पुना पुना म्हन् पगू, जिव्हारीं भिडल माझ्या खोल !'
फकीर लागे पुन्हा गावया, तोही एक मनानें
दारापुढती ओट्यावरती गुङ्गत राहे गानें
अनुभूतीनें पटलें होतें सत्य मना भरपूर
गीत सम्पतां घळघळ आले डोळ्यामधुनी पूर !

कन्दीलाचा उजेड थोडा पडला तोण्डावरती
आणि मुराच्या नयनामधली दिसे फकीरा झरती
आवरुनी मन, पुटपुटला तो ' लाकाच त्या मोल !
खरं हाय हें ! ' हात तयाचा खिशांत गेला खोल
एकच होता पैसा, देउन तोही बोले त्याला
' लाकाचं या मोल दिडकिला ! देतों पन् ही तुजला ! '
पैसा घेउनि, दुवा देउनी फकीर गेला दूर
मुरार राहे तिथेच, लागुन जीवाला हुर्हूर !

समोवताली दाट माजलें अन्धाराचें रान
निजलीं शेतें, पेङ्गत होते तारे थोर लहान
भेसुर सृष्टी खद्योताचे दात विचकुनी दावी
भयाणतेचीं भेसुर चित्रें मुरास दिसलीं भावीं
गज्जलगीतामधलें कानीं अजुनी घुमले सूर,
भोवतालची काळी राई दडपुन टाकी ऊर !
आणि खळखळा 'प्रीती म्हणजे यज्ञ ' गात हें गान
कमण्डलुचा ओढा चाले, पूर्ण विसरुनी भान

कन्दीलाचा उजेड थोडा पडला तोण्डावरती
आणि मुराच्या नयनामधली दिसे फकीरा भरती
आवरुनी मन, पुटपुटला तो ' लाकाच त्या मोल !
खरं हाय यें ! ' हात तयाचा खिशांत गेला खोल
एकच होता पैसा, देउन तोही बोले त्याला
' लाकाचं या मोल दिडकिला ' देतों पन् ही तुजला ! '
पैसा घेउनि, दुवा देउनी फकीर गेला दूर
मुरार राहे तिथेच, लागुन जीवाला हुर्हूर !

सभोवताली दाट माजलें अन्धाराचें रान
निजलीं शेतें; पेङ्गत होते तारे थोर लहान
भेसुर सृष्टी खद्योताचे दात विचकुनी दावी
भयाणतेचीं भेसुर चित्रें मुरास दिसलीं भावीं
गङ्जलगीतामधलें कानीं अजुनी घुमले सूर,
भोवतालची काळी राई दडपुन टाकी उर !
आणि खळखळा 'प्रीती म्हणजे यज्ञ ' गात हें गान
कमण्डलूचा ओढा चाले, पूर्ण विसरुनी भान

———

बहार ९ वा

## कसोटी

सगुणेनें हें पाहुन त्याला हळुच मारिली हाक
दचकुनि, गेला घरांत क्षणि तो, वाटुनि काही धाक
आंत काम्बळ्यावरती पडला, व्याकुळ होउनि फार
सरल्या रात्रीं झोप न आली, जाळी एक विचार
'हाय! दुकवली पिर्त जिवाची! दोन सोनुलीं माजीं!
जळलं सोनं हाय! कोळसं आलं हातामाजीं !
करूं सुखी मी कशी सगूला, सुखवू कशिं हीं पोर ?
आग लागली! आग लागली हाय जिवाला घोर!
तोण्ड कुनाला ह्यं दावावं! गेलं माजं नांव !
फुल येचिलीं तत गोवन्या येचाया का न्हावं ?
सगुना माजी! पिर्त जीवाची–दोन सोनुलीं माजीं!
नग नग ह्ये गाव! चलाव कुटं तरी का आजी ?
खिनभर आतां नगं रहान! जाव परमुलकाला !
सगुच्या पिर्तीसाठी जावं निघुनी का मुमईला ?'
विचार येतां शेवटला, तो चमके फार मनांत
गतजीवन तें उभें राहिलें समोर अन्धारांत
यत्न जिवाचा करावयाला प्रीती शिकवी त्याला
उद्योगाला जायाचा तर निश्चय त्याचा झाला
पहाट झाली तरी अजूनी बघुनी त्याला जागा
प्रश्न विचारी सगू 'जिवाला काय जहाल साङ्गा !'
पुनःपुन्हा ती तेंच विचारी, करुनी त्यानें धीर
निश्चय मनिंचा साङ्गितला, तिज लागे हृदयीं तीर !

शीतल सुखकर वाहु लागले झुळझुळ वारेशीत
एकामागुन एक नभींची विझूं लागली ज्योत
उदयगिरीवर मोहरला तों अरुणाचा अनुराग
झाडांमधुनी चराचराला येऊं लागे जाग
घरटें सोडुन जो तो जाई उद्योगाला दूर
सगुणा-हृदयीं परी माजलें दुःखाचें काहूर
आळवुनी ती पतिला निश्चय सोडुनि याया साङ्गे
'इतेंच राबा शेतामन्दीं !' हेंच सागणें मागे
अम्मेरीला आणि जनांला कायमचा जो विटला
काय शिणावें जीवित त्यानें, सशय जेथें फिटला ?
शिलोजिचीही भेट घ्यावया नुरली त्याला आस
आजच रात्रीं निघावयाचा निश्चय ठरला खास !

परोपरीची करुण विनवणी पटली नाहीं त्याला
उत्सुक नव्हता शेतासाठीं मुळिं तो राबायाला
मानाजीच्या शपथपूर्तिचा आठव सगुणा देई
अढी न सुटली; अपमानाचें चित्र पुढें तों येई !
शिलुकाकाला परतायाला दिवस राहिले थोडे
तरी मुम्बईकडे मुराचें चित्त सारखें ओढे

पैसाअडका जवळ न काही, तरि निधड्या छातीनें
उद्योगाला जाया सजला, घालवितां प्रीतीनें
पाहुनिया हें, सगुच्या बसली मनास मोठी भीती
प्रीती बदली 'काय करात ?' चिन्ता उपजे चित्तीं
कोळपलेल्या अखेर हृदया सुचली एकच तोड
तिला मुराच्या प्रीतीवाचुन नव्हतें काही गोड

मानाजीची, प्रेमळतेची खूण डोरलें एक
मायस्मृति ही जपून ठेवी विश्वासाची लेक
आजवरी जें सन्मानूनी जपलें जीवापाड
करणें आलें तें हातानें आता दृष्टीआड !
हाय ! जिवाच्या तीव्र वेदना कुणा सांगणें काय ?
विकावयाचा धीर न होई अबलेला असहाय !
परन्तु पडला तिच्या जित्राला चहूकडूनी पेच
मूर्त पित्याची उभी राहिली डोळ्यापुढती तोंच
नजर मूर्तिवर वरती लागे, अश्रू त्यांतुन खाली
एकामागुन एक निसरले सरसर येउन गाली
'रडू नगं तू पोरी ! माज इकुन डोरलं टाक !'
वाटे तिजला मूर्त बोलली, हळुच मारुनी हाक
स्वप्न लोपलें पुढलें ! सगुणा भानावरती आली
प्रीतीसाठी निष्ठुर कर्तव्याला सिद्ध जहाली

सायङ्काळीं घरांत होतें चारजणांचें अन्न
मुरार बैसे हिरु-केरूंना सङ्गें घेउनि खिन्न
ब्रह्माण्डाची भेसुर चिन्ता गेली डोळयापुढुनी
उष्ण आसवें अङ्गावरती ओघळलीं मग कढुनी
'कस व्हतं अन् कस जहाल' ! अपुल्याशीं तो बोले
क्षण मोहानें 'जावं ! न्हाव' ! ऐसें मन आन्दोले
तोंच सगूनें मुलिं न जेवतां, अपुला बान्धुनि शेर
जिवाहुनी प्रिय मुरास दिधला, समजुनी मन थोर
मुरा निघाला ! पुनः एकदा तिनें विनवणी केली
परि मुग्धत्वें त्याच्या, विनती सतिची वाया गेली

ढसाढसा मग रडूं लागलीं दोघें ओथम्बून
रडूं लागलीं मुलें अकारण, त्यांना रडत बघून !
डोळे पुसले तोंच सगुणेनें, जरा धरूनी धीर
दिले पन्धरा रुपये त्याला, पुन्हा ओघळे नीर
विस्मित झाला मुरार, गेला पुनरपि भाम्बावून
'नगं नगं ह्यो पैका मजला' बोले परत करून
'अस नका वङ्गाळ बोलुं ह्यें ! दिला आमुचा ठेवा
परसन अमुचं दिलं तुमाला, जपून वागा, देवा !'
अशाच परिनें समजावोनी तिनें घातली आण,
आणि घातलें खिशांत त्यानें सुभगसतीचें वाण !

अन्धाराचा सागर काळा दोंलोकांमधिं भरला
चमकूं लागे फेस अम्बरीं काळ्यालाटांवरला
दाट माजली घरांभोवती काळोखाची छाया
अन्धारानें अन्तःसृष्टी होय मुराची जाया
जड हृदयानें निरोप घेउनि, मनामधें करपून
मन्द पावलीं मुरार गेला मान जरा हरपून
अन्धारातुन वळून पाही पुनःपुन्हा तो मागे
धार अश्रुची, पैरण त्याची भिजवायाला लागे
दिसलें नाही मुळींच कांहीं सगुणेला अन्धारीं
किती वेळ परि फिरली नाही दारांतुन माघारी
पुन्हा एकदा फुटला मोठा हृदयांतून उमाळा
बापुडवाणी बघुनी बाळें गहिंवरली वेल्हाळा
कोण, कशाला, कोठे गेला, कुणास कळलें नाही
खिन्न मनानें मात्र परतली दीन मुलांची आई !

मुरार-हृदयीं होमकुण्ड तो पेटुनिया वेगानें
जळूं लागलीं पापें आंतील आता अनुतापानें
करपुन गेले अश्रू त्याचे उडून मनीं काहूर
काटित चाले मार्ग एकला अन्धारातुन दूर
रहिमतपुरच्या थाम्ब्यावर तों घण् घण् घण्टा वाजे
हादरुनी मग मुरार येई भानावर आवाजें
अज्ञातांतुन सतेज गर्जत यावी कविची वाणी
अन्धारांतुन त्यापरि आली गाडी, फुङ्कित गाणीं
गडबडुनी मन यन्त्रच बनलें, शिरतां ध्वनि कानांत
निमिषभराचा खेळ ! बैसला मुरार जाउनि आत
बुभुःकार तो पुन्हा जाहला, बेसुर गर्जे शीट
धक्का बसला, मेघामधली चपला गेली नीट
दूर नभांतुन वातावरणीं घुमले तीचे नाद
तेथुन खालीं कृष्णासलिलीं उठली अस्फुट साद
विश्व शान्तलें; शोकावेगें किंवा भरले ऊर ?
कमण्डलू ही गुणगुणला, पण ऐकुं न आले सूर !

बहार १० वा

## सुखस्मृति

आवेगानें गाडी धावे सैतानापरि धीट
मधेंच गगना गर्जुन टाकी, फुङ्कुन अपुली शीट
वेगासरशीं झाडें डोङ्गर पळती मागे मागे
मुरास वाटे ' सृष्टी ही का सोडुन जाया लागे ? '
धावूं लागे सैरावैरा मानस त्याचें क्षुब्ध
पुढेंच धावे गाडीसङ्गें परि तो राहे स्तब्ध
सृष्टीचे पट अस्फुट गेले जेव्हा पुढुनी दूर
जीवन दिसलें मागिल, उठलें आणि मनीं काहूर
तोंच तुणतुणें, डफ वाजवुनी कुणी लावणी गाई
मुरारचें मन खडबडुनी तों सहज ओढलें जाई

## ३ दारूची लावणी

गुणगम्भीर धनी । पुरे निशापाणी । झाली ससाराची धुळधाणी
विनविते जोडून । हात, पायां पडून । सोडा दारू, ऐका
पवढी वाणी ॥ धु० ॥

होती दारीं झुलत । किति लक्ष्मी डुलत
भरल्या घरांत नव्हती वाण
गुरें ढोरें वाडा । बैल गाडी घोडा ।
धनधान्य वाळें गुणखाण
शेतवाडींत किती । पिकलें सोनें मोतीं
फुलाफळांनीं भरली राई

ग्रंथालय

पाखरांना चारा । गरिबांना थारा
करण्याची किती चतुराई
मोहर आला किती वैभवाला
किति कीर्तीस बहर पालवला
प्रीत जडली थोर । गेला जिवाचा घोर
एक झालों राघूमैनेवाणी
पुरे निशापाणी । झाली संसाराची धुळधाणी १

गेला सुखाचा काळ । किती सङ्गं, न ताळ
फिरलीं भोवती सोनेरी किरणें
नव्हतें जीवास भान । केलें प्रीतीचें पान
जणु ढगांत विजलीचें फिरणें
तोंच मोडावया । आली कशी वया
गेली जादूभुलावण करुनी
काय साङ्गावी गत । सख्या, नेलें सङ्गत
तिनें रात्रन्दिन हात धरुनी
झाली क्षणात वैभवाची माती !
गेलीं घरें, गुरें शेतीभाती !
लागे दैवाचा बाण । झाली घरात वाण
आल्या गेलें वळचणीचें पाणी
पुरें निशापाणी । झाली संसाराची धुळधाणी २

घरीं झाला अन्धार । डोळां पाण्याची धार
नाहीं उरला घरामधिं दाणा
पाङ्घराया नुरे । हुडहुडी भरे
कुठली मायेची ऊब् ध्यानीं आणा
घडले उपास पोटा । प्राण आले कण्ठा
बाळें झालीं किती दीनवाणी

जणु दुधार सुरी । जाई चिरत उरीं
बान्धवाची जीवघेणी वाणी !
साङ्गू कुणा जिवाची मी हाय !
पाहूं पोटीं कुणाच्या मी माय !
आता, बाळांची आण । द्याहो एवढें दान
किती गाऊं नाथा ! रडगाणीं ।
पुरे निशापाणी । झाली संसाराची धुळधाणी ३

गोड रङ्गलें गाणें त्याचें, जन झाले तल्लीन
चवली, पैसा कुणी अधेली देती थोर लहान
गाणें ऐकुनि अनुतापाचें डोळ्यामधुनी पाणी
टपके खाली गालावरुनी पानदहिंवरावाणी
खिशांत गेला कर स्वभावें, दिसली सगुची मूर्ती
' जपून वागा !' वचन थाम्बवी, न करी आशापूर्ती
शाहीराला अश्रूवाचुन द्यावें त्यानें काय
कोण जाणतो व्याकुळलेल्या दीन मनाची हाय ?

दोन दिसांनी मुम्बापुरिच्या परेळच्या गिरणींत
मुरार गेला उद्योगाला दीनजनासमवेत
गिरणीमध्यें दिसले त्याला पोटाचेच हमाल
पूर्वस्मृतिंनीं त्याच्या, केला हळवा जीव कमाल
वाटे त्याला ' पोट—अरेरे ! काय चीज ही देवा !'
पोटासाठी हाय, करावी कुणी , कुठे ही सेवा !'
आणि मागलें जीवित दिसलें मनश्चक्षुला सर्व
आणि कळालें कसा जाहला हरण आपुला गर्व

कशी बशी मग मिळे नोकरी पन्चवीस रुपड्यांची
उपकाराच्या भारें झाली गुलाम वृत्ती त्याची

परेळमधल्या कोन्दटलेल्या गल्लीमधली खोली
अता मुराचा आश्रम झाला, जमीन जीतिल ओली
काळीं भुरकीं जुनीं केम्बरें कधिचीं लोम्बुन वरती
भिववित होतीं भेसुर रूपीं नजर नवी ओझरती
भिन्तीवरला मेन्चटलेला धुरकट काळा रङ्ग
दारिद्र्याचें रूप दावुनी करी मनाचा भङ्ग
ओबडधोबड भिन्तीमधल्या पुढती आल्या कोचा
ढेकुण-पिसवा-डासां झाल्या निवास मधल्या खाचा
कोन्दटलेल्या दमट हवेची भरूनिया दुर्गन्धी
मृत्युलोकच्या व्यापाराची चालवि तेजीमन्दी
भेसुर येउन तीच कल्पना किंवा काय मनांत
रविचीं किरणें धजलीं न भुलीं शिरावयाला आत
कर कर वाजुन दार मोडकें, गळे पिठाचा चूर
सताड उघडें पडलें तरिही राहे आंतच धूर
निजावयाला पुरेल इतुकी लाम्बी रुन्दी थोर
कुणी म्हणावे ' इथे डाम्बले तुरुङ्गांतले चोर '
तीन वितीची निरुन्द पडवी दाराच्या बाहेर
बाया, बापे आणि मुलांचें झालें जणु माहेर
दाराजवळी उम्बऱ्यास हा लगटुन नाला वाहे
दारिद्र्याचें रडकें गाणें वाटे विवळत राहे
कृष्ण तयाचा रङ्ग आणि हे दुर्गन्धीचे वारे
करपुन टाकित होतीं हृदयें, सोडुनि तीव्र फवारे

समीर रस्त्यामध्यें दुमडुनि भूमी, आंतिल नाला
फुटून, येउन वरति उफाळुन, लागे वाहायाला
घाण पसरली, पाण्यासङ्गें वाहत येउन नर्क
जन भवतीचे निज संसारीं तिथेंच झाले गर्क
मृत्युलोकची वैतरणी ही कितिक जिवांना रोज
मोक्षपदाला नेई, हळुहळु हरुनी आंतिल ओज
सभोंवताली बकाल वस्ती आणि माजली घाण
श्वासासरशीं दुर्गन्धीनें वाटे जाती प्राण !
बघतो यांना कोण अरेरे ! जो तो अपुल्यासाठी
श्रमती त्यासच काय लागते देवाघरची काठी !
धनवन्ताची उदार दृष्टी कोठें निजली आज
अजून किंवा हाय ! अम्हाला वाटत नाही लाज !
नर्कामध्यें इथे कष्टतां बन्धू दीन अनेक
श्रीमन्तीच्या सुखांत लोळे धनपति यांचा एक
किति जीवांनीं एकासाठीं जीवन हें होमावें ?
आत्मयज्ञ हे काय कुणाच्या ध्यानीं न मुळीं यावे ?
कृत्रिमतेला धरुन उराशीं निसर्ग केला दूर
हर हर ! आम्ही स्वर्ग सांण्डुनी, तरिच गाळितों पूर
अन्ध होउनी कुठवर ऐसें उलटें चालायाचें,
निजतेजानें मानवामधें केव्हा चमकायाचें ?
सुधारणेचे किरण अजूनी का नच येथे शिरले ?
औदार्याचे बेत मनींचे काय हवेमधिं विरले !

मुरार राहुनि इथे एकला कण्ठी अपुला वेळ
व्याकुळ होई मनांत, पाहुन दुर्दैवाचा खेळ

सवय न त्याला कधि कष्टाची, होउ लागले हाल
भाकर-तुकडा नीट मिळेना ! भवती चिन्ताजाल !
रोज सकाळीं उठुन करावें स्नान नळावर त्यानें
आणि उपाशी कामावर मग जावें निरुपायानें
दुपार टळल्यावरी मिळावी चटणीभाकर खाया
अर्ध्या पोटीं असें राबता सुकू लागली काया !
रात्रीं तुकडा खातां खाता दिसे घराचें चित्र
भरून डोळे यावे आणिक पुढे दिसावे मित्र !
कधी कधी तर चटणीभाकर सारुनि पुढली दूर
बसल्या जागीं खिळून बैसे, दाटुनि नेत्रीं पूर !
तोंच विझावी चिमणी आणिक पसरावा अन्धार
की दीपाला दुःख न बघवे त्याचें हें अनिवार !
तोंच सगूनें हातीं बाळें धरुनी पुढती यावें,
करुण वाणीनें ' जपून वागा ' पुनरपि हें साङ्गावें,
आवेगानें जावें त्यानें धरावयाला पाय-
चित्र समोरिल तों लोपावें ! हृदय जळावें हाय !

थकून येतां सायङ्काळीं ज्ञानें स्वस्थ पडावें
खेड्यामधलें जीवन सुन्दर डोळ्यापुढती यावें
वाटे त्याला ' झुन्झुरकाचा उठून कोणी रानीं
कामा लागे, कमण्डलूवर जाइ गुरें घेवोनी
झुळ झुळ वाहे वारा; झाडें-वेली देती डोल
अम्ब्यावरती किलबिल मन्जुळ पक्षी गाती बोल
हिरवीं रानें पाहुन भवती प्रसन्न मानस झालें
भावि सुखाच्या आनन्दानें अपुल्याशी तो बोले

हासत त्यानें कमण्डलूच्या जळांत केलें स्नान
गुरें बढूनी, आनन्दानें परत गाठिलें ठाण
गोठ्यामध्यें बान्धुनि त्यांना, घाली ताजा चारा
धडपड करितीं मुकीं वासरें, काढी मग तो धारा
घेउनि अपुलीं गरीबींतलीं दोन मुलें साङ्गातीं
करी न्यहारी; मालकीण ही वाटी कुतुकें हातीं
नन्तर जुपुनी मोट, गाइलें सुन्दर त्यानें गाणें
पाटामधलें साथ करी जळ मञ्जुळ झुळझुळवाणें
श्रमतां यापरि उल्हासानें, झाली सायङ्काळ
वृक्ष रङ्गले, रम्य रङ्गतां मावळतें आभाळ
दिव्य तयाची शोभा पाहत परतुन छपरा आला
लडिवाळपणें धरि पोटाशीं चुम्बुनि तो बाळाला
पत्नीसङ्गें गोष्टी करितां, जाय सुखें तो झोपी
तारे करिती खडा पहारा ! शान्त जाहली कोपी !
तोंच मुराने 'सगू, सगू !' ही खरीच मारुन हाक
दचकुन यावें भानावरती, आशा व्हावी खाक !
तळमळ होउनि जीवात्म्याची, लोटावी मग रात
हळूच बोले 'का म्हुनू आलों ? जाला माजा घात!'

दोन लोटले मास कण्ठता अशापरीनें काळ
मुरार राहे मूकपणानें सोशित हा जञ्जाळ
वृत्त तोटकें सगुला कळवी एकच धाडुनि पत्र
अन्तर्यामीं दुःखें ठेवी, भोगुन हाल परत्र !

असा दुपारीं कापुस फोडित मुरार होता बसला
कामावाचुन विचार नव्हता चित्तीं कोणा कसला

# सुखस्मृति

झाली होती दुपार म्हणुनी समोर कोणी एक
भरवित होता घास, घेउनी साङ्गातीं नि[illegible]
आनन्दानें बाळें होतीं प्रश्न विचारित काही
हासुन देई बाप उत्तरें, आई वाढत पाही
काम थाम्बुनी हातामधलें सुराची तों दृष्टी—
दृश्यावर या खिळून, झाली डोळ्यामधुनी वृष्टी !
कामावरच्या अधिकाऱ्याची निष्ठुर कर्कश वाणी
कानावरती कडकडली तों नभिंच्या बिजलीवाणी
मधुनी मधुनी पाहत वमतो असा सोडुनी काम
म्हणुन तया तो ध्यायाया साङ्गे कायमचा आराम
परी अरेरे ! चित्र मनाचें दिसतें अधिकाऱ्याला
कठोर ही तर हृदय लागलें असतें पाझरण्याला १७००
क्षण हि न राहे कटुवचनाची ऐकाया लाखोली
दुर्दैवानें चालवितां, तो गाठी अपुली खोली !

रवि अस्तवुनी सायङ्काळीं पसरावा अन्धार
भीषण छाया करीत जाव्या दूर दूर सन्चार
गभीर यावें रूप सृष्टिला सान्ध्य तमस्तेजानें
तों पेटावीं, वणवा लागुन, दूरिल डोङ्गररानें
आणि भडकुनी आग भोंवती, व्हावा हाहाःकार
आंतिल कीटकजीवांचा मग तडफड व्हावी फार
आणि पळावे जीव घेउनी इकडे तिकडे त्यांनी
तों गाठावें जिभळ्या चाटित चहुकडुनी ज्वाळांनीं
नेणुनि यांतिल काही ही परि दुःख, दूरच्या कोणी—
' किति देखावा सुन्दर, मोहक ! ' अशी वदावी वाणी

परि जीवाची तडफड व्हावी सापडुनी नच माग,
त्यापरि झाली मुरारची स्थिति पेटुन भवती आग !

दारुण चिन्ता मनास जडली, पार उडालें चित्त !
खावें आता काय ? सगूला कोठुनि धावें वित्त ?
मिळकत झाली त्यावर नाही पुरतें पोटहि भरलें
आणि अता तर आधाराचे धागेदोरे सरले !
नैराश्यानें हृदयीं पुरता खच्चुनिया तो गेला
अनुभूतीच्या कटुक विषाचा सेवित पडला पेला !
दुसरे दिवशीं अखेर जाउनि धीटपणें चौकांत
उभा हमालीसाठीं राहे करपुनि तो हृदयात
तया सुदैवें काम मिळालें तोडीं उचलायाचें
सगुणेवरची प्रीती हृदयीं हर्षभरानें नाचे
परि होईना काम नीटसें, बळें बळें करि जोर
धाप लागली ! लाल जाहले, डोळे काळेभोर !
ओळखिलें ही नसतें कोणी असें पालटे रूप
काम कराया सजला धरुनी प्रीतीचाच हुरूप
दोन दिसांनीं असाच थकुनी पडला मार्गी धीट
दारीं जाउन, रक्त ओकुनी पडला येउन शीट
शेजाऱ्यांनीं नेउन त्याला निजवियलें खोलींत
तडफड होउनि कण्हावया तो लागे मग ओलींत
जवळी नाहीं कुणी जिव्हाळा आणि स्थिति असहाय
पश्चात्तापें जळूं लागलें अन्तर, खाउनि हाय
तोंच पलिकडे मजूर हौशी अवशीं कुणि रङ्गेल
काढुनि डफ-तुणतुणें बैसले गाया गीत सुरेल

परि जीवांची तडफड व्हावी सापडुनी नच माग,
त्यापरि झाली मुरारची स्थिति पेटुन सवती आग !

दारुण चिन्ता मनास जडली, पार उडालें चित्त '
खावें आता काय ? सगुला कोठुनि द्यावे वित्त ?
मिळकत झाली त्यावर नाहीं पुरतें पोटहि भरलें
आणि अता तर आधाराचे धागेदोरे सरले !
नैराश्यानें हृदयीं पुरता खङ्गुनिया तो गेला
अनुभूतीच्या कटुक विषाचा सेवित पडला पेला !
दुसरे दिवशीं अखेर जाउनि धीटपणें चौकांत
उभा हमालीसाठी राहे करपुनि तो हृदयांत
तया सुदैवें काम मिळालें तोडी उचलायाचें
सगुणेवरची प्रीती हृदयीं हर्षभरानें नाचे
परि होईना काम नीटसें, बळें बळें करि जोर
धाप लागली ! लाल जाहले, डोळे काळेभोर !
ओळखिलें ही नसतें कोणी असें पालटे रूप
काम कराया सजला धरुनी प्रीतीचाच हुरूप
दोन दिसांनीं असाच थकुनी पडला मार्गी धीट
दारीं जाउन, रक्त ओकुनी पडला येउन शीट
शेजाऱ्यांनीं नेउन त्याला निजवियले खोलींत
तडफड होउनि कण्हावया तो लागे मग ओलींत
जवळी नाहीं कुणी जिव्हाळा आणि स्थिति असहाय
पश्चातापें जळूं लागलें अन्तर, खाउनि हाय
तोंच पलिकडे मजूर हौशी अवशीं कुणि रङ्गेल
काढुनि डफ-तुणतुणें बैसले गाया गीत सुरेल

ऐटदार कडकडित तापल्या बसे डफावर थाप
गोड लावणीस्वर वरघाटी आले तोंडि अपाप—

## ४ विरहगीत

[ चाल——नका टाकुनि जाऊ ]

तुझ्या नावाची गोडी लई जीवा, सुभगे साजणी ॥ध्रु०॥
रानामन्दीं हरनावानी
बागडताना, फूलरानीं
तुजि पेकीलि कोकीला-वानी, ग १
ज्वानी अङ्गीं तूझ्या भरली
लिम्बकान्ती मोहरली
नैनजादूची पडे मला मोहनी ग २
पिर्त जडली, बोली झाली
फिरलों सङ्गं रानोमाळीं
हरली जीवाची तहानभूक, गडणी ग ३
आता रुसवा कां ग आला ?
येळ केला भेटायाला,
व्याकुळ होउन जिव लागे झुरणी ग ४

गाणें ऐकुन आग मनाची वाढे भरवेगानें
तीव्र घातले घाव जिव्हारीं त्याच्या, जणु कीं गानें
अता सगूचें दर्शन कसलें ! कोण जिवाला भाई ?
ओकओकुनी जीव तयाचा व्याकुळ होउन जाई !
काय जहालें सगुचें ' जाणुनि सारें अन्तर्ज्ञानें—
कमण्डलूनें शाङ्गितलें तिज नाहीं का हें गानें ?

## बहार ११ वा

# सद्भावनेचें तारायन्त्र

देव देव जों करावयाला जाय शिलोजी दूर
मास लोटला पुरा तयाला; नुकता जाय मुरार
दारिद्र्यानें हतबल केलें सगुला आणि मुलांना
कहर कहाली सुकवूं लागे गोड अनाथ फुलांना
दुःखसागरीं तिच्या मनाची हेलावूनी वेळा
चिन्ताश्रूंनीं पदर जाहला ओला वेळोवेळां
केव्हा देउन भाकर नुसती, केव्हा नुसतें पीठ
भूक भागवी बाळांची, ती सती मनाची धीट

एक दिनीं मग दारिद्र्यानें केली पुरती मात
केरूवरती खल रोगानें घोर टाकिला हात !
कसा धरावा तग पोटानें केवळ मिळतां पीठ ?
तीव्र आतपीं केवळ, कैसें फूल फुलावें नीट ?
दूध ठरेना पोटीं, औषध लवहि मिळालें नाहीं
माण्डीवर तों घेउन बसली दीनपणानें आई
कुणि शेजारी आयाबाया येउन बघती हाल
आंत होउनी तळमळ, सगुचे भिजले होते गाल
माण्डीवरती तडफड आता दीन मुलाची चाले
व्याकुळतेनें हृदय सगूचें भाजुन आंत निघालें
तोंच लावुनी मातृमुखावर अखेरची तो दृष्टी
सोडुनि गेला बाळ, त्यागुनी ही मायावी सृष्टी !

कुणास ठावें किंवा घेउन आईचें गाऱ्हाणें
देवाजीला साङ्गायाला केलें त्यानें जाणें!
हिरू बिलगला मुग्धपणें तिज! कुरवाळी ती हातीं
मुग्ध आसवें काही दिन मग गळलीं दिवसारातीं

वृत्त समजलें आणि शिलोजी आला टाकोटाक
परिस्थितीनें होय मनाची त्याच्या फाकाफाक
मानाजीसम परि बोलूनी प्रेमळतेची वाणी
धीर सतीला देउन, चित्तीं गूण तिचे वाखाणी
उरल्या सुरलेल्याची लावुन पुरती विल्हेवाट
हिरूसगूना घेउन धरि तो मग वेळूची वाट
मायपित्यासम भवती होती प्रेमळ आता माया
परी सगूच्या वदनीं पसरे खिन्नत्वाची छाया
शिलुकाकांनीं साङ्गसाङ्गुनी सान्तविलें मन भारी
परि न शान्तली मुरारसाठी वृत्ति तिची झुरणारी
कधी शिलोजीसङ्गें येउन आम्बराइच्या रानीं
गुङ्गत बैसे खिन्नमनें ती कमण्डलूच्या गानीं

बसली होती सायङ्काळीं दरडीवर ती आज
बिचकत होता ओढा, काढुन दुःखाचा आवाज
सरकत होतीं आकाशावर चित्रें भरभर काही
मनःपटावर गतकालाचीं परि अपुलीं ती पाही
ऐकुन वाणी कमण्डलूची अस्थिर मन तें झालें
आणि लोचनीं एकाएकी अश्रू दाटुन आले
टपकत होते बिन्दु, शिलोजी तीं न्यायाला आला
मनीं दचकला! परि घेउन तिज तो वेळूस निघाला

विचार आले अनेक चित्तीं भाजुनिया काहूर
सगुच्या वदनीं मधुनच पाहे तो, वाटुनि हुर्हूर
बघतां बघतां मानाजीची दिसूं लागली मूर्ती
आणि लोपली साङ्गुन त्याला कर्तव्याची पूर्ती
न कळे यांतिल अस्थिर चित्ता सगुणेच्या परि काही
चूर आपुल्या आन्तर दुःखीं गेले ते लवलाही

दिवस लोटले एकामागुन एक सरासर काही
परि अस्थिरता तिच्या मनाची लवही शमली नाही
एकच आलें पत्र तयावर कळली नाही वार्ता
हुरहुर दाटुन, हृदयीं आता होय सती दुःखार्ता
गृहदेव्हाऱ्यामधें भवाचे नसता प्रिय अधिदेव
कशीं रुचावीं सुखें, वियोगुन जातां हृदिंचा ठेव !
तशांत होउन केरूची स्मृति, जाळुन हृदया जाई
संसाराच्या बागेंतिल ही होरपळे मग जाई
गोड शब्द या मायपित्यांचे प्रेमळ, गेले वाया
जिवझुरणीनें व्याकुळलेली सुकू लागली काया
केव्हा रात्रीं झोप न यावी, तारवटोनी डोळे
कल्पनेंतुनी चित्रें बघतां, हृदय आंतुनी पोळे
चैन पडेना, एकच लागे मुरारजीचा ध्यास
दचकूं लागे मन अन्धारीं, होउन भेसुर भास !
एके रात्रीं स्वप्न तरळलें डोळ्यापुढती स्पष्ट
प्रीतीसाठी अघोर दिसला तो करितांना कष्ट
अन्नावाचुनि तो सुकलेला दिसू लागली काया
अजुन विनवणी दीन तयाची ये न कुणा ऐकाया

तों गमलें कीं, राबत असतां कोठे ऐन दुपारीं
कोणी मालक पाठीवरती निष्ठुर फटके मारी
रक्त ओकुनी त्यांतच, वाटे, पडला येउन झीट
आणि पडे तो किती वेळचा देवाघरचा कीट !
प्राण होउनी व्याकुळ नन्तर, वाटे, गेला सदनीं
आली होती प्रेतकळा तों भेसुर त्याच्या वदनीं
अन्थरुणाला खिळलेला मग दिसला त्याचा देह
स्नेहावाचुन भयाण दिसलें, वाटे, त्याला गेह !
आणि तयानें प्रिय नांवाची घेउनिया जपमाळ
टकळी होती एकसारखी चालविली बहुकाळ
अखेर होउन घसा कोरडा निश्चळ पडला वाटे
आणि सराभर अश्रु लोटले सरसर डोळ्यावाटे
दचकुन बसली अन्थरुणावर उठुन सगू अन्धारीं
तरि अजूनी नाचत होतीं भवतीं चित्रें सारीं
अस्थिर झालें मन कळवळुनी, नेत्रीं साठुन पाणी
किती वेळ ती पाहत बसली गुङ्गत वेड्यावाणी
तळमळ होउनि तीव्र, लागलें कालवायला पोटीं
प्रेम करुणा हृदयींची ये उचम्बळोनी ओठीं
फुटुन ताम्बडे, तोंच कोम्बडा परड्यांतुन आरवला
शिलुकाकांचा अभङ्ग मन्जुळ कानावरती पडला
हृदयामधलें दुःख आपुलें साङ्गायातें आज
धीट मनाच्या निष्ठुरतेनें तिनें सोडिली लाज
आवरुनी मन, उठली वेगें डोळा आणुनि पाणी
शिलोजिची तों कानावरती पडली प्रेमळ वाणी

## बहार १२ वा

## रुग्णालयांत

ऐकुनि गाणें आग लागली मुरारच्या हृदयाला
आधिव्याधी मर्माङ्गाला लागति भाजायाला
आवरुनी मन धरिता धरिता निमटुनि गले पुरतें
तीव्र भडकलें, ताप वाढुनी, व्याकुळुनी आतुर ते
त्यात ऐकुनी 'व्याकुळ होउनि झुरणी लागे जीव !'
पूर्व स्मरणें पुढती राहुनि उभीं, वाढलें ढीव
डोळे ताणुनि निश्चळतेनें केव्हा इकडे पाहे
केव्हा तिकडे, केव्हा वरती तरळुनि दृष्टी वाहे
समोर त्याला दिसू लागली मूर्ति सगूची एक
आता दुसरी, आता तिसरी, सुटला आणि विवेक
हात पसरुनी पुढती, घेउनि नामाची जपमाळ
बोलावी तिज करुण वचनें बरळुनि काही काळ
' झुरणी लागे जीव ' कोन तू–सगू, सगू तू माजी
खरी खरी का तूच सगू ही ? आलिस होउन राजी ?
सगू दया कर, दूर उभी का ? ये ये जवळी बाई
इकडं आलिस कधा, कशाला ? आन कशाच्या पायीं ?
झुरणी लागे जीव किती ह्यो, का म्हुन् जाशी मार्ग
याकुळ जाला जीव, कशाचा आला तुजला राग ?
फिरलो सङ्गं रानोमाळीं नगं अशी तू पाहूं
माझ्याजवळी बैस जराशी, रानीं सङ्गं जावूं
पोर हैती कुट ? कशानं रडया जाला चेरा ?
अजून किंवा जिवा जाचतो कमूनाशिबाचा फेरा ?

तोण्ड फिरवलस् ! कुठ निगालिस् ? अगं —' अरे ही गेली !
थाम्ब थाम्ब गं, साङ्ग सगू का ही इतराजी केली
कोन पुन्हा तू ? सगू ? अशी का परतीस राग राग
काय ? पुन्हा तू गेलिस ? सगुणे येवूं का मी माग ?'
आवेगें तो चळवळला मग मूर्तीमागे जाया
परन्तु पडला मागे, आणिक धडपड गेली वाया !

डोळे मिटुनी पडला होता लागुनि थोडी धाप
थकली गात्रें आणि लागला पुन्हा चढाया ताप
बसले होते हात कपाळा लावुनि कुणि शेजारी
बघुनि अवस्था मुरारची हो घाबरले ते भारी
थकल्या हातीं गालावरचे पुसुनी ओघळ ओले
पुन्हा करूनी धीर मनाचा, उघडुन डोळे बोले
केव्हा 'पाणी !' केव्हा 'सगुणे !' केव्हा 'आई ! आई !'
म्हणुनी अर्धेमुर्धे यापरि शब्द वदे तो काही
'तुझ्या मुराच्या पिर्तीसाठी, क्षमा करायां त्येला
ये ग एकदा ! याकुळलेला जिव हा फार भुकेला
न्हाई सगुणे ?. सगुणे ! सगुणे ..!' बोलुनि इतुके शब्द
जीभ कोरडी पडुन, जरासा मुरार झाला स्तब्ध !

अखेर घेई क्षीण वर्च तो एक सगूचा ध्यास
आणि बोलला मधुनी मधुनी 'येक एवढी आ...स !'
तोंच वाजलें कवाड आणिक सगुणा आली आंत
घाबरली ती, जवळी जाउन बघे लावुनी हात !
शिलोजिनीं तर चाचपुनी कर, हाक मारिली त्याला
कण्ठ दाटुनी, सगुणा विनवी डोळे उघडायाला

शुद्धीवरती नव्हता तरि हा ऐकुनि करुणावाणी
डोळे उघडुनि सगुणेवर तो दृष्टी अपुली ताणी
सगुणा बोले 'वळाकल का मजला ? आल्ये आता
वळाकल ? मी सगू !' अन्तरीं गहिवरली मग कान्ता !
निश्चल त्याची नजर लागुनी सगुणेवरती राहे
लिखित तयाच्या दुर्दैवाचे सगुणा तींतच पाहे
मग बोले ती शेजाऱ्यांना विनवुन भरुनी डोळे
'इतुक जाल आन कळाल काल ? हाय ! जिव पोळे !'
ओठ जरासे हालवुनी तो मुरार बोलू लागे
'कोन...सगू तू ? न्हवस् ..' एवढे शब्द बोलतां भागे
'मुरा असं हे काय बर ! मी सगूच, आता आले !
बोला बोला वळाकल का ? परान याकुळ जाले !'
'सगू न्हवस् तू !' या अर्थाचे बोलायाते बोल
ओठ हालले इकडे तिकडे आणिक डोळे खोल
आणि साठलीं करुण आसवे त्याच्या डोळा दाट
दाटुनि येतां कण्ठ, मिळाली शब्दास हि नच वाट
पाहुनि त्याची अशी अवस्था सगुणेचें मन विरलें
काळिज कोणी आत तियेचे चरचर जाणो चिरलें
कळवळुनी मग मुरास बोले 'इनती ऐका माजी
रडू नगा, सज साङ्गा समदं, करू नगा इतराजी !'
शिलोजिनीं तों केली तिजला स्वस्थ बसाया खूण
झटक्यामध्यें अस्फुट त्याची चाले परि भुणभूण !

आशा सुटली सकलांची मग चिन्ता सकला जाळी
न कळे दैवें काय ठेविलें वाढुनि पुढल्या काळीं

श्री ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता.

सगुणा सेवा करि मातेच्या कोमळ पोटाप्रानें
भावाकुलिता विनवी ईशा प्रेमळ, नतप्राणांनीं
उपाय सरले सकळ मानवी आणि न उरली आस
अघोर तळमळ प्रतिक्षणाला करपवि तज्जीवास
धीर सुटूनी, पुढे शिलोजी भविष्य मळते पाही
परी सगूचा देवावरचा भाव निमाला नाही
दु:ख, काळजी, तीव्र वेदना सोशित असता चार
दिवस लोटले ! आणि गवसला नाही लव आधार
दीन अवस्था पाहुनि त्याची भ्याले तेही फार
घेउनि रुग्णालयांत गेले करण्यातें उपचार

रुग्णालय नव सुन्दर दगडी, स्मारक औदार्याचें
विलसत होतें आरामस्थळ दीनानाथजनांचें
शिल्पसुबकता आणि भव्यता याचा मिरवुन तोरा
शोभे सुन्दर गगनामध्यें त्याचा उन्च मनोरा
मधुनी मधुनी ठोके देउनि, घड्याळ बोलुनि बोल,
सुचवित होते जीवितांतल्या प्रतिक्षणाचें मोल
थोरजनांची दानशूरता अथवा उन्च सुरानें
जगता सांङ्ग पुकारुनी हें दीनांचे रडगाणें
धूसर काळे दगड घेउनी गारवेलिची शाल
बसले दीना आरामाया भिन्तींतून विशाल
सभोवताली फुलवेलींचा बहरुन गेला बाग
तळणें घेउन मधुनी गेल्या वाटा जागोजाग
कडवेलींचें कुम्पण हिरवें, कापुन पाताळींत
कार्यकुशलता दावी अपुली माळी हिरवाळींत

उन्च सुरूचा कोठे लववुनि खाली ताठर मान
केली होती प्रवेशद्वारीं वाटेवरुनि कमान
चौं कोनावर भुईनळ्यापरि सीकर कारन्जाचे
उन्च फवारुन अङ्ग भिजविती खाली भूलतेकांच
की रुग्णालय ताज आणि हे भवति रुनेरी चार ?
या नन्दनवन दीनासाठीं येई हा अवतार ?
आंत चकाकित जिकड तिकडे सोटनेटकें सर्व
प्रकाश-वायू खेळुन हरती जणु रोगांचा गर्व
देवांची नव भिन्तीवरती चित्रें होतीं कोठे
कुठे शिशूंचीं, देखावे वा कुठ आरसे मोठे
एक हारिनें भिन्तीसरशी सरळ माण्डिल्या खाटा
मधुन फिराया शुभ्र रेखिल्या सङ्गमरवरी वाटा
असे मधोमध मेज, तयावर उपकरणें ही सारीं
माण्डुन, बैसे लिहीत कोणी युवती–भगिनी–दारीं
शुभ्रवाससा गौरकाय ती फिरवुन चौकस डोळे
शासित होती निजभगिनींना, केव्हा वदनी बोले
सेवारत कुणि दीन सेविका तडिल्लतेसम फिरुनी
सुखवित होत्या शुश्रूषेनें, कुणा निरामय करुनी
वैद्य विशारद, शब्द न वदतां कार्यीं होते दक्ष
रुग्णालयिंच्या या शान्तीचा न करी कोणी भङ्ग
कोठे कोठे मात्र विचारी कुणि न मुळीं अधिकारी
म्हणुन ओरडे रोगी कोणी, दुःखें विवळुन भारी !
मुरारजीला इथेच आणुन, एका खाटेवरती
नीट निजविलें, गेली नव्हती मूर्छा अजुनी पुरती

कालपासुनी डोळे मिटुनी शब्द न वदतां कांही
मुरार पडुनी शान्तपणानं दुःख अपुलीं साही
शुद्धीवरती परि आता तो होता पुरता आला
क्षीणत्वाचा, खिन्नपणाचा रंग वदनीं ये काळा
सगुणा होती जवळ बैसली रगडित डोकें हातीं
मुरास वाटे झाली अपुल्या संसाराची माती !
दीर्घ सोडुनी सुस्कारा तो करुनी डोळे उघडी
वाटे त्याला आयुष्याची एकच उरली सुघडी
थकलेले मग लोचन लावुनि सगुणेवर, तो पाहे
एकसारखा, हृदयीं जळुनी तीव्र निराशादाहें
ओठ हालले पुन्हा सगूशीं बोलायातें कांहीं
दुःखवेदना भरून हृदयीं शब्दच फुटला नाहीं
तळमळ मनींची दिसू लागली गात्रागात्रांतून
करूं लागली जिभली धडपड टाकायास वदून
ओठ उघडले, हलले आणिक मिटले दोन्ही वेळां
बोलायाचा यत्न मुरानें, शक्ती खेचुनि, केला
अखेर होउन डोळे सुस्थिर खिळले सगुणेवरती
आणि हळुहळू साठू लागे त्याच्या नयनी भरती
हळुच खोल जड शब्दीं बोले 'सगू .' आणि तो थाम्बे
ओहळुनी जळ झर झर नयनीं अन्थरूण ओथम्बे
शब्दाम्बुधि मग अडला ओठीं, आणि तयाची लाट
नेत्रीं फुटली, अनुतापाची अवस माजतां दाट
प्रेमभावना ढकली आतुन शब्दांना बाहेरी
आर्त मनांतिल शब्द प्रेमळ, करुण, सगू परि हेरी

अखेर बोले थाम्बथाम्बुनी 'सगू, कु ड .वली .तु .ज..क्ष !'
जातों .पोर शिपत थोर त्यो !' आणि अश्रुनीं भिजला
वदनी घेउन भेसुर छाया मूर्च्छा आली घोर
आणि वाटल सकलाना, ती आली वेळ कठोर !

काव्य कवीचें लोपुन जावें काळ्यमाच्या पोटीं
आणि उरावी एकच पङ्क्ती मधुर जनांच्या ओठीं
आणि जनांनीं लागावें मग शोध कराया त्याचा
मिळूं नये परि हारवलेला दुवाच कधि काव्याचा
आणि जनानीं पङ्क्तींतच त्या, अर्थशोधनासाठी
तर्क कसाला लावुन, करणें निष्ठुर आटाआटी
तों उमगावा अर्थ तयाचा आणि मिळावा धागा
आणि सव्यथा त्यांतिल वेधीं नाजुक हृदयविभागा
त्यापरि, राहे विलापिका जी शब्दीं भरुन मुराची
अर्थ उमगता तिचा, दुणावे धडधड आर्त उराची !

परि द्यायाचा जिवास त्याच्या पूर्णपणें आराम
उरले होतें हेंच काय तें इतर जनांचे काम
स्वस्थ तयाला पडूं दिलें मग सर्वांनीं किति वेळ
न कळे कोणा जगन्नायकें काय माण्डिला खेळ
मात्र सगूला मुळिं न राहवे, शान्तिमधें भेसूर
तेव्हा बोले हळु ती मधुनी काढुन रडवा सूर :
'मुरा काय हें बर ! तुमाला बर करायासाटी
आल्यें मी ना ? व्हनार् बर ना आता माज्यासाठी !'

गुङ्गुन पडला होता डोळे मिटुनि अजुनी मुरार
झुळझुळ तों ये पहाटवारा दारामधुनी गार

सगुणा वदली शब्द पुन्हा ते व्याकुळुनी हृदयात
आणि पिङ्गळा झाडावरला दे तिज मञ्जुळ साथ
तोंच उघडले हसऱ्या वदनीं हळुच सुराने डोळे
प्रसन्नतेनें हात सगूचा धरुनी मग तो बोले
'सगू, तुझ्या किर्पेन तर मग व्हनार काय बरा मी ?
व्हनार ।' हासे आणि पुन्हा तो श्रमुन पडे आरामीं
स्वर्गसुखाचा अनुभव आला सगुणेला या वचनीं
'सुरा, परभुच्या किरपेन अ !' बोले, वर पाहूनी
उत्साहाचे तेज चमकले शिलोजिच्या ही वदनीं
उल्हासाची पहाट वाटे आली होती भुवनी
रुग्णालय ही सुरास वाटे भरलें उल्हासानें
खिडकींतुन ही कानीं आलीं निसर्गसुन्दर गानें
उल्हासाची पहाट दिसली त्याला सुन्दर लाल
केशरकुङ्कुमरङ्गीं रङ्गे देह आणखी भाल
शुभ्र दूरचे घुमट विलसले सुरम्य आरुण रङ्गीं
नव तेजानें नभीं चमकले उन्च मनोरे जङ्गी
जागी मुम्बापुरी होउनी भरली आवाजांनीं
घण् घण्, पों पों, धड् धड् आले ध्वनि गाड्यांचे कानीं
नव्या दमानें चळवळ मार्गीं सुरू जनाची झाली
चुली पेटल्या, तेजें फुलल्या ती मजुरांच्या चाळी
तेज फाकलें, चढत चाललें वैभव आकाशाचें
उल्हासाचा जोम अन्तरीं ज्याच्या त्याच्या नाचे
नव सृष्टीच्या नव्या जीवना होई की सुरवात ?
निसर्ग होता नव्या दमाचें किंवा गायन गात ?

कुणास ठावें ! शिलांजिच्या ही हर्षें न मावे पोटीं
प्रफुल्लतेच्या अभङ्ग नाचे नाच, तयांच्या ओटीं
आणि येऊनी कमण्डलूची हाक मुराच्या कानीं
गमे बोलली 'नव जिणं घ्य ' नव जिणं घ्ये ' गानी '

---

# बहार १३ वा

## स्वार्थत्याग

खपल्या सगुणा आणि सेविका रुग्णालयिंच्या फार
हळू हळू मग घडूं लागला मुरारजींस उतार
उत्साहाच्या सगुच्या गन्दें जीवन त्याला आलें
सेवा घेतां प्रीतिकराची मानस त्याचे धालें
अनुतापाची परन्तु जेव्हां तळमळ लागे हृदया
नव्या जिण्याच्या गोष्टी साङ्गुन शान्तवि त्याला सदया
विरङ्गुळा द्यायास जिवाला केव्हां प्रीतिभरानें
बोलत बैसे मुरार तिजशीं निर्मळ एकदिलानें
मात्र विचारी कधी मुलांची जेव्हां हालहवाल
घट्ट करूनी मन ती साङ्गे 'हेंतां समर्दि खुशाल'
आणि बाजुला जाउन अपुलीं करुण आसवें ढाळी
आणि बोलतां कधी तयाशीं विषय तेवढा टाळी
हेतु मनीं कीं पतिस पडावा त्यानें पूर्णाराम
आणि न खाता हाय, निरामय निज गाठावें धाम
परि तद्हृदयीं वात्सल्याला उधाण जेव्हां आलें
मन सयमुनी कल्पित लीला कथुन तिनें शान्तविलें
दुर्दैवाची लीला भरतें कधी कधी तिज आणी
आणि बाजुला जाऊन गाळी डोळयातुन ती पाणी
मुरारजींनें कधी पुसावें 'डोळे का सगु लाल ?'
तीच साङ्गती कपोलकल्पित गोष्ट हासरे गाल
परि सगुणेच्या जिवास नाही कधि द्यायाचा त्रास
या सुविचारें मुरारजीनें सयमिलेंच जिवास

प्रफुल्ल पाहुन प्रीतिरसानें भरलेल्या मुखकमला
जीवनगुन्जारवीं तयाचा भृङ्ग यापरी रमला
कौतुक वाटे रुग्णालयिंच्या परसुखरत देवींना
शिलोजिच्या नव मधुर स्वप्ने दिसलीं मग नयनांना
उतार पडतां मुरार साङ्ग सगुला सर्व कहाणी
हृदय द्रवलें तिचें; साठले त्याच्या नयनीं पाणी
घरांत येउन साङ्गत असतां जेव्हां गहिंवर दाटे
सगुणा खाली बघुन आसवें गाळी डोळ्यावाटे
पडला होता खाटेवरती असाच एके रातीं
बसली होती सगुणा चेपित पाय तयाचे हातीं
पेङ्गत, होते श्रवत शिलोजी त्याची करुण कहाणी;
बोलू लागे तों अभिमानें मुरा विधीची करणी :
'सगुणे ! माज चितर् पगितलस् समद आजवरी तू
कथा जिवाची तुला साङ्गतों पन् तुरत्राया किन्तू
सगू, उदळला पैका ! पापं समदीं मागं केलीं
पन् परनारीवर्तीं न्हाई नजर कदीं ही गेली
पिर्ते जिवाची तूच येकली तुज्या जिवाची आन
तुला बुडवली म्हनूनदयेनी तळमळतो ह्यो प्रान
सगू, अस्तुरी तूच जिवाची, तूच जिवाची देवी
म्हनुन् वाचलो, ओड लाभली लइ भाग्याची देवी
आई म्हनली खरं खर त्यें सगू जिवाला वाटे
तू दैवाची—!' तोंच लोचनीं पुनरपि पाणी दाटे
परन्तु धरुनी नव आशा, तो उत्साहानें बोले
'पूस पूस त्ये सगू अगूदर डोळे अपुले ओले
नगं रहान हतं, नरक ह्यो, किडे मानस त्येंत
नगं नगं ही मुमई जावू परतुन अम्मेरींत

मानाजी पग् थोर ! मोडुनी शिपत् हासलो त्येला
चूकच जाली ! कोप तरी ह्यो देवाजीनं केला
परतुन जावू, अम्बेरीच्या रावू रानामन्दीं
गरीबींत मङ्ग् करु देवाची अपुल्या तेजामन्दी
भाकर खावू गरीबींतली घेउन पोर सङ्ग
आम्बराइच्या रानीं रावू, काय कमी मङ्ग् साङ्ग
डोळा पानी का म्हुन् आता ? पूस पूस त्यें बाई
रावायला अपुल्या रानीं कमीपना ह्यो न्हाई !
आम्बराइचं मालक् कोनी असतिल् त्याना सेवू
टाकुन मागं पैका, अपुली राई कदितरि घेवूं
परीतल्यापुन, नरकाचं ह्यें रूपच, सगुणे मुमई
अपमानाचं जिण मनाला ततल वाटत न्हाई
खातिल पोरबाळ तुकडा आन रानचा वारा
भरती येइल खरी खरी ग सगुणे मङ्ग् सौसारा
घेउनश्यानी अम्बेराई, छत्री मानाजीची—
बान्धुन, पूजू रोज, व्हइल ग किर्पा देवाजीची
सगू, वाटल 'मरन्', तवा ह्यें व्होत साङ्गायाचं
रडगान ह्यें अता कशाला ? दिवस अता भाग्याचे !'
भावी सुन्दर या स्वप्नानें सगुचें मन आसावें
नेत्र चमकले आणि हासली ती प्रीतीच्या भावें
त्या भावाचें अमृत पिउनी पडला तो ही शान्त
वारा बाहिर गीत गाउनी दमला त्यांत नितान्त

-सगुची सेवा फळास आली, कृपा विधीनें केली
रुग्णालयिंचा वास सम्पला, वेळ जायची आली

मुराम आतां आली होती फिरावयाची शक्ति
काय न देइल मिळवुन जीवा सत्प्रेमाची भक्ति ?
एक दिनीं मग करुन तयारी ती गावास निघाली
कृतज्ञतेनें निरोप घेतां करुण आसवें गळलीं
प्रवासजीवन केलें सगुने निजसेवेनें गोड
गहिवरुनी तो मनीं वदे 'ही उई भाग्याची जोड'
एक दोनदा वदला तो मग 'सगू, जरा पड आता
घे विश्रान्ती, थकलिस भारी !' 'नको !' वदे परि कान्ता
वदे एकदा 'प्रवास झाला सगुणे सुखकर भारी,
आतां सङ्ग असाच जाऊं आपुन या संसारीं !'
सगुणा हसली आणि मिटूनी डोळे विनवी देवा
मरार पाहे डोळेभर हें, कुणा न वाटे हेवा ?
यापरि बोलत बोलत गोष्टी संसाराच्या गोड
रहिमतपुरच्या थांब्यावर ती आली लागुन ओढ
पहाट खुलली पूर्वाकाशीं अरुणेरीच्या मागें
अजिङ्क्यताऱ्या इकडुन पाहे न्याहाळुन अनुरागें
सुखकर वाहे वडलिम्बांतुन नव वासन्तिक वारा
गवती शुष्क प्रदेश डोल माळावरला सारा
काळीं रानें नव तेजानें तकाकलीं भवतालीं
पडल्या झडल्या कुणी बान्धल्या राने आतां ताली
नाङ्गरलेलीं पडलीं होतीं रानीं ढिखळें काळीं
कुठें चमकलीं त्यावर किरणें नव, कोळ्याचीं जाळीं
पालवले वड, अम्बेमोहर खचुन दाटला पानीं
स्वैर भराऱ्या रमले पोपट शब्दीं, कोयळ गानीं
बूच-लिम्ब-वड-पिम्पर्णींतुन वळण घेउनी वाट
चढणीवरती सरली, दावुन सर्पाकृतिचा थाट

# स्वार्थत्याग

भोवतालचे ताम्बुस निळसर डोङ्गर दूरवरुनी
प्रफुल्लतेनें पाहत होते माना उन्च करूनी
आनन्दानें मुरार उतरे प्रसन्नतेनें खाली
मायभूमिची माती घेउन लावि अगोदर भालीं
खिलारजोडी जोडुन कोणी तयार गाडी ठेवी
शिलोजिच्या या योजकतेची स्तुती करावी केवी ?
मुरा-शिलोजी-सगुणा बसलीं, बसला गाडीवान
घुङ्घुर वाजे खुळखुळ, त्यानें भरे वेळुचें रान !

एकाएकी परी सगूच्या कालव होई पोटीं
करुण विचारीं हृदयीं झाली काही खळबळ मोठी
भावि सुखाच्या स्वप्नीं रङ्गुन बोले तोंच मुरारी
'घर्गेत असतिल् वाट, न्हाइ का सगुणे पोरं दारीं ?'
उत्तर कसलें, तों हुम्बरडा हृदय फोडुनी आला !
काय कथावें कैसा जाळी पुत्रशोक हृदयाला ?
शोकावेगें खान्द्यावर ती टाकुन त्याच्या मान
फुन्दफुन्दुनी रडली ! गेला मुरार भाम्बावून
शिलोजिंनीं मग कथिलें सारें, ओसरल्यावर पूर
दुःखावेगें मनांत उठलें मुरारच्या काहूर
'कर्न्यासाटीं बरं मला, तू दुःख झाकलस् घोर
सगुणे ...!' बोलुन इतुकें स्फुन्दे तोहि, भावेरे जोर
शिलोजिंनीं मग सान्त्वन केलें धरुनी त्यांना पोटीं
निजासवांनीं न्हाणुन वदले शब्द प्रेमळ ओठीं
तोंच थाम्बले बैल प्यावया कमण्डलूचें पाणी
'नव जिणं घ्यें !' कमण्डलूची बोले स्वागत-वाणी

बहार १४ वा

## नवें जिणें

ध्वनि गाडीचा पडतां हिरुच्या आतुरलेल्या कानीं
धावुन त्यानें मिठी मारिली सगुला दोहातानीं
चुम्बुन त्याला, तिनें दाविले कराङ्गुलीनें काही
तोंच मुराला हिरू लाजुनी, हासत खाली पाही
मान फिरवली, परि तो हासत जाई त्याच्याजवळी
चुम्बुन त्याला, मुरार वत्सल निजहृदयाशीं कवळी
गहिवर येउन जरी दाटले नयनीं अश्रू वेगें
तरी मुरानें सयमिलें मन निजवात्सल्यावेगें
गुल्‌गुल गोष्टी हिरू मुराशीं बोलाया तों लागे
आणि साभिनय विक्रम अपुले सर्व पित्याला साङ्गे
येतिल असले दिवस पुन्हा, हें सगुस वाटलें नाही
म्हणुन कौतुकें दृश्य मनोरम हें, ती पाहत राही

येउन आता मुरारजीला दिवस लोटले आठ
वदनीं त्याच्या तेज आपुलें वठवी कृष्णाकाठ
कमण्डलूचा गोड निरोगी नवा लागतां वारा
पुलकित झाला देह तयाचा नव आनन्दें सारा
नव शक्तीच्या पोटीं धरिला नवाङ्कुरानें जोम
मुरार निन्दी शहररहाणी आणि तियेचें स्तोम
हृदयीं झाला अधिक प्रेमळ, परी जयानीं त्याला
वागविलें अधमत्वें त्यांना जाइ न भेटायाला

ऱ्हा विमवानें अम्मेरीमधि केला होता वास
त्याच वैभवें परतुन जाया त्यानें धरिली आस
प्रेमळ घरचीं सर्व माणसें आणिक अम्बेराई
याविण काही दग्ध जिवाला आवडलें मग नाही
मूल न पोटीं, म्हणुन शिलोजी आणि तयाची कान्ता
पुरी लोभली यांच्यावरती, लागुन वेडी ममता

गप्पा-गोष्टी करित अङ्गणीं अशी एकदा सारीं
बसलीं होतीं जमुन रात्रिची चन्द्रसुधेमाझारीं
आम्बराइचें तोंच बोलणें हळुच काढिले त्यानें
आणि वदे– 'हीं बरसातीन भिजतिल आता रानें !
तजवीजीला नगं म्होरल्या लागाया का होवं
गेनबासनी पुसायला पन् आपुन् आता जावं
आम्बराइवर जीव अडकला आता माझा सर्वं
शिपत मोडली ! काम न हातीं दुसर कसलं धर्वें'
तोंच शिलोजी सरकुन पुढती हासत त्याला बोले
'मुरा, उताइळ होवुं नगं, ह्ये हैती तकडे डोळे
पोरापुन् तू भारी मजूला, सगू बि माजी पोर
आला हकडं, मैतर माजा गेला म्हनुनी थोर !
मानाजींची किरत् वदावी कुनी ? किती ती मोटी !'
डोळे पुसले शिलोजिनीं मग, कालव होतां पोटीं
'शब्द गेला माजा ' माझ्या धर्मासाटीं सारं
आजवरी ह्ये केलं ! न्हाई गेलों कोना दार
आम्बराइ मी तुला अता ही मिळवुन बक्षिस देतों'
'नगं, करा ही किरपा मजवर' ! मुरार बोले हें तों

'किरपा केली लइलइ मजवर मानाजींनीं मागं
आन बोलले, तवा किती मी धरला त्येंचा राग !
पन् त्यें जालं खरं ! नशिब् ह्यें फुटलं माज्या हातीं !
ऐती मिळकत मन्जे, काका, अता वाटते मातीं !
खपूनश्येनी रानीं, गाळुन मी निडळाचा घाम
शेतामन्दीं राबुन म्होरं करिन पगा आराम
सगुना माजी येइल सङ्ग, टाकुन माग पैका
आम्बराइच्या रिणातनं मी सुटन; एवडं ऐका !'
'मुरा तुला पन् ही घ्यायाला हर्कत कस्ली बोल
परका मज् तू कदिबी न्हाइस् , पिर्ती माजी खोल'
'समुद् खरं ह्यें, पन् ही ऐती मिळकत काका दोड
इचार मलतें येवुन आन बि लागत न्हाई गोड
कुनी भरोसा द्यावा पुडला, नियत कुनी साङ्गावी
अता वाटतं गरिबिची म्या पिर्ती येक धरावी !'
'पन् ह्यो माजा तुला–सगूला देतों खावू म्हनुनी
बसुन सुखानं खा कायमचा वडलांचा ह्यो गनुनी'
'नगं नगं ही किरपा मजवर करा यापुडं, काका
पिर्तीवर्ती ओतिल माज्या विख दुसऱ्याचा पैका'
परोपरींनीं साङ्गितलें पण ऐकेनाच मुरार
निश्चय पाहुनि समाधानले मनीं शिलोजी फार
गोष्ट मनांतिल गुपित आपुल्या, साङ्गायाला वेळ
हीच पाहुनी योग्य, बोलले काय खेळला खेळ
'मुरा ऐक तर, अम्बेराई न्हाइ कुनाची आता
न्हाइ गेनबा मालक, हाये धनी तियेचा सवता
'कोन पगू ह्यो साङ्गा बर ? त्यो कोन सगू तू साङ्ग'
विस्मित सारे पाहु लागले काहि न लागुन थाङ्ग !

तोंच हासुनी गोड शिलोजी वदले हलवुन मान
'हिरु आपला मालक तीचा ! भगवन्ताचं देन !
कसा जाहला मालक त्यो बी नगं इचारूं काही
अम्बेराई ही पोरानो परक्याची मुळें न्हाई !'
स्तिमित जाहले किती वेळ तों सगुणा आणि मुरारी
भिजलीं नेत्रें पाहुनि लीला दैवाची ही सारी !

आकाशांतुन वर्षत होतें सुखद चान्दणें भंवतीं
प्रतिवस्तूला चराचरांतिल आली होती नवती
झुळझुळ वारा वाहुन आता जरा गारठा आला
निजले प्राणी, डोङ्गर, झाडें, शान्ति मिळे सर्वांला
मात्र विचारीं नवीन काही मुरार झाला गुङ्ग
पुष्पावरती एकच गानीं रमतो ज्यापरि भृङ्ग
"चला निजूं ! लइ वाडुळ बसलों ! चान्द किती वर आला !"
वदतां काका, उठुनी सगळे गेले झोपायाला
परि येईना झोप मुराला, मागिल काळ समोर
दिसुन, शहारुन अङ्ग जाउनी भीति वाटली घोर
उपकाराचें जड हें ओझें जीवा वाटुनि फार
कृतज्ञता-आश्चर्य-भीतिनीं होय मनीं बेजार
सगुस वदे मग. 'ही दैवाची करनी उलटी न्यारी
कोन कुनाचा कसा रिणी पग् दैवाच्या बाजारीं
कसं कराव, उपकाराचं जोखड जालं भारी !
चौबाजूंनीं पुरता गेलों उपकाराच्या हारीं
आपुन सारें येक, खरं हें; तरि पन् खपुनी रानीं
पैसे फेडूं समद हिरूचे निडळाच्या घामांनीं !'

मराठी ग्रंथ संग्रहालय क्र. 3633

हुकार त्याला दिला सगूनें, तो हि जाहला शान्त
शान्तिरूपिणी सृष्टी रमली ध्यानीं पूर्ण निवान्त !

कळे पुढे की शिलुकाकानीं पुन्जी वेचुन सगळी
अम्बेराई, आपुलकीनें केवळ, केली अपुली
आणि सर्व हें मानाजीच्या मैत्रीसाठी केलें
वचन पाळिलें पूर्णत्वानें मानाजीस दिलेलें
तेव्हा आला मुरारजीचा प्रेमें भरुनी ऊर
आणि तयाच्या नयनीं वाहे कृतज्ञेचा पूर
'अशीं मानसं मला लाभलीं, ही दैवाची खेर ! '
बोलुन इतुकें सर्व विसरला तो दैवाशीं वैर

चार घरांचीं चार माणमें झालीं प्रेमें एक
परस्परा सुख धाया करितीं स्वार्थत्याग अनेक
आपुलकीच्या घरीं नान्दते प्रेमें निर्मळ शान्ती
सुख पाहुन हें शिलुकाकांच्या समाधान हो स्वान्तीं
पाहुन आग्रह पुढें मुराचा, बेळू सोडुन तेही
रहावयाला प्रेमें गेले आम्बराइच्या गेही
जीवन झालें सुरू तेथलें निर्मळ आनन्दाचें
उल्हासाचें मुरा घालवी जीवन शेतकऱ्याचें
'वनवासाचीं चौदा वर्सं सरलीं आता वैस !
रामराज्य कर इत ! ' बोलले शिलुकाकाहि मुरास

गेलीं वर्षें दोन, मुरानें पिकें काढिलीं छान
स्वयें खपूनी मग रङ्गाला सर्व आर्पिलें रान

पहिला पैका आला, सारी विकल्यावरती खोती
मुरास वाटे तेव्हा, पडले हातीं माणिकमोतीं
साठवुनी ते आणि घालुनी करुण आसवें त्यांत
मानाजीची छत्री त्यानें बान्धविली शेतांत.
रोज सकाळीं सायङ्काळीं जातां येतां तीचें
दर्शन घेउन काम चालवी मुरार मग शेतीचें
केव्हा तरि काढून शिलोजी दिवसामाजीं वेळ
बसती तेथे, हिरूसङ्गतीं खेळत काही खेळ !
आणि सगूच्या हुर्हुर हृदयीं जेव्हा स्मृतिनीं दाटे
जाउन बैसे ती ही, गाळित अश्रू डोळ्यावाटे !

थण्डी जाऊन, आता ऊष्मा वाढू लागे थोडा
शिशिरामधला खळखळणारा बारिक झाला ओढा
परि थण्डींतिल चराचराची लोपुन भीषण काया
पानोपानीं मोहक विलसे नव वासान्तिक माया
कुठे कोवळे पल्लव फुटले, कोठे मोहर आला
वाऱ्यामधुनी सुगन्ध लागे रानीं दरवळण्याला
सुन्दर मन्जुळ पक्षिरवांनीं भरली अम्बेराई
गीत कुहूचें तींत कोकिळा ताररवानें गाई
पिकें काढुनी शेतकऱ्यांनीं रानीं रचुन बुचाडें
खळीं घातलीं धान्य मळाया मोगण आणिक माडें
मात्र पाणथळ रानीं होतीं अजुन ऊस-जित्रापें
हिरवट पानें पिवळी झालीं परी उन्हाच्या तापें
चालू झालीं कुठे गुऱ्हाळें, अगाप कोठे सरलीं
नपुल्याच्या आनन्दानें राई-रानें भरलीं

मोडुन आता मानाजीचें छप्पर पाचटलेलें
कौलारू घर चौसोप्याचें नवें मुरानें केलें

बाजुस एका बैल बान्धले आणि वासरें-गाई
रानवैभवीं खुलू लागली त्याची अम्बेराई
दुसऱ्या बाजुस सेवक त्याचा राहे कुणि केदारी
पत्नी त्याची होय मन्जुळा सगुची मैत्रिण भारी
उठुन पहाटे शिलुकाकानीं नित्य अभङ्ग म्हणावे
गोड सुरावर कधि मन्जूनें जात्यावरती गावें
सगुणा उठुनी, गुराखालचें काढुनि, कामें पाही
सुरार घेउन केदारीला कामावरती जाई
पैरण साधी, खादीधोतर शोभति त्याला फार
डौल मागला गेला तरि ही वदनीं कान्ति अपार
कधी न्याहारी खाउन जाई, कधि तो परतुन येई
केव्हा जेवण त्याचें सगुणा शेतावरती नेई

आज कराया गुन्हाळघर तो आणि ऊस पाजाया
गेला रानीं दूर गड्यासह, जाय हिरू हि पहाया
टळली वेळा न्याहारीची, आटपुनी तरि काम
सगू शिदोरी घेउनि लगबग निघे सोडुनी धाम
सोबतिला घेऊन मन्जुळा चालू लागे वाट
अपूर्व विलसे मधुर भोवती नव वासन्तिक थाट
वाट सरावी झरझर म्हणुनी उत्सुकुनी स्वमनांत
मन्जुळेस तों सगुणा बोले हासुन हळुच पहात
' गानं म्हन् त्यें तुजं मन्जुळे ! म्हन् त्यें बाई गोड
चकूत् न्यारिचा - बिगी बिगी - त्यें ! जिवा लागली वोढ ! '
लाजे अपुल्याशींच मन्जुळा, सगुला परि आतूर
पाहुनिया, ती काढी अपुले गोड रानटी सूर--

## ५ न्यहारीचें गाणें.

न्यारिचा वकुत व्हाईल    मैतरणी बिगिबिगि चाल ॥ ध्रु० ॥
नाङ्रसुदीच्या आंत    पोचाया होव ततं
सोडितिल हात बैलाला    धुण्डील नदर कोनाला
नदरे न पडन् मी जरी
जाईल मर्जे ग तरी
उरिं रुतंल माज्या सुरी
नग नगं गमावू येळ    मैतरणी बिगिबिगि चाल १
लइ वाडुळ जुपि झालेली    असत्याल सम्दिं शिणल्यालीं
शिण जाइल न्यारि करून    अन् साङ्ग कुना देखुन ?
त्यें खुलें तोण्ड घामानं    भरघोस हि कण्साहुन
पाहिल जरी रोज मी
तरि हौस न होई कमी
फिरफिरुन पगायास मी
व्होतसे मनिं उतावीळ    मैतरणी बिगिबिगि चाल २

अचल पापण्या, डोळे सुस्थिर, टपोर, पाणीदार
आणि गाल यावरी पसरली हसरी जादु अपार !
ऐकत होती सुस्वर गाणें सगुणा मन लावून
अन्तीं नजरा मिळतां, हसल्या दोघी लव लाजून
गाणें सरतां शान्ति दुणावे भरुनी रानीं सूर
आणि सगूच्या हृदया लागे गोड पुन्हा हुर्हुर
'भरघोस हि कण्साहुन' ऐसें वदनीं घोळत काही
मैत्रिणीस ती वदे 'मन्जुळे बिगीबिगी चल् बाई !'
हसे मन्जुळा डोळे मोडुन आणि सगू ही लाजे
खुलले लोचन सगुचे, निर्मळ अनुरागाच्या साजें

तों बैलाला ताररवानें कुणि म्हटलेलें गाणें
ऐकुन, थबकुन, मन्द पावलीं चाले ती अभिमानें
दृष्टभेट तों होउन दोघें मनीं आपुल्या धालीं
धाम मुराच्या कितितरि होता डवडवलेला भालीं
डोक्यावरती ऊन चाललें होतें तावत फार
अर्ध्या धावेवरती होती मात्र सावली गार
मोट सोडली आणि दाविलें गुरांस त्यानें पाणी
केदारीला येण्याला दे हाक तयाची वाणी
जमले सारे धावेवर ते, बसले अम्व्याखाली
तोंच शिदोरी सोडायाला सगुणा पुढती आली
हिरू बैसला साङ्गाती मग, मुरार पुरवी कोड
प्रीतिकराची चटणीभाकर लागे न कुणा गोड ?
मग आवडतें गाणें तिजला म्हणावया तो साङ्गे
लाजत हासत नकार देई तीही लाडिक रागें
परन्तु केला आग्रह त्यानें आणि मन्जुनें फार
तेव्हा गाई सगू, माधुरी भरली जीत अपार—

## ६ प्रीतीचें गाणें

[ चाल – हे प्रभो विभो अगाध ]

पिर्तिची निरि ऽऽऽ त् समद्याहुनी लइ न्यारी ॥ ध्रु० ॥

ही पिरत जडलि रामाला
सितेसाटी येडा पमुं जाला
मग पुसे झाडांपाखरांला—
"कुनि दावा पिरत माजि प्यारी" १

हिनं झपाटलं दुर्पदीला
भावासाटी जिव तरूमळला
वाट कापता त्यें बान्धायाला
  भन् पैठन फाडि जरतारी २

हिन्च लागीर जनिला झालं
हिन नाम्याला येड केल
हिन तुक्याच्च मन भारलं
  या वेडात रमूलीं नरनारी ३

अशि झळम्वि कितिका विजूली
कितिकाची जीवजोत इझूली
परि ज्यावर मती हिन्वि रिझूली
  त्यान साधील्या मुक्ती चारी ४

घास तोण्डचा तोण्डीं राहे आणि हातचा हातीं
लव हि न लवलीं अचल मुराचीं दोंडोळ्यांचीं पातीं
मोहनमन्त्रें भारुन गेला तो प्रीतीच्या गानीं
गात्रे त्याचीं रमलीं केवळ सौन्दर्याच्या पानीं
हिरू एकदा मुराकडे मग सगूकडे हळु पाहे
घटियन्त्राचा लम्बक अथवा जणु आन्दोलत राहे
हवेतुनी मग गानरसाचे वाहत गेले पूर
पीक उसाचें आनन्दानें डोलुनि झालें चूर
सङ्गीताचे सूर उमटले मुराच्या हृदयांत
अम्बेराईंतून मिळाली सुरेल त्याला साथ
आणि कमण्डलु शेजारूनी वाहुन झुळझुळवाणें
ऐकवि मङ्गल गोड आपुलें प्रीतिशान्तिचें गाणें २४३

3633

# रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | किरण (गद्यपद्य, मण्डळ) | ०४ |
| २ | काव्यविचार (काव्यविषयक निबन्ध, मण्डळ) | १ |
| ३ | उषा (पद्य, मण्डळ) | ०१२ |
| ४ | मधुमाधव (पद्य, घाटे-माधव जूलियन्) | ०१२ |
| ५ | शलाका (गद्यपद्य, मण्डळ) | १ |
| ६ | विरहतरङ्ग (खण्डकाव्य, माधव जूलियन्) | ०८ |
| ७ | कला (खण्डकाव्य, गिरीश) | ०६ |
| ८ | नाट्यरूप महाराष्ट्र (ऐतिहासिक प्रवेश, विठ्ठलराव घाटे) | १ |
| ९ | छन्दोरचना (मराठी वृत्तशास्त्र, प्रो मा. त्रि पटवर्धन) | २ |
| १० | प्रभा (गद्यपद्य, मण्डळ) | ०८ |
| ११ | सुधारक (खण्डकाव्य, माधव जूलियन्) | १०८ |
| १२ | आम्बराई (खण्डकाव्य, गिरीश) | १ |

## मण्डळाच्या सदस्यांचीं इतर पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| विष्णु कृष्ण चिपळूणकर | (ग. त्र्य. माडखोलकर) | ०१० |
| आधुनिक कविपञ्चक | (ग. त्र्य. माडखोलकर) | १०४ |
| विलापिका | (ग. त्र्य. माडखोलकर) | ०१२ |
| फार्शी-मराठी-कोश | (प्रो. मा. त्रि पटवर्धन) | ४ |
| दत्तांची कविता | (सम्पादक-विठ्ठलराव घाटे) | १०८ |
| काळाच्या दाढेंतून | (श्रीधर रानडे) | ०४ |
| यशवन्ती | (यशवन्त) | ०१० |
| मित्रप्रेमरहस्य | (यशवन्त) | ०४ |
| अभागी कमल | (गिरीश) | ०१२ |

सर्व पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः-(१) रविकिरणमण्डळ, ४६१ शनिवार, पुणें शहर.
(२) परचुरे, पुराणीक आणि मण्डळी, माधवबाग मुम्बई.

# रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

## १ किरण

......"खरें पाहूं गेले असतां किरणांतील प्रणयगीतें बरींच मोहक उतरलीं आहेत. त्यांतील प्रेम सर्वच ठिकाणीं व्यावहारिक असेल असें आम्हास वाटत नाहीं......प्रसङ्गवशात् उद्भूत झालेल्या उत्कट भावनांना काव्यविषय करण्याचा साम्प्रदाय किरणांतील कवींनीं पाळला आहे "

—सम्पादक, फर्ग्युसन कॉलेज मॅगेझिन्, पुणें.

## २ काव्यविचार

.. ..."हा काव्यविवरणात्मक ग्रन्थ एकन्दरीने सर्वाङ्गसुन्दर झाला आहे. त्यांत गेल्या अर्धशतकापासून कवितेचे जे नवीन प्रकार मराठी काव्यवाङ्मयांत प्रचलित झाले आहेत, त्याचें सविस्तर विवेचन केलें असल्यानें त्याचा उपयोग काव्याचें मर्म जाणण्याच्या कामीं चाङ्गला होईल".. ...

—ना म भिडे, बी. ए.

## ३ उषा

... "यांत मण्डळानें आपल्या सभासद कवींच्या स्फुट कविता प्रसिद्ध केल्या आहेत......या कवितांत वृत्तवैचित्र्य व विषयवैचित्र्य हीं दिसून येतात. ... माधव जूलियनची अप्रतिबद्ध भाषासरणी, गिरीशांची कोमल भावना व कोमल भाषा, यशवन्तांचा देशाभिमान व कल्पना आणि सौ. मनोरमाबाईंच्या वाणींतील पवित्रपणा व उदात्तता, हे गुण या पुस्तकांत दिसून येतात"......

—डेक्कन ब्हा. ट्रा सोसायटी, पुणें.

## ४ मधुमाधव

या पुस्तकांत विठ्ठलराव घाटे व माधव जूलियन् यांच्या स्फुट कविता सङ्गृहीत केल्या आहेत घाटे यांच्या कवनांत विषयगाम्भीर्य व उदात्तता असून माधव जूलियन् यांच्या कवितांत भावनोत्कटता व कल्पनारम्यत्व दिसून येतें.

## ५ शलाका

" ..रा. घाट्यांच्या सातच पानांत सामावलेल्या दोन अल्पकथा आहेत पण त्या अन्त करणास चटका लावण्यासारख्या उतरल्या आहेत ..शलाकेच्या काव्य-सङ्ग्रहाकडे वळताच कवितादेवीच्या क्रीडोपवनांतील एका लहानशा अजबखा-

त्यांतच आपण सन्चार करीत आहों असा भास होतो. मण्डळांतील सर्वच मूर्तींच्या अङ्गीं प्रतिभेची सम्पत्ति, कल्पनेचें तरलत्व, वर्ण्य वस्तूशीं तन्मयत्व, वाणीचें प्रागल्भ्य व निरीक्षण–निरूपणाचें सूक्ष्मत्व हे बहुमोल गुण चाङ्गले वसत असल्याचें आढळून येतें,...या लहानशा कवनसङ्ग्रहांत विषयवैचित्र्य, रसवैचित्र्य व रचनावैचित्र्य हीं विपुल आहेत" —वा. अ भिडे, बी ए. (रत्नाकर)

### ६ विरहतरङ्ग

..."प्रस्तुत काव्यात, प्रियकरणीचा लाभ घडणे शक्य नाहीं, अशा भावनेनें उदासीन व निराश झालेल्या विरहातुर तरुणाच्या अंत करणात मागील प्रेमप्रसगाच्या स्मरणानें सळसळत उमळलेलें विचारतरग साठविले आहेत...प्रस्तुतचें काव्य जिवन्त आहे, सरस आहे आणि त्यातून, काव्यनायकाचें चरित्र उदात्त, निर्मळ समुचित, किंबहुना उदाहरणीय आहे, असा ध्वनि नि·संदेह उठत आहे ..हें काव्य जितकें रमणीय उतरलें आहे तितकीच त्याची कविलिखित गद्यप्रस्तावना ही मननीय वठली आहे" —वा. अ. भिडे (रत्नाकर)

### ७ कला

... ..''कला हेंहि या नाट्यात्मक कथाकाव्याच्या सदरांत पडेल .....कलेमध्यें जी मुग्धमधुरता आहे ती वाचकांना प्रत्यक्ष वाचनानेंच कळणार आहे .....

—वि स खाण्डेकर.

### ८ नाट्यरूप महाराष्ट्र

"In this way this may be looked upon as a book of 'documents' or 'sources' as well as a book of drama The author has endeavoured also to give us a record of the manners, customs and religious thoughts of the Marathas.... H. R. Hamley.

*(Principal, S T T. College, Bombay).*

### ९ छन्दोरचना

... ..''केवळ अनुवादात्मक नसून त्यांत विचारस्वातन्त्र्य पुष्कळच दिसून येतें... ..पटवर्धन यांनीं या ग्रन्थांत चिकित्सकबुद्धि कसून चालविली आहे इतकेंच नव्हे तर छन्द शास्त्राचा विषय तळापासून ढवळून काढला आहे...... साहित्यशास्त्रासम्बन्धानें मराठींत जे काहीं ग्रन्थ उपलब्ध आहेत त्यांत या ग्रन्थानें मौल्यवान भर घातलेली आहे...... —न. चिं. केळकर (केसरी)

## १० प्रभा

“या ( पुस्तकांतील ) कवितासंबंधानें सर्वसाधारण बोलावयाचें झाल्यास त्या सर्वच ज्या त्या कवीनें कल्पना, माण्डणी, भाषा वगैरे बाबतींत काळजीपूर्वक लिहिलेल्या असून त्यांत निसर्गप्रेमत, सौन्दर्याची आवड, भाषेची सजावट करण्याची हौस, सहानुभूति, वगैरे उदात्त गुण जागोजागीं दिसून येतात. व ही सौन्दर्यप्रीति व हौस पुस्तकाचा कागद, छपाई, बांधणी वगैरे बाह्यांगावरूनही दिसून येते ”

—ज्ञानप्रकाश

## ११ सुधारक

“ … .अशीं पात्रें निर्माण करण्यांत तुम्ही चाङ्गलें कौशल दाखविलें आहे दाम्भिक वा कुटिल आचार–विचारांचा तुम्ही केलेला उपहास मर्मभेदी असला तरी न्याय्य आहे या काव्यांत तुम्ही दाखविलेला बंडखोरपणा जुन्या लोकांना पसत पडणार नाहीं, तथापि त्यांना खडबडून जागे करून विचार करावयास खास लावील. तरुण मण्डळींना मात्र यांतील बहुतेक विचार पटतील व त्यांना हें काव्य आवडेल यांत शंका नाहीं… . —वै का राजवाडे (पत्र)

---

मण्डळाचीं पुढील पुस्तकें

## यशोधन

म्हणजेच **यशवन्तांचा** कवितासङ्ग्रह, पृष्ठ सुमारें १७५

* * *

## उमर खय्यामच्या रुबाया

‘रुबा’इयात–इ–उमर–खय्याम’चें समग्र मूळ फार्शीवरून मराठी भाषान्तर, उपयुक्त टीपा व प्रस्तावनेसहित भाषान्तरकार–प्रो. **माधवराव पटवर्धन**, एम्. ए

* * *

मण्डळाचीं सङ्कलित पुस्तकें

काव्यमनोरमा, लग्नाची गाठ, ओजस्विनी, गाराचा पाऊस, गज्जलाञ्जलि, सुनीताञ्जली, काञ्चनगङ्गा व माधविका

३८९३

REF-K 0003733

REFBK-0003733